# टिळक-जीवनरहस्य

केळकरकृत टिळक-चरित्रावर दैनिक
ज्ञानप्रकाशांत प्रसिद्ध झालेले
टीकाविषयक लेख.

पुणें येथें
आर्यभूषण छापखान्यांत अनंत विनायक पटवर्धन
यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

१९२४ जानेवारी.

किंमत आठ आणे.

# प्रस्तावना.

रा. रा. न. चिं. केळकरकृत " लो. टिळक यांचें चरित्र, पूर्वार्ध " हें पुस्तक ता. ४ जुलै स. १९२३ रोजीं प्रसिद्ध झालें. त्यानंतर सुमारें दोन आठवड्यांतच त्यावरील टीकाविषयक लेखमालेस दैनिक ज्ञानप्रकाशांत सुरुवात होऊन पुढील सहा आठवड्यांत ती माला समाप्त झाली. मालेंत संपादकीय चवदा लेख व रा. सीताराम गणेश देवधर यांचे तीन लेख असे एकंदर सतरा लेख प्रसिद्ध झाले. टिळकभक्तांच्या लेखणींतून प्रायः कधींही बाहेर न पडणारी अशी कै० टिळकांच्या चरित्राची एक विशिष्ट व ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाची बाजू या लेखांत प्रतिपादन करण्यांत आली आहे. आणि त्यांतील विशेष मुद्याची गोष्ट ही कीं, या टीकेस खुद्द चरित्रांतील अवतरणांचाच मुख्यत्वेंकरून आधार दिलेला असल्यामुळें तिच्या समर्पकतेबद्दल संशय घेण्यास साधारणतः कोणासहीं विशेष जागा राहणार नाहीं. ही लेखमाला प्रसिद्ध होत असतांच तिजबद्दल कांहीं प्रमुख व सन्माननीय गृहस्थांचे तोंडून गुणग्रहणपर उद्गार निघूं लागले आणि यांत कांहीं टिळकभक्तही होते हें सांगणें आम्हांस जरूर वाटतें. ही लेखमाला पुस्तकरूपानें प्रसिद्ध झाल्यास गेल्या चाळीस वर्षांतील कित्येक वादग्रस्त प्रश्नांपैकीं कांहीं प्रश्नांची दुसरी बाजू लोकांपुढें येण्याचे कामीं तिचा बराच उपयोग होईल अशी कित्येक मित्रांकडून व वाचकांकडून आग्रहाची सूचना करण्यांत आल्यामुळेंच आम्ही हें सांप्रतचें पुस्तक प्रसिद्ध करीत आहोंत. मूळ लेखांत महत्त्वाचा फरक असा फारच थोड्या ठिकाणीं केलेला आहे. बहुधा मूळ लेख जसे प्रसिद्ध झाले तसेच ते या पुस्तकांत छापले आहेत. जहाल आणि नमस्त हे दोन पक्ष पडण्याची खरी मीमांसा काय आहे हें विशेषतः तरुण पिढींतील लोकांच्या लक्षांत यावें आणि विचारशक्तीस योग्य

राहिलें नसतें. पण अशा प्रकारची सामुग्री मिळाली नसल्याचा प्रस्तावनेंत निराशापूर्वक निर्देश करण्यांत आला आहे. टिळकचरित्र आणि तें त्यांच्या निकट सहवासांत सुमारें पंचवीस वर्षें घालविलेल्या आपल्या-सारख्या गृहस्थांनीं लिहिलेलें, तेव्हां तें बरेंचसें अगडबंब झालेंच पाहिजे असें वाटूनच कीं काय चरित्रकारांनीं केसरीच्या फायलींचा सढळ हातानें उपयोग करून चरित्राला गुटगुटितपणाच काय पण बेढब लठ्ठपणाही आणला आहे. यापेक्षां त्यांनीं तीनचारशें पानांचें आटपसर चरित्र लिहिलें असतें तर फार चांगलें झालें असतें असें पुष्कळांना वाटण्याचा संभव आहे.

कोणत्याही पुस्तकावर मत देतांना तें लिहिण्याच्या हेतूसंबंधांत खुद्द पुस्तककारांची प्रतिज्ञा काय आहे हें पाहणें जरूर असतें. प्रत्यक्ष पुस्तक कोणाला कसेंही वाटलें तरी तें या प्रतिज्ञेनुरूप झालें असलें तर खुद्द लेखकाच्या दृष्टीनें तरी तो प्रयत्न यशस्वी झाला आहे असें म्हणण्यास हरकत रहात नाहीं. प्रस्तुत चरित्रकार पुस्तकाच्या रूपासंबंधानें प्रस्तावनेंत म्हणतात:—"कांहीं चरित्रें केवळ माहिती देण्याच्या दृष्टीनें लिहिलेलीं असतात. कांहीं निवळ गुणवर्णनपर असतात. कांहींत या दोन्ही गोष्टींना बराचसा संक्षेप दिलेला असून त्यांत विषयानुसंधानानें मुख्यतः तात्त्विक विवेचन केलेलें असतें व कांहीं तर एखादा विशेष पक्ष समर्थन करण्या करितांच लिहिलेलीं असतात. या सर्व दृष्टींचा मेळ बसत नाहीं व कोणी बसविण्याचा प्रयत्न केला तर ती एक प्रकारची कंथा बनून तिचा विस्तारही बेसुमार होतो. हें जाणून आम्हीं फक्त एकाच दृष्टीनें हा चरित्रग्रंथ लिहिला आहे. ती दृष्टि म्हणजे प्रकरणवार, साधार, भरपूर व जुळवून माहिती देण्याची. ही पद्धत सर्वांत अधिक नीरस ठरण्यासारखी असते. पण इतिहासकथनाच्या पायावरच पुढें गुणवर्णन, तात्त्विक विवेचन, वगैरेंची इमारत बांधतां येते. यामुळें ज्याला सर्वांत कमी लेखनकौशल्य लागतें अशी व निवळ काबाडकष्टाची पद्धति तेवढीच आम्हीं स्वीकारून हा चरित्रखंड वाचकांना सादर केला आहे." गुणवर्णन, तात्त्विक विवेचन

वगैरे कांहीं भाग चरित्रकारास अर्थातच लिहावयांचे आहेत, ते या चरित्राच्या उत्तरार्धाच्या शेवटीं लिहिण्याची त्यांची योजना दिसते. तात्त्विक विवेचनाची इमारत बांधण्यास इतिहासकथनाचा जो पाया लागतो तोच या पुस्तकांत त्यांनीं घातला आहे हें वरील मजकुरावरून ध्यानांत येईल. आणि या पायाचेंही अर्धेंच काम झालें आहे. उत्तरार्धांत राहिलेलें अर्धें काम होणार आणि मग ग्रंथकार तात्त्विक विवेचन करणार ! यावरून वाचकांच्या सहनशीलतेचें कसून सत्त्व पहाण्याचाच त्यांनीं विचार केलेला दिसतो ! आणि ज्याच्यांत थोडी तरी सरसता आहे असा कोणताही वाचक उत्तरार्धाच्या शेवटीं येणाऱ्या तात्त्विक विवेचनापर्यंत तग धरून राहील हें आम्हांस संभवनीय दिसत नाहीं.

इतिहासकथनाचा पाया खोदण्याचें काम ग्रंथकारांनीं त्यांच्या स्वतःच्याच दृष्टीनें कां होईना, चांगल्या रीतीनें केलें आहे. पण यापेक्षां थोडथोडा पाया रचून त्यावर तात्त्विक विवेचनाची तेवढ्यापुरतीच इमारत बांधावयाची, असा चरित्रकारांनीं क्रम ठेवला असता तर चरित्रनायकास आरंभापासून थोडथोडी निवाऱ्याची जागा मिळत गेली असती व हल्लींप्रमाणें तात्त्विक विवेचनाच्या निवाऱ्याशिवाय निराश्रित राहण्याचा त्याच्यावर येणारा दुःसह प्रसंग खास टळला असता !

या सातशें पानांच्या ग्रंथांत टिळकचरित्र शेंपन्नास पानेंच असलें तरी गेल्या तीस चाळीस वर्षांतील पुणें शहरांत झालेल्या चळवळींचा संगतवार इतिहास देण्याची पर्वणी या चरित्राच्या निमित्तानें चरित्रकारांनीं साधली असल्याचें दिसून येतें. या इतिहासाचें त्यांनीं एखादें स्वतंत्र पुस्तक काढलें असतें तर त्याला पुरेसा वाचकवर्ग मिळण्याचीही कदाचित् पंचाईत पडली असती. तेंच हा इतिहास टिळकांभोंवतीं उभा केल्यानें किंवा टिळकांना या इतिहासाचा मध्यबिंदु केल्यानें तो वाचकांच्या बिनबोभाट गळीं उतरणार आहे, असाच विचार चरित्रकारांनीं केला असावा. सामुग्रीच्या अभावीं चरित्राला एरव्हीं जो रोडपणा आला असता तोही या कृतीनें आपोआपच नाहींसा झाला.

या ग्रंथास मुख्य सहाय्यभूत झालेली सामुग्री म्हटली म्हणजे केसरीचीं फायलीं होत. त्यांत प्रत्यक्ष टिळकांच्या हातचीं अशीं फायलीं १८९० पासून १८९९ पर्यंत दहा वर्षांचींच होत. “ या अवधींत घडलेली कोणतीही गोष्ट स्वतः टिळकांना कशी दिसली किंवा वाटली ” हें दाखविण्याच्या हेतूनेंच या दहा वर्षांतील त्यांच्या लेखांमधून प्रस्तुत ग्रंथांत जागजागीं उतारे घेतले आहेत. अर्थात् या गोष्टी लोकांना कशा दिसल्या व वाटल्या हें दाखविण्याकडे ग्रंथकारांचें अगदींच दुर्लक्ष झालेलें नसलें तरी तें कार्य जितकें पूर्णतेनें व्हावयाला पाहिजे होतें तितकें झालें नाहीं असें म्हणावें लागतें. चरित्रकारांनीं आपली ग्रंथ लिहिण्याची दृष्टि “ म्हणजे प्रकरण-वार, साधार, भरपूर व जुळवून माहिती देण्याची ” असल्याचें प्रस्तावनेंत म्हटलें आहे आणि या मर्यादित दृष्टीचा विचार करतां त्यांचा हा प्रयत्न बऱ्याच अंशांनीं साधला आहे असें म्हणावें लागेल.

प्रचंड आकाराचें पुस्तक लिहिण्याची महत्त्वाकांक्षा कांहीं वाईट नाहीं. पण प्रचंडपणाबरोबरच पुस्तकांत चटकदारपणा व वाचकांना तल्लीन करून सोडण्याचा गुण असावा लागतो. त्याशिवाय तें अथपासून इति-पर्यंत आवडीनें वाचण्याची कोणासही इच्छा होत नाहीं. प्रस्तुत पुस्त-कांतली माहिती एकांगी व प्रायः एकाच उगमांतून आलेली असल्यामुळें तिची सरसता बरीच कमी झाली आहे. आणि शिवाय यांतील पुष्क-ळशी माहिती आज ज्यांची चाळिशी उलटली आहे त्यांच्या वाचनांत, ती केसरींतून पूर्वींच प्रसिद्ध झाली असल्यामुळें, आली असली पाहिजे. जुनीं ओळखीचीं माणसें फार दिवसांनीं भेटलीं म्हणजे जसा मनाला क्षणैक आनंद होतो त्याप्रमाणेंच आपल्या समोर घडलेल्या अशा जुन्या हकीकतीचें शब्दचित्र पहाणें कित्येकांना कदाचित् कौतुकास्पद वाटेल. पण पुष्कळांना या हकीकती अतिसंक्षेपरूपांत दिल्या असत्या तर बरें झालें असतें असेंही वाटेल. पंचवीस वर्षांच्या पूर्वीं घडलेल्या गोष्टींचें, त्या प्रत्यक्ष पहावयास न मिळाल्यामुळें, ज्यांना खरें स्वारस्य माहीत

नाहीं, त्यावेळच्या निरनिराळ्या प्रकरणांत प्रमुख भाग घेतलेल्या व्यक्तींचा, त्यांच्या स्वभावांचा, व मनोघटनेचा ज्यांना परिचय नाहीं अशा तिशीच्या आंत बाहेर असलेल्या आजच्या पिढीला पुस्तकांत दिलेलीं कित्येक प्रकरणें सर्वस्वी नीरस व कंटाळवाणीं वाटल्याशिवाय राहणार नाहींत. प्रस्तुत पुस्तकांत टिळकांच्या पहिल्या वीस वर्षांच्या आयुष्यक्रमांतील दिलेल्या हकीकती व त्यांत टिळकांनीं घेतलेली भूमिका हीं दोन्ही स्थानिक स्वरूपाचीं आहेत हें ग्रंथकर्त्यांनींही कबूल केलें आहे. आम्ही तर म्हणतों कीं, या गोष्टींना जसें स्थानमाहात्म्य आहे तसें कालमाहात्म्यही आहे. अर्थात् तो काल गेल्यानंतर त्यांना फाजील महत्त्व देणें म्हणजे शिळ्या कढीस ऊत आणण्याप्रमाणेंच आहे.

वर दिलेलें विवेचन आम्हीं केवळ दोषैकदृष्टीनें मुद्दाम केलें आहे अशी कोणीही आपली समजूत करून घेऊं नये. रा. नरसोपंत केळकर यांच्यासारख्या वाङ्मयव्यासंगी गृहस्थांनीं केलेल्या पुस्तकांत वाचनीय किंबहुना मनोरम अशीं स्थळें असणारच आणि तीं याही पुस्तकांत आहेत. आमचें म्हणणें येवढेंच कीं, पुस्तक आटपसर असतें तर हींच स्थळें अधिक खुलून दिसलीं असतीं. यापूर्वीं टिळकांचीं दोन चरित्रें प्रसिद्ध झालीं आहेत; पण चरित्र या दृष्टीनें त्यांची किंमत अगदीं गौण आहे. जगांत असतील नसतील तितक्या गुणांची माळ चरित्रनायकाच्या गळ्यांत अडकवून त्यास विभूति बनविल्याशिवाय चरित्रास पूर्णता येत नाहीं असेंच या चरित्रकारांचें मत असल्यामुळें त्यांचीं चरित्रें अल्पजीवी व्हावीं यांत कांहीं आश्चर्य नाहीं. निदान इतिहासाच्या दृष्टीनें त्यांस केराच्या टोपलीचाच आश्रय करावा लागणार हें उघड आहे. पण प्रस्तुत चरित्रांत तो दोष असलाच तर फार कमी प्रमाणांत आहे हें कोणाही निःपक्षपाती माणसास प्रांजलपणें कबूल केलें पाहिजे. चरित्र म्हटलें कीं त्यांत थोडी फार पक्षपातबुद्धि ही असावयाचीच. प्रस्तुत चरित्रांतही त्या बुद्धीचें जागजागीं आविष्करण झालेलें दिसतें; तरी पण ती

अमर्याद न होऊं देण्याबद्दल चरित्रकारांनीं बरीच खबरदारी घेतलेली दिसते; इतकेंच नव्हे तर कोणत्या ना कोणत्या तरी कारणानें टिळकांचें प्रतिपक्षीयत्व ज्यांच्याकडे आलें त्यांचेंही यथाप्रसंग गुणग्रहण करण्यास चरित्रकारांनीं नाखुषी दाखविली नाहीं हें कोणासही कबूल करावें लागेल टिळकांचें कर्तृत्व विशेष खुलून दिसावें अशी चरित्रकारांनीं अर्थातच योजना केली आहे; त्याचप्रमाणें टिळकांच्या प्रायः प्रत्येक कृतीचें समर्थन करण्याचाही त्यांनीं प्रयत्न केला आहे; पण पुष्कळ ठिकाणीं तो इतका पारदर्शक आहे कीं, या समर्थनाच्या तळाशीं असलेला गाळ चाणाक्ष वाचकांच्या तेव्हांच ध्यानांत यावा ! चरित्रनायकाचें महत्त्व कमी न होतां तोही असामान्य असला तरी मनुष्यप्राणीच होता ही जाणीव वाचकांच्या मनांत सदैव जागृत राहील अशीच त्यांनीं आपल्या वृत्तकथनाची व विवेचनाची सुबक रीतीनें मांडणी केली आहे. त्याचप्रमाणें टिळकांच्याहून ज्यांचीं भिन्न मतें होतीं, त्यांनाही आपल्या आयुष्यक्रमांत निश्चित असा कार्यभाग करावयाचा होता आणि त्याकरितां त्यांचे हातून झालेले प्रयत्नही प्रामाणिकपणाचे होते. हीही गोष्ट वाचकांच्या नजरेस आणण्याची चरित्रकारांनीं सावधगिरी बाळगिली आहे. टिळक व त्यांचे प्रतिपक्षीय यांच्यासंबंधानें चरित्रकारांनीं दिलेलीं मतें व त्यांनीं अंगिकारिलेल्या पद्धतीची चरित्रकारानें केलेली मीमांसा हीं आम्हांला अर्थातच सर्वस्वी मान्य होणार नाहींत; पण याही बाबतींत उलटसुलट बाजूंचा चरित्रकारांनीं समन्वय लावण्याचा यथामति प्रयत्न केलेला दिसतो.

टिळक व त्यांचे प्रतिपक्षीय यांचे हे वाद कांहीं आजचे नाहींत. ते जुनेच आहेत आणि म्हणूनच त्यांतील मुद्यांच्या खंडनमंडनाचे मार्गही आतां बहुधा ठरल्यासारखेच आहेत. वस्तुतः तसल्या व्यापांत पडण्याचें आतां फारसें कारणही नाहीं, असेंही कित्येकांना वाटेल. पण दुखण्याचा झटका जेव्हां जेव्हां येईल तेव्हां तेव्हां त्याला औषध हें दिलेंच पाहिजे. तेंच तेंच औषध पुनः

पुनः देण्यांत कांय हंशील आहे, असें म्हणून चालणार नाहीं. हाच न्याय सार्वजनिक बाबतींतिल वादासही लागूं आहे. प्रस्तुत पुस्तकांत चरित्रकारांनीं निरनिराळ्या सार्वजनिक बाबींसंबंधांत टिळकांच्या कार्याची दिशाच बरोबर कशी होती, हें त्या त्या प्रकारची एकांगी माहिती देऊन सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. याला अर्थात् दुसरी बाजू आहे आणि दुसरी विचारसरणीही आहे आणि ती दाखविण्याचें ज्यांचें काम आहे त्यांनीं तें अशा प्रसंगीं अवश्य केलें पाहिजे. त्याशिवाय या काळाचा इतिहास लिहिणारास सत्यान्वेषण करतां येणें शक्य होणार नाहीं हें उघड आहे आणि याच दृष्टीनें आम्हीं या पुस्तकाचें निरीक्षण करण्याचें योजिलें आहे. हें निरीक्षण अर्थातच त्रोटक असणार. कारण चरित्रकारांनीं उपस्थित केलेल्या यच्चयावत् प्रत्येक मुद्याची योग्य संभावना करावयाची म्हटल्यास हाही चरित्राच्या पूर्वार्धाप्रमाणें एक अगडबंब ग्रंथच होईल.

---

## लेख दुसरा.

### टिळकांची कलहप्रियता.

प्रस्तुत पुस्तकांत एकंदर अठावीस प्रकरणें आहेत. त्यांत पृष्ठांची विभागणी केली तर प्रत्येक प्रकरणास किंवा भागास चोवीस पानें असें सरासरी प्रमाण पडतें. यांतही वर्गीकरण करावयाचें म्हटल्यास न्यू इंग्लिश स्कूल, फर्ग्युसन कॉलेज व केसरी मराठा यांनीं पुस्तकांतील दीडशें पानें अडविलीं आहेत. कोल्हापूरचा खटला व १८९७ सालचा राजद्रोहाचा खटला यांनीं सवाशें पानें घेतलीं आहेत. ग्रामण्य, रमाबाईचें शारदासदन, राष्ट्रीय सभेच्या मंडपाचा वाद, सार्वजनिक सभा व डेक्कन सभा व पुण्यांतील प्लेग हीं निवळ स्थानिक स्वरूपाचीं प्रकरणें खटल्याइतक्याच म्हणजे सवाशें पानभर पसरलेलीं आहेत. क्राफर्ड कमिशन, बडोद्याचें बापट कमिशन,

हिंदुमुसलमानांचे दंगे, गणपति व शिवाजी महाराज यांचे उत्सव, टिळक व वेदकालनिर्णय या भिमस्थानिक स्वरूपाच्या बाबींनीं पुस्तकाचीं सुमारें दीडशें पानें व्यापिलीं आहेत. या अवांतर व आगंतुक बाबींच्या मानानें टिळकांचा कुलवृत्तांत व बाळपणचा विद्याभ्यास यांच्या वांट्यास फारच कमी म्हणजे फक्त पन्नासच पानें आलीं आहेत. त्याचप्रमाणें टिळकांपूर्वीच्या महाराष्ट्रानेंही चरित्रकारास पन्नास पानें भरविण्याचे कामीं हात दिला आहे. हा आंकडेमोडीचा हिशेब कां होईना, पण तो पुस्तकाच्या अंतःस्वरूपा-बद्दल वाचकांना ठोकळ कल्पना देण्यास सहाय्यभूत होईल असा भरवंसा वाटतो.

टिळकांच्या सार्वजनिक आयुष्यक्रमास न्यू स्कूलच्या स्थापनेपासून प्रारंभ धरला, तर या आयुष्यक्रमाचीं त्यांच्या देहावसानापर्यंत चाळीस वर्षे होतात. प्रस्तुत पूर्वार्धात त्यांपैकीं वीस वर्षांचा इतिहास आला आहे. या इतिहासांतही टिळकांची बुद्धिमत्ता, कर्तृत्वशक्ति, प्रसंगावधान, निग्रही स्वभाव वगैरे गुण दिसून येतात. हे व इतर कित्येक गुण त्यांच्या अंगीं होते हें निर्विवाद आहे. पण तत्त्वान्वेषी वाचक, या गुणांचा लोककार्याचे कामीं खरोखरच कितपत उपयोग झाला, या दृष्टीनेंच या चारित्राकडे पाहील आणि चरित्रनिरीक्षणाची दृष्टि हीच असली पाहिजे हेंही उघड आहे. टिळक स्वतः अर्थातच स्वावलंबनाचे चहाते होते; पण त्यांची प्रत्येक चळवळ प्रायः परोपजीवी असल्याचें स्पष्ट रीतीनें दिसून येतें. हें विधान पाहून टिळकभक्तांना साहजिकच परमावधीचा विस्मय वाटेल. विशेषतः टिळकांचें सर्व आयष्यकार्य प्रत्यक्ष डोळ्यांपुढें घडलेलें पहा-ण्याचा ज्यांना योग आला नसेल त्यांना हें विधान केवळ कलुषित बुद्धीनें केलें आहे असा भास होईल; पण आज टिळकांच्या एका पट्ट-शिष्यानें—ज्याच्याकडे टिळकांच्या सार्वजनिक आयुष्यक्रमाचा वारसा आलेला आहे अशा शिष्यानें—लिहिलेलें त्यांचें हें प्रस्तुत चरित्र पाहिलें

तर आमच्या वरील विधानाचें सर्वस्वी समर्थन करणारीं अशीं प्रत्यंतरें त्यांत जागोजाग सांपडतील.

मनुष्य हा परिस्थितीचा दास असतो असा एक सामान्य सिद्धान्त आहे; पण तो सिद्धान्त प्रायः सामान्य माणसाला लागू असतो. लोकोत्तर माणसें आपल्याला हवी तशी परिस्थिति स्वतःच्या हिंमतीवर निर्माण करतात. टिळकांची लोकोत्तरता अशी परिस्थिति निर्माण करण्यांत प्रायः केव्हांही यशस्कर ठरली नाहीं, ही गोष्ट या चरित्राच्या वाचनानें वाचकांच्या मनावर ठसल्याशिवाय राहणार नाहीं. पण सर्वांनाच चरित्र वाचण्याची इच्छा अथवा फुरसत होईल अशी वस्तुस्थिति असणें अर्थातच कठिण आहे. ज्यांना अशी इच्छा किंवा फुरसत नसेल त्यांना या चरित्रग्रंथाचें व पर्यायानें चरित्रनायकाच्या जीवनरहस्याचें थोडक्यांत व विशेष आयास न पडतां आकलन व्हावें या हेतूनेंच आम्हीं ही लेखमाला लिहिली आहे.

कै. टिळक यांच्या सभोंवार निरनिराळ्या प्रसंगीं अनेक प्रकारच्या परिस्थिती जन्मास आल्या. पण आपल्या कलहप्रिय व उपद्व्यापी स्वभावास जी परिस्थिति विशेष प्रकारें पोषक व सहाय्यभूत होईल असें दिसलें, त्या परिस्थितीचीच त्यांनीं मोठ्या आतुरतेनें निवड केली. टिळकांचा देशाभिमान, त्यांची आक्रमशक्ति, त्यांची कल्पकता, स्वार्थाबद्दलचें त्यांचें औदासीन्य, वगैरे त्यांच्या अंगच्या गुणांचा जर कोणत्या एका बाबतींत विशेष उपयोग झाला असेल तर तो भांडणें भांडण्यांतच होय. "जेथें भांडणतंडण तेथें माझें अधिष्ठान" असें त्यांनीं म्हटलें असतें तर तें खरोखरच अन्वर्थक ठरलें असतें ! खुद्द चरित्रकार मोठे मार्मिक व कोणतीही बाजू व्यवस्थित किंबहुना भपकेदार स्वरूपांत दाखविण्याचे कामीं कुशल असे आहेत. पण त्यांनाही आपल्या गुरूची ही कलहप्रियता कबूल करण्याशिवाय गत्यंतर उरलें नाहीं. ते आपल्या गुरुचरित्रांत एके ठिकाणीं म्हणतात:—

"टिळकांनीं कांहीं चळवळी स्वतःच्या कल्पनेनें नवीन उभारलेल्या असल्या तरी त्यांच्या बऱ्याचशा चळवळींचें उगमस्थान तत्कालीन वादामध्यें सांपडतें."

याच तत्त्वाचें निरूपण करतांना त्यांनीं प्रदर्शित केलेले पुढील विचारही मोठे मार्मिक व चाणाक्षपणाचे आहेतः—

"त्यांच्या स्वभावाला कलहप्रिय हें दूषणास्पद नांव योग्य असो वा नसो; त्यांच्या मनाची ठेवण मात्र अशी होती कीं, प्रतिपक्षी जितका अधिक जोरदार व वादाची बाजू अंगावर जितकी अधिक कोसळलेली तितकें त्यांचें तेज, धैर्य, बुद्धिमत्ता अधिक चमकत असत यांत मात्र शंका नाहीं."

टिळकांच्या या कलहतंत्री स्वभावामुळें त्यांच्या अंगांतील कित्येक असामान्य शक्तींचा देशहिताच्या दृष्टीनें उपयोगापेक्षां दुरुपयोगच अधिक झाला हा विचार मनांत येऊन कोणासही वाईट वाटल्यावांचून राहणार नाहीं. देशकार्य, समाजकार्य किंवा दुसरें एखादें लौकिक कार्य असो,त्याला भांडणाचें कोंदण असल्याशिवाय टिळकांचें मन त्याशीं समरस केव्हांही होत नसे. भांडणापुढें त्यांना कोणतीही गोष्ट पवित्र वाटत नसे. डॉ. भांडारकर हे टिळकांच्या वडिलांचे स्नेही. हा आपल्या स्नेह्याचा मुलगा अशी भांडारकरांची टिळकांबद्दल अखेरपर्यंत भावना होती. पण अशी भावना भांडारकरांनीं राखली हा केवळ त्यांचाच थोरपणा होय. वस्तुतः त्यांची ही प्रेमळ भावना नष्ट व्हावी असेंच टिळकांनीं आपल्या लेखनद्वारें त्यांच्याशीं प्रसंग आला तेव्हां अनादराचेंच वर्तन केलें आहे. चरित्रकार म्हणतातः—

"खासगी रीतीनें उभयतांची गांठ पडल्यास उभयपक्षीं पहिला उमाळा तरी पूर्वार्जित स्नेहसंबंधाचाच येई." पण या पूर्वार्जित स्नेहसंबंधावर टिळकांच्या स्वार्जित कलहप्रियतेचाच अखेर पगडा बसत असे, ही गोष्ट वर्तमानपत्राच्या वाचकांना महशूरच आहे. संमतिवयाच्या कायद्याचा वाद झाला त्यावेळीं टिळक आणि भांडारकर हे एकमेकांच्या

विरुद्ध बाजूला होते. या वादांत टिळकांनीं आपल्याला अत्यंत अनादर-बुद्धीनें वागविलें याबद्दल डॉ. सर रामकृष्णपंत भांडारकर यांना अतिशय वाईट वाटलें. शास्त्रीय, संशोधनविषयक किंवा वाङ्मयात्मक वादांत पूर्वपक्ष उत्तरपक्ष करण्याचे डॉ. भांडारकर यांना शेंकडों वेळां प्रसंग आले; पण विरुद्ध पक्षाकडून बुद्धिपूर्वक अनादरानें वागविण्यांत आल्याचें त्यांच्या आयुष्यांत केव्हांही उदाहरण घडलें नाहीं. तें वरील संमति-वयाच्या वादाच्या वेळीं घडलें. याचा उल्लेख करतांना खुद्द डॉ. सर रामकृष्णपंत एके ठिकाणीं म्हणतातः—

"I have been carrying on literary controversies since 1864. But never did I hitherto meet with an opponent who treated me with such studied discourtesy as Mr Tilak has been doing. This circumstance has rendered my task disagreeable and even painful."

टिळकांना पितृस्थानीं असलेल्या भांडारकरांची ही दशा, तर इतर लोकांचा विचार करावयाचेंच कारण उरत नाहीं!

"त्यांचा बहुतेक सर्व जन्म न्यायकोर्टांत भांडणें भांडण्यांत गेला मग तीं स्वतःचीं असोत किंवा दुसऱ्याचीं असोत" असें चरित्रकार म्हणतात. पण टिळकांचें भांडणाबद्दलचें हें प्रेम इतकें पल्लेदार होतें कीं, कोर्टाच्या आकुंचित मर्यादेंत कोंडून रहाणें त्यांस अर्थातच आवडत नसे. किंबहुना न्यायकोर्टाच्या बाहेरच्या भांडणांचेंच त्यांचें प्रमाण अधिक होतें. सोंगट्या खेळण्याचा मनस्वी नाद असलेल्या एखाद्या गृहस्थाला सोंगट्या खेळण्यास एखादा गडी मिळाला तर ठीकच, पण न मिळाला तरी दोन्ही बाजूंचें दान स्वतःच देऊन तो मोकळा होतो! टिळकांचा भांडणांचा खेळ अशाच प्रकारचा होता. आज कुठलें भांडण कांहीं शिल्लक नाहीं अशी स्थिति आली तरीही ते स्वस्थ बसत नसावेत. आत्मगतच ते पूर्व पक्ष, उत्तर पक्ष करीत बसत, असेंही कोणी जरी त्यांच्यासंबंधानें सांगितलें तरी तें कोणास खोटें वाटण्याचें कारण नाहीं!

त्यांच्या बुद्धिमत्तेस कलहप्रियतेची व तिच्या मुळाशीं असलेल्या शिरजोर अहंमन्यतेची कायमची जोड मिळाल्यामुळें त्यांचें बरोबरीच्या माणसांशीं केव्हांही जमलें नाहीं. डे. ए. सोसायटीशीं भांडून टिळक बाहेर पडले त्या हकीकतीचा समारोप करतांना चारित्रकार म्हणतातः—

"बरोबरीचा दर्जा व बरोबरीचें कर्तृत्व ज्यांचें आहे, अशा लोकांत पुष्कळ वेळ नांदून काम करणें हें टिळकांना साधत नाहीं. जेथें जाईन तेथें मी माझेंच चालवीन असा त्यांचा आग्रह असतो व तोच फुटीला कारणीभूत होतो असा त्यांच्या प्रतिपक्ष्यांचा एक कायमचा आरोप त्यांच्यावर होता व तो खरा मानला तर टिळकांनीं राजिनामा देऊन बाहेर पडणें हें जसें श्रेयस्कर तसेंच शहाणपणाचें होतें असें म्हणण्यास हरकत नाहीं."

फार कशाला, कलहानें प्रेरणा न मिळालेल्या अशाच टिळकांच्या चळवळींचें वर्णन देऊन त्यांचें चारित्र लिहावयाचें असा चरित्रकारांनीं विचार ठरविला असता तर त्यांना पुरीं दहा पांच पानें तरी लिहितां आलीं असतीं किंवा नाहीं याची शंकाच आहे. टिळकांची विद्या विनयसंपन्ना नव्हती हेंच "त्यांच्यापासून दोन पावलें दूर रहाणेंच चांगलें" असें त्यांच्या बरोबरीच्या माणसांस वाटविण्यास कारण झालें. शिवाजी उत्सवासारख्या कित्येक चळवळी अशाही आहेत कीं, ज्या टिळकांच्या प्रतिपक्षीयांनीं प्रारंभीं सुरू केल्या, कांहीं काल चालविल्या व पुढेंही त्या चालविण्याच्या कामीं टिळकांनासुद्धां त्यांच्या प्रतिपक्षाचीही सहकारिता मिळण्यास वस्तुतः कांहीं हरकत पडण्याचें कारण नव्हतें. पण चळवळीचें स्वरूप ठरविणें, ती चालविण्याची निश्चित पद्धत स्वीकारणें, वगैरे बाबतींत ते कोणत्या वेळीं काय भानगडी उपस्थित करतील याचा भरंवसा धरणें केव्हांही शक्य नव्हतें. त्याचप्रमाणें अगदीं क्षुल्लक कारणावर सुद्धां कोणत्या वेळीं ते कोणाचा आणि कशा रीतीनें उपमर्द करतील किंवा गांवांतील पोरसोरं त्याच्या मागें लावतील याचाही कांहीं नेम नव्हता. अर्थात् स्वाभिमानी, कर्तृत्ववान् किंवा कल्पक अशा माणसांनीं

सहकारिता करण्यासारखी टिळकांची केव्हांही स्थिति नव्हती. असाच सर्वांचा अनुभव होता.

आपल्या आयुष्याचें शपथपुरःसर ठरविलेलें ध्येय सोडून त्यांनीं डे. ए. सोसायटीचा राजीनामा दिला याबद्दल त्यांना कित्येक लोक दोष देतील. पण टिळकांनीं बरोबरीच्या माणसांत दहा वर्षें तरी कशीं काढलीं याबद्दलही कित्येकांना अचंबा वाटेल. टिळकांचे न्यू इंग्लिश स्कूलमध्यें इतके दिवस निघाले पण त्यामुळें त्यांच्या व्यवसायबंधूंना किती क्लेश सोसावे लागले असतील याची कल्पना सोसायटी सोडतांना टिळकांनीं काढलेल्या उद्गारांवरून उत्कृष्टपणें येते. "प्रत्येकाला त्याच्या कार्यांत मी कांटा आहें असें वाटावें, माझे किरकोळ दोष फुगवून दाखवावे, शेवटीं शिक्षक म्हणून मी नालायक आहें इतकें म्हणण्यापर्यंत मजल यावी, मग रहाण्यांत अर्थ काय ?" असे टिळकांनीं आपल्या राजीनाम्यांत उद्गार काढले आहेत आणि ते चरित्रकारांनीं राजीनाम्यांतून उद्धृत केलेल्या अवतरणांतूनच आम्हीं जसेचे तसे दिले आहेत. वरील उताऱ्यांतील 'प्रत्येकाला' हा शब्द खरोखरच अर्थपूर्ण आहेत. एखादा गृहस्थ आपल्या सर्व व्यवसायबंधूंकडून त्याज्य असा ठरतो तेव्हां त्याच्या स्वभावांत व मनोघटनेंतच कांहीं तरी भयंकर दोष असले पाहिजेत हें उघड होतें.

टिळकांच्या या स्वभावामुळें त्यांना आपल्या भोंवतीं प्रभावशील व हिंमतदार माणसांचा गोतवळा जमवितां आला नाहीं. चरित्रकारासारखीं अगदीं थोडीं माणसें वगळलीं तर टिळकांच्या समीपवर्ती माणसांत येथून तेथून रद्दी व तोंडपुज्या माणसांचाच भरणा झालेला दिसतो. सर्व जन्म आपण सार्वजनिक चळवळींत घालविला तरी सुद्धां नांव घेण्यासारखीं अशीं माणसें आपल्याला जोडतां आलीं नाहींत याबद्दल शेवटीं शेवटीं टिळकांनाही वाईट वाटल्याखेरीज राहिलें नाहीं. विशेषतः इंग्लंडमध्यें डेप्युटेशनवर जातांना त्यांना ही अडचण विशेष भासली. 'राष्ट्रीय सभेच्या मंडपाचा वाद' या प्रकरणांत चरित्रकारांनींही या गोष्टीचा निर्देश केला आहे. ते म्हणतातः—

"आपल्या पक्षाला लोकप्रसिद्ध अशीं माणसें नसल्यामुळें येणारा कमीपणा टिळकांना परवां परवांपर्यंत भासत होता. मग १८९५ सालीं त्यांची स्थिति काय असेल हें सांगावयास नकोच."

याचें कारण ज्या त्या कामांत मी शहाणा; माझ्याच तंत्रानें सर्व गोष्टी चालल्या पाहिजेत असा टिळकांचा आग्रह असे. टिळक अर्थात्‌च शहाणे होते, पण त्यांच्यासारखा एकटा मनुष्य कितीही शहाणा झाला तरी तो कांहीं सर्वज्ञ नसतो. कोणत्याही बाबीसंबंधांत साधक बाधक सर्व गोष्टींचा यथार्थ निर्णय ठरण्यास चार शहाण्या लोकांचींच डोकीं एकत्र यावीं लागतात. या अगदीं साध्या तत्त्वाची जाणीव टिळकांच्या कुशाग्रबुद्धीस होऊं नये हें खरोखरच आश्चर्य होय.

---

## लेख तिसरा.

### निश्चित ध्येयाचा अभाव.

टिळकांच्या स्वभावांतील ही कज्जेखोरपणाची लकेर त्यांच्या अगदीं बालवयांत सुद्धां दिसून येत असे. यासंबंधाची चरित्रकारांनीं एक आख्यायिका दिली आहे. पुणें येथील सिटी स्कुलांत असतां एकदां शुद्ध लिहिण्यांत "संत" हा शब्द तीन चार वेळां आला. तो या विद्यार्थ्यानें एकसारखा न लिहितां एके ठिकाणीं 'संत', दुसरीकडे 'सन्त' तिसरे जागीं सन्‌त' अशा तीन रीतींनीं लिहिला शिक्षकानें पहिला शब्द कायम करून बाकीच्या चुक्या धरल्या. त्यावरून तंटा वाढला, तो इतका कीं अखेर तो हेडमास्तरपर्यंत जाऊन जेव्हां व्यवस्था लागली व ती टिळकांच्या मनाप्रमाणें लागली तेव्हांच स्वारी स्वस्थ बसली. वरिष्ठाबरोबर तंटे करण्याच्या संवयीमुळें यांचें नांव हुषार पण तंटेखोर, बुद्धिमान् पण हट्टी अशा सदरांत गेलें. ह्या त्यांच्या स्वभावामुळें चार

लोक वागतात त्यापेक्षां कांहीं निराळया तऱ्हेनें वागून गमतीची हुल्लड उडवून द्यावी असें त्यांना नेहमीं वाटत असे.

सर्व गोष्टी केवळ आपल्याच तंत्रानें चालल्या तर ठीक, नाहीं तर बेलाशक हमरीतुमरीवर यावयाचें असें एकदां मनुष्याला व्यसन लागलें म्हणजे उलट पक्षाचा पाडाव करण्याकरितां नाना तऱ्हेच्या हिकमती लढविणें, प्रतिपक्ष्यावर येन केन प्रकारेण मात करण्याकरितां हव्या त्या युक्त्या प्रयुक्त्या योजणें, सत्यासत्याचा विधिनिषेध न राहणें या गोष्टी आपोआपच विकास पावूं लागतात.

टिळकांचा आयुष्यक्रम म्हणजे या विकासाचें कायमचें उघडलेलें प्रदर्शनच होय असें कोणीं म्हटल्यास त्याजवर अतिशयोक्तीचा आरोप येईल असें आम्हांस वाटत नाहीं. भांडखोरपणासही मनोरंजकत्व आणण्यास लागणारा हूडपणा व विक्षिप्तपणा यांचीही त्यांच्या ठिकाणीं समृद्धि होती. या त्यांच्या गुणांमुळें कॉलेजांतील "त्यांच्या मार्मिक स्नेही मंडळींनीं त्यांना 'डेव्हिल' ( सैतान ) ही पदवी दिली होती. तसेंच त्यावेळेपासूनच त्यांच्या अंगीं स्पष्टोक्ति व तोडून बोलण्याची संवय असल्यामुळें, कॉलेजांत चालू असलेल्या केनिलवर्थ नांवाच्या कादंबरींतील ब्लंट नामक एका पात्राचें नांवही त्यांना मिळालें होतें." असा चरित्रकारांनीं एके ठिकाणीं निर्देश केला आहे.

सिटी स्कूलप्रमाणें हायस्कुलांतही टिळकांचा अशाच कांहीं कारणामुळें बेबनाव झाला होता. "हायस्कुलावर त्यावेळीं जेकबसाहेब हेडमास्तर होते. त्यांचे अमदानींत शिस्त हा गुण बुद्धिमत्तेपेक्षां अधिक मानला जात असे. कोणा एका पुस्तकावरून टिळकांचें व संस्कृत शास्त्र्याचें भांडण झालें. त्यांत साहेबांनीं शास्त्रीबुवांचा पक्ष धरल्यामुळें टिळकांनीं सरकारी हायस्कूल सोडलें व त्यावेळीं प्रसिद्ध असलेल्या बाबा गोखल्यांच्या शाळेंत ते जाऊं लागले. पण जेकबसाहेब जाऊन कुंटे हे हायस्कूलचे हेडमास्तर झाल्यावर ते फिरून हायस्कुलांत परत आले." "बुद्धिमत्तेस शिस्तीच्याही वर नंबर दिला पाहिजे." असें या अवतरणांतील दुसऱ्या वाक्यांत

किंवा खटपटींचें ध्येय केवळ प्रतिपक्ष्यावर त्या त्या बाबतीपुरता जय मिळविणें हें असल्यानें त्यांच्या कर्तबगारीचें व पराक्रमशीलतेचें महत्त्व केवळ तात्पुरतें राहिलें. चरित्रकार एके ठिकाणीं म्हणतात:—

" यांतील बरेचसे वाद आतां जळून गेलेल्या शेगटीप्रमाणें निवाले आहेत व तसले वाद फिरून उत्पन्न होण्याचा फारसा संभवही नाहीं. यामुळें आज या वादांचें पर्यालोचन केवळ इतिहास कौतुकाच्या दृष्टीनेंच करावयाचें आहे. तथापि टिळकांच्या अंगच्या स्वभावगुणांचा परिचय या निरीक्षणानें होणारा आहे. "

या वादांपासून टिळकांच्या अंगच्या स्वभावगुणांचा परिचय होईल अशा दृष्टीनेंच आम्ही हें निरीक्षण करीत आहोंत हें सांगावयास नकोच. टिळकांनीं ज्या चळवळी केल्या किंवा वादामुळें आयत्या उत्पन्न झालेल्या ज्या चळवळींत ते पडले तें त्यांना त्यांत कांहीं विशिष्ट तत्त्व साधावयाचें होतें म्हणून नव्हे तर आपल्या वादप्रवीण बुद्धीला विपुल व्यवसाय मिळावा म्हणून पडले आणि एक वाद संपवून दुसरा मिळाला कीं पहिल्या वादाचें सर्वस्वीं विस्मरण व्हावें किंवा चरित्रकारांनीं म्हटल्याप्रमाणें तो जळून गेलेल्या शेगटीप्रमाणें निवावा हा परिणाम तरी याच कारणानें झाला. " हिंदुमुसलमानांचे दंगे " या प्रकरणांत चरित्रकार ह्मणतात:—

"सार्वजनिक सभेनें आपल्या मंदगतीनें पोलिस ॲक्टाचा निषेध चालविला होता. व मार्केटच्या सभेंत टिळकप्रभृति लोकांची जी कमिटी नेमण्यांत आली तिचेंही काम सुरू झालें. पण पुढच्या सालीं पुणें म्युनिसिपालिटी व कायदे कौन्सिलच्या निवडणुकी आणि पुण्यास बोलावलेल्या राष्ट्रीय सभेची तयारी वगैरे अधिक महत्त्वाचे विषय पुढें आले व वादाच्या मुहूर्तमेढी नव्या रणक्षेत्रांत रोंवल्या गेल्या. व हिंदुमुसलमानांच्या दंग्याची आठवण मागें पडली ती पडलीच. "

हिंदुमुसलमानांच्या दंग्यासारखा प्रश्न. या दंग्याची पुनरावृत्ति कशी टळेल येथपर्यंत या वादाची मजल आली तोंच नवे वादाचे विषय निघून

टिळकांचें मन त्यांतून जें एकदां निघालें तें पुनः म्हणून त्याकडे वळलें नाहीं! कोणतीही बाब घेतली तरी टिळकांच्या मनःप्रवृत्तीचा हा नमुना अचुक पहावयास सांपडतो. असें जरी होतें तरी एक गोष्ट प्रांजलपणें कबूल केली पाहिजे कीं, बाबत कोणतीही कां असेना, तींत एकदां टिळक पडले कीं तिला रंग हा यावयाचाच. एक बाब हातांत घेतली कीं अहोरात्र जिवाचें रान करून टिळक ती सायसंगीन सजवून ठेवावयाचे. ती खरी असली तर ठीकच. खरी नसली तरी ती शहाजोग खरी दिसावी अशी सर्व व्यवस्था त्यांच्या हातून जय्यत व्हावयाची. त्या कामीं धर्मशास्त्र, कर्मशास्त्र, व्यवहारशास्त्र, निदान लटपट शास्त्र हाताशीं घेऊन आपल्या बाजूस कोणत्याही प्रकारचा उणेपणा राहूं नये अशी तयारी राखण्यांत त्यांचा हातखंडा असे. पण आम्हीं वर सांगितल्याप्रमाणें आपल्या व्यवसायात्मिका बुद्धीस कांहीं तरी खाद्य मिळत आहे हीच त्यांची दृष्टि या सर्व खटपटींत प्रधान असे. आणि कोणत्याही खटपटींत कारस्थान, पाताळयंत्रीपणा, वस्तादगिरी हे गुण जास्त लागतील तितके त्यांच्या बुद्धीचे स्नायु टणटण उडूं लागून त्यांना काम करण्यास विशेष हुरूप येई.

संमतिवयाच्या बिलाचा वाद, ग्रामण्यप्रकरण, शारदासदन, राष्ट्रीय सभेच्या मंडपाचा वाद, कोणतीही गोष्ट घेतली तरी त्यांच्या अंगचें हें वैशिष्ट्य कमीअधिक प्रमाणानें विशेष खुलून दिसे. हातीं घेतलेल्या कामाशीं त्यांची होणारी एकतानता निःसंशय सर्वथा प्रशंसनीय आहे. पण या चळवळी हातीं घेण्यांत त्यांचें कांहीं तरी निश्चित धोरण किंवा तत्त्व असेच असा कांहीं नियम नसे. उदाहरणार्थ, ग्रामण्य प्रकरणच घ्या. हें प्रकरण केवळ टिळक होते म्हणूनच रंगलें हें निर्विवाद आहे. पण त्यांत त्यांना कांहीं समाजोपकारक किंवा सुधारणोपकारक हेतु साधावयाचा होता अशी वस्तुस्थिति मुळींच नव्हती. या बाबतींत शंकराचार्यांच्या प्रतिनिधींपुढें त्यांनीं सुधारकांतर्फे वाद सांगितला ही केवळ यदृच्छया घडलेली गोष्ट होय

चहापानांत ते स्वतः सांपडले नसते तर विरुद्ध पक्षास उत्तेजन देऊन त्यांनीं सुधारक पक्षाचीही मौज उडवून देण्यास कमी केलें नसतें. फार कशाला, स्वतः चहा पिऊनही पुनः ते वादीचे म्हणजे नातू पक्षाचे वकील बनले नाहींत हें भाग्यच होय. कारण टिळकांच्या आयुष्यक्रमांतील अनेक अद्भुत गोष्टींप्रमाणें हीही गोष्ट घडण्याचा लाग आला होता. यासंबंधानें चरित्रकार लिहितातः—

"त्या वेळची माहिती असलेले एक गृहस्थ सांगतात कीं, नातुपक्षानें जर टिळकांना प्रथमच किंचित् सवलत देऊन सहानुभूतीनें वागविलें असतें तर त्यास आपल्या पक्षातर्फे सुधारकांशीं भांडण्याला वकील म्हणून टिळक लाभले असते. पण नातुपक्षाकडे सूक्ष्म विवेक ही गोष्ट केव्हांच नव्हती. कोणतीही गोष्ट अगदीं एका टोंकापर्यंत नेऊन खेंचावयाची व तेथेंच खुंटीला वेढा देऊन दोरी तुटेपर्यंत ताणून धरावयाची हें त्यांचें धोरण नेहमींचेंच असे. यामुळें या प्रसंगीं टिळक हे नातुपक्षाचे वकील न बनतां प्रतिवादी बनले."

नातुपक्षाच्या अदूर दृष्टीमुळें टिळकांच्या चरित्रांतील हा अद्भुत भाग अचानक गळला ही हळहळ वाटण्यासारखी गोष्ट नाहीं असें कोण म्हणेल? वरील मजकूर वाचून कोणासही एखाद्या धंदेवाईक पहिलवानाची आठवण होईल. तो जसा सदासर्वदा कुस्त्यांचे फड हिंडत असावयाचा त्याप्रमाणेंच टिळकांची स्थिति होती!

गोपाळराव गोखले यांनीं या ग्रामण्यावर पूर्णपणें बहिष्कार घातलेला होता. माधवराव रानड्यांनीं प्रायश्चित्त घेतलें; पण तें सरळपणानें व राजरोस घेतलें. पंच हौद मिशनमध्यें "रानड्यांनीं चहाचा पेला तोंडाला सुद्धां लावला नव्हता ही गोष्ट त्यांनीं प्रसिद्ध केली असती तर त्यांच्या शब्दावर लोकांनीं विश्वास ठेविला असता व त्यांच्या मार्गे कोणीही लागलें नसतें. रानड्यांनीं प्रायश्चित्ताचा कांहीं तोडगा करावयाचें मनांत आणलें असतें तर त्यांना ती गोष्ट फार सोपी होती." वस्तुतः

प्रायश्चित्त घेण्याचें त्यांना कांहींही कारण नव्हतें. पण आपल्या कित्येक स्नेह्यांना त्यांना घरीं होणाऱ्या त्रासांतून सुटण्याकरितां प्रायश्चित्ताचा मार्ग मोकळा करावा या हेतूनेंच रानड्यांनीं प्रायश्चित्त घेतलें; पण टिळकांच्या प्रायश्चित्ताची गोष्ट याहून अगदीं वेगळी. ती त्यांच्या स्वभावाप्रमाणेंच तिरपगडी होती. तिचें वर्णन आम्ही ग्रंथकारांच्या शब्दांतच करतों. चरित्रकार म्हणतातः—

"रानड्यांना कोणाशीं भांडावयाचें नव्हतें म्हणून त्यांनीं सरळपणें खुद्द पुण्यास येऊन जवळ जवळ जाहीर रीतीनें प्रायश्चित्त घेतलें व पंच हौद-मिशन-चहा आरोपाकरितां घेतलें अशी सरळ कबुली दिली. टिळकांनीं या वादांतील प्रत्येक अंगासंबंधानें व उपांगासंबंधानें वाद घातला. चहापानाकरितां प्रायश्चित्त घेतलें असें कोणीं म्हटलें तर चहा म्हणजे नुसतें पाणी, दूध व साखर व चहाचा पाला. हीं ख्रिस्त्याच्याही हातून घेतलीं तरी त्यांत दोष नाहीं असें स्मृतिग्रंथावरून सिद्ध करण्यास ते तयार ! टिळकांनीं प्रायश्चित्त घेतलें नाहीं असें कोणीं म्हटल्यास हा विधि मीं काशीस गंगास्नानानें व पुण्यास सर्व-प्रायश्चित्तरूपानें उरकलेलाच आहे असेंही प्रतिपादण्यास त्यांची तयारी. चहाकरितां प्रायश्चित्त घेतलें असें कोणीं म्हटलें तर चहापानाच्या पातकाचा संकल्प किंवा उच्चार केला नव्हता अशी शपथ वहाण्यास ते मोकळे !"

वरील उताऱ्यावर टीका करण्याचें कारण आहे असें आम्हांस वाटत नाहीं. टिळक हे कोणत्या प्रकारचे गृहस्थ होते याचें मर्म वरील उताऱ्यावरून वाचकांच्या जसें नजरेस येईल तसें ते दुसऱ्या कशानेंही येणें शक्य नाही असें आम्हांस वाटतें.

चहाप्रकरणाची चरित्रकारांनीं जी हकीकत दिली त्या हकीकतींत एक मुद्याची गोष्ट यावयाची राहिली आहे. टिळक हे प्रसंगीं सत्यासत्याच्या विचारावरही तिलांजलि देण्यास कसे तयार असत हें या गोष्टीवरून

शहाजोग रीतीनें सिद्ध होत असल्यामुळें तिचा येथें निर्देश करणें आम्हांला जरूर वाटतें. बालशिक्षणमालेच्या टिळक अंकांत "माझ्या आठवणी" हा एक लेख 'लोकमान्यांच्या सहाध्यायी मित्राकडून' लिहिलेला प्रसिद्ध झाला आहे. त्यांत हे सहाध्यायी म्हणतात:—

"असेंही आठवतें कीं, मीं चहा घेतला नव्हता असें जरी बळवंत रावांचें म्हणणें होतें, तथापि चहा घेतल्याचा त्यांच्यावरील आरोप शंकराचार्यांच्या न्यायापुढें शाबीत झाला व तो त्यांनीं शिरसा मान्य केला."

पुराव्यानिशीं शाबीत झालेला आरोप मान्य करण्याशिवाय गत्यंतरच नसतें. पण आरोप शाबीत होऊनही गुन्हा कबल न करण्याचा टिळकांनीं आग्रह धरला नाहीं हीही कांहीं लहान सहान गोष्ट नाहीं! वरील गोष्ट लेखकानें केवळ आठवणीनें लिहिली आहे तेव्हां ती खरी कशावरून असा यासंबंधांत प्रश्न उपस्थित होण्यासारखा आहे. पण बालशिक्षणमालेच्या या अंकांचीं सर्व प्रुफें टिळकांच्या नजरेखालून गेलेलीं आहेत हें लक्षांत ठेविलें म्हणजे वरील हकीकतीचा खरेपणा हमखास सिद्ध होतो. हा अंक प्रसिद्ध झाला त्या वेळेस चिरोल प्रकरण चालू होतें. त्यामुळें या प्रकरणांत आपल्याला बाधक व चिरोलला साधक असें एखादें विधान चुकून प्रसिद्ध होऊं नये अशी खबरदारी घेणें अवश्य वाटल्यामुळेंच सदर अंकाचीं सर्व प्रुफें टिळकांनीं स्वतः पाहिलीं होतीं. चहा घेतला अशी वस्तुस्थिति असतां "मीं चहा घेतला नाहीं" असें टिळकांनीं बेधडक सांगितलें, या गोष्टीच्या खरेपणाबद्दल म्हणूनच संशय घेण्याचें बिलकुल कारण रहात नाहीं. मीं चहा घेतला नाहीं हें टिळकांचें विधान पचलें असतें तर नातूपक्षाचें वकीलपत्र घेण्याचा त्यांचा संकल्प अर्थातच सिद्धीस गेला असता. रानडेपक्षाचें वकीलपत्र टिळकांच्या गळ्यांत पडलें तें अनिर्वाहपक्षीं पडलें आणि नातूपक्षाशीं मिळून रानडेपक्षाची गंमत पाहण्याच्या कौतुकास त्यांना निरुपायानें मुकावें लागलें, अशीच यासंबंधांतील वस्तुस्थिति असावी असें आम्हांस वाटतें. "मीं चहा घेतला नाहीं"

हें टिळकांचें विधान खोटें आहे हें नातूपक्षाच्याच सटपटीनें शाबीत झालें आणि नातूपक्षानें टिळक आपल्या हातचे जाऊं देण्यांत जो सूक्ष्म विवेकाचा अभाव दाखविला असें चरित्रकार म्हणतात तो हाच असावा.

---

## लेख चौथा.

### विध्वंसक कामाची आवड.

टिळक वादांत शिरत असत, ते तत्त्वबोध होण्याकरितां शिरत नसून कांहीं तरी हिकमत लढवावयास सांपडावी याकरितां शिरत असत. आपण चळवळ करतों, तिचा परिणाम काय होत असेल, याची ते केव्हांही फिकीर करीत नसत. अनेक प्रकारच्या शकला व कोटच्या लढवून कोणाच्या तरी पाडाव करण्याची आपली हौस भागली म्हणजे झालें, मग यांत कोणाची निष्कारण अपकीर्ति झाली किंवा कोणाच्या अंगावर नाहक एखादी तोहमत कोसळली तरी त्याची त्यांना क्षिति नसे. स्वतः नवीन चित्र तयार करण्याच्या प्रयत्नांत केव्हांही पडावयाचें नाहीं, पण लोकांनीं काढलेलें चित्र मात्र चिताड करून टाकण्याचें, संधि केव्हांही वायां जाऊं द्यावयाची नाहीं हा टिळकांचा कायमचा व्यवसाय ठरून गेला होता.

शारदासदनावर त्यांनीं कसून टीका केली; पण त्याबरोबरच आपल्या मुलींच्या शिक्षणाची आपल्यावर स्वतंत्र जबाबदारी येते, याची त्यांना केव्हांही जाणीव नसे. यासंबंधांत त्यांचे बंधु मराठाकार प्रो. वा. बा. केळकर यांनीं त्यांना दिलेलें उत्तर फारच समर्पक आहे. १८९१ च्या जून जुलै महिन्यांत जेव्हां या सदनासंबंधाचा वाद जोरांत आला, त्या वेळेस टिळकांना उद्देशून मराठाकार म्हणतात, "शारदासदन हें सर्वस्वी पुराणमतवादी पद्धतीनें चालेल किंवा चालावें, अशी फुकटच्या हिंदू समा-

जानें अपेक्षा तरी कां करावी ? त्यांतल्यापेक्षां अधिक जुन्या पद्धतीचें शिक्षण पाहिजे असल्यास त्यांनीं वर्गण्या काढून स्वतंत्र संस्था कां काढूं नये ? सरकारी शाळेंत जितक्या बेताची धार्मिकदृष्ट्या तटस्थ वृत्ति राहूं शकेल, तितकी पंडिता रमाबाई यांची राहिली म्हणजे बस्स झालें. ”

या मुद्यासंबंधांत खुद्द पंडिता रमाबाईनें दिलेलें उत्तर तर याहीपेक्षां खडखडीत आहे. त्या म्हणतात, “ आमच्या देशबंधूंनीं योग्य आश्रय व उत्तेजन दिलें असतें, तर शारदासदन ही संस्था ख्रिस्ती होण्याची कांहींच जरूर नव्हती. ही संस्था ख्रिस्ती होऊं नये म्हणून पूर्वीं पुष्कळ प्रयत्न झाला होता व अजूनही तो सुरू आहे. हिंदु लोक असली शाळा घालण्याकरितां पैसे देईनात म्हणून मीं ख्रिस्ती लोकांपाशीं भिक्षा मागितली. आतां तुम्ही ती शाळा चालविण्यास सिद्ध असाल, तर आमच्या ख्रिस्ती आश्रयदात्यांकडून बिलकुल अडथळा येणार नाहीं. तुम्ही खर्च द्या, हवे ते शिक्षक नेमा, एकाद्या हिंदू बाईला शाळेची मुख्य करा. तसें झालें तरी मूळ हेतूला अनुसरून आम्ही ख्रिस्ती लोक तुम्हांस मदतच करूं. कोणतेंही काम स्वतः करण्यापेक्षां लोकांच्या कामांतील दोष दाखविणें हें फार सोपें आहे, हें आम्हांला व तुम्हांलाही माहीत आहे. ”

या लोकोत्तर, तेजस्वी व निग्रही बाईचा हिंदु समाजास, त्या हिंदु समाजांत राहूनच, उपयोग झाला नाहीं याची गुन्हेगारी त्या समाजावरच कशी येते, हें वरील अवतरणावरून लक्षांत येईल. बाई ख्रिस्ती झाल्या ही गोष्ट निःसंशय शोचनीय होय ! पण स्त्रीशिक्षणाची आपल्या हातून कांहीं विधायक कामगिरी व्हावी ही आपली इच्छा, धर्मांतराचा गौण मार्ग पत्करूनही, बाईनीं शेवटास नेली, यावरून, स्वतःच्या ध्येयाबद्दल बाईंना किती उत्कटता वाटत होती हें दिसून येतें व त्याजबरोबरच बाईच्या टीकाकारांचें ‘ परोपदेशे पांडित्य ’ सर्वस्वी कसें विघातक होतें, हेंही दृष्टोत्पत्तीस येतें. असो. पुढें शारदासदनांतून मुली निघाल्या तेव्हां

त्यांची सोय करण्याची जबाबदारी येथील फीमेल हायस्कूलनेंच आपल्यावर घेतली. शारदासदनापूर्वी या हायस्कुलासही टिळकांच्या विध्वंसक टीकेचा हल्ला सोसावा लागला होताच. पण दोन्ही संस्थांवर केवळ टीका करण्यापलीकडे टिळकांच्या हातून अन्य कार्यभाग कांहींच झाला नाहीं. टिळकांना स्त्रीशिक्षण अर्थातच पाहिजे होतें; पण तें हिंदु-परंपरेनें झालें पाहिजे होतें व तें परस्पर म्हणजे स्वतःस यत्किंचितही तोशीस न लागतां लोकांच्या स्वावलंबी प्रयत्नांनीं व्हावयास पाहिजे होतें, हें विशेष लक्षांत ठेवण्याजोगें आहे. त्याकरितां स्वतः पुढें पडून कांहीं विधायक प्रयत्न करावा अशी अवश्यकता त्यांना केव्हांही वाटली नाहीं. लोकांनीं संस्था काढाव्यात व त्यांतील दोष दाखवून टिळकांनीं त्या संस्था अप्रिय कराव्यात असाच संस्था चालविणारे व टिळक यांच्यामध्यें श्रमविभाग ठरून गेला होता !

गणपतीच्या उत्सवासंबंधांतही उत्सवामुळ इतरांवर शेकणाऱ्या दुष्परिणामाबद्दल टिळकांची बेफिकिरी होती. या उत्सवांत मेळ्याकरितां जीं पदें करण्यांत येत, त्यांपैकीं सभ्यतेच्या व शिष्टाचाराच्या दृष्टीनें कित्येक आक्षेपार्ह असत. उत्सवास जसें एकदम सार्वजनिक स्वरूप प्राप्त झालें त्याप्रमाणें मेळ्याकरितां कविता करणाऱ्या कवींचीही झटपट उत्पत्ति होऊं लागली. या कवींचें नियंत्रण करण्याकरितां कांहीं तरी तजवीज करणें हें उत्सवांतील पुरस्कर्त्यांचें काम होतें. पण कोणीकडून तरी चार दिवस धामधूम झाली कीं, आपला कार्यभाग झाला एवढीच सार्वजनिक कामाबद्दलची ज्यांची आकुंचित दृष्टि होती, त्यांना हें अवश्य कर्तव्य आपल्या अंगाबाहेर टाकण्यांत यत्किंचितही संकोच वाटला नाहीं. मेळ्यांत म्हटल्या जाणाऱ्या पदांवरील आक्षेपांना उत्तर देतांना चरित्रकार म्हणतातः—

" उत्सवाच्या निमित्तानें साऱ्या कवींचें रान एकदम फुललें. त्यांत कविता बरी असणार किंवा वाईटही असणार. " टला " ट, व " प " ला

"प" जुळविणाऱ्या कवींना कवित्वाची हौस आली, तर तिला नको कोणीं म्हणावें ? कवि जसे अनेक दर्जाचे तसेच श्रोतेही. जे ते आपआपल्या निवडीप्रमाणें हवें तें निवडून घेतच असतात. त्याबद्दल दुसऱ्यांची तक्रार काय म्हणून ? पद्यांत राजद्रोह घडला किंवा व्यक्तींची बेअब्रू झाली तर त्याचा इलाज करण्यास कायदेशीर मार्ग आहेत."

याचें नांव सार्वजनिक उत्सव ! आणि तो चालविणारेच खरे लोकनायक! असें वरील उतारा पाहून कोण म्हणणार नाहीं ? कवींना हव्या त्या कविता करण्याचें स्वातंत्र्य, त्यांतील विचार आपापल्या आवडीप्रमाणें निवडून घेण्यास श्रोत्यांना पूर्ण स्वातंत्र्य व यांत एखाद्याची बेअब्रू झाली किंवा राजद्रोह घडला कीं आरोपी बनून परस्पर शिक्षा भोगण्यासही स्वातंत्र्य ! यावरून आपण हातीं घेतलेल्या कार्यासंबंधांत, कोणावर निष्कारण व नाहक अरिष्ट ओढवूं नये, इतकी साधीही सावधगिरी बाळगणें टिळकांना अवश्य कसें वाटत नव्हतें, हें उघड होतें. तरी सुद्धां, आपण लोकमताला वळण देण्याचें कार्य करीत आहोंत असा बहाणा ते करीतच असत ! पण चळवळीसंबंधांत वस्तुतः त्यांचें वर्तन म्युनिसिपालिटीचे कंदील लावणाऱ्या माणसाप्रमाणें असे. तो जसा झपाझप कंदील लावीत जातो, मग एखादा कंदील लागला नाहीं, दुसरा लागतांच विझला, व तिसरा लागून भडकला तरी तो मागें वळून पहात नाहीं, आपली शिडी व लायटर घेऊन पुढेंच धूम ठोकीत जातो, त्याप्रमाणेंच चळवळीसंबंधांत टिळकांची स्थिति होती.

टिळकांना ही जबाबदारी वाटत नव्हती, याचें कारण स्वतःच्या अंगावर घेऊन त्यांनीं एखाद काम केलें असें क्वचितच घडलें. बाकी त्यांची सर्व प्रतिष्ठा लोकांच्या कुचेष्टेंतूनच जन्मास येत होती. फक्त १८९६ च्या एप्रिलच्या मध्यास रायगडावर जो उत्सव झाला त्या वेळेस मात्र एकंदर परिस्थितिच अशी जमून आली कीं, त्या उत्सवाची सर्व

जबाबदारी आपोआपच टिळकांच्या अंगास येऊन चिकटली. या उत्सवास कुलाब्याच्या कलेक्टरांनीं अगदीं आयत्या वेळेस परवानगी नाकारली' तेव्हां परवानगी मिळविण्याकरितां टिळकांना महाबळेश्वरास खेटा घालावा लागला. प्रथम त्यांनीं कौन्सिलदारांची मनधरणी केली; पण त्यांनीं त्यांस धुडकावून लाविलें. नंतर टिळकांनीं खुद्द गव्हर्नरसाहेबांची आराधना केली व तेव्हां ते कायदे कौन्सिलचे सभासद असल्यामुळें गव्हर्नरसाहेबांनीं प्रसन्नता दाखवून परवानगी दिली. ही परवानगी मिळण्यास त्यांना फार प्रयास पडले व कार्यभार प्रत्यक्ष शिरावर पडला म्हणजे मनुष्यास कसें नमून व मिळतें घ्यावें लागतें, याचा आयुष्यांत, एकदां कां होईना, त्यांना चांगला अनुभव घ्यावयास सांपडला. त्यांच्याच कलमांतून निघालेल्या लेखांतून पुढें जो उतारा दिला आहे, त्यावरून टिळकांनाही कसें मवाळ बनावें लागलें होतें हें दिसून येईल. या लेखांत ते म्हणतात:—

" या उत्सवासंबंधानें अनेक लोक खोटेंनाटें लिहून सरकारचा गैरसमज करण्यास प्रवृत्त होतील, हें सांगावयास नकोच. यापूर्वींच तशी थोडीबहुत सुरुवातही झाली आहे. नसता दाब आपणावर कोणी लादला-तर आपण त्यास दाद देणार नाहीं हें खरें. तथापि राज्यकर्त्यांची वृत्ति आपणांविषयीं कशी आहे, याचें मनन केलें तर त्यास नांवें ठेवण्यास जागाच मिळूं नये, असें आपलें वर्तन असलें पाहिजे. म्हणून चालकांनीं व रायगडीं जमणाऱ्या लोकांनीं आपल्या वर्तनांत, हालचालींत व भाषणांत राखवेल तितका **नेमस्तपणा** राखावा, हें मीं सांगावें असें नाहीं."

यांतील नेमस्तपणा हा शब्द वाचकांच्या ताबडतोब नजरेस यावा म्हणून आम्हीं ठळक टाईपांत छापला आहे. ज्या गुणाबद्दल प्रागतिकांची 'मवाळ' म्हणून टवाळी करण्यांत टिळकांनीं व त्यांच्या अनुयायांनीं प्रतिष्ठा मिरविली तोच नेमस्तपणाचा गुण लोकांनीं केवळ आपल्या भाषणांत नव्हे, तर वर्तनांत व हालचालींतही वापरावा असा इषारा खुद्द

टिळकांच्या हातून त्यांच्या केसरी पत्रांतूनच प्रसिद्ध व्हावा, ही गोष्ट खरोखरच अपूर्व असें लोकांना वाटेल. पण, खरी अपूर्वता या शब्दांत नसून, टिळकांनीं प्रत्यक्ष स्वतःच्या गळयांत घेतलेल्या कामगिरींतच होती. इतर प्रसंगाप्रमाणें सरकारकडे लोकांनीं शिष्टाई करून जनतेची सोय करून देण्याचा प्रयत्न करावयाचा आणि टिळकांनीं नीट सोय झाली नाहीं म्हणून सरकारावर व शिष्टाई करणारांवर, यथेच्छ झोड उठवून, लोकमान्य बनावयाचें, असा हा प्रसंग नव्हता. तसाच हा प्रसंग असता व रानडेपक्षांतील एखाद्या प्रमुख माणसानें लोकांना नेमस्तपणानें वागण्याबद्दल उपदेश केला असता, तर टिळकांनीं, भेकडपणाबद्दल त्याची शेलक्या शिव्यांनीं पूजा बांधण्यास कधींही कमी केलें नसतें !

यानंतर सुमारें एक वर्षानें सार्वजनिक सभेसंबंधांत सरकारकडून आलेल्या पत्रास उत्तर देण्याच्या कामीं, रायगडच्या उत्सवासंबंधांत मिळालेल्या या शहाणपणाचा उपयोग करण्याची टिळकांना सुबुद्धि झाली असती तर टिळकांच्या हातीं ती सभा आल्याबरोबर तिला जें तडकाफडकी मरण आलें तें निदान कांहीं काळ तरी पुढें ढकलतां आलें असतें; पण त्यांच्या मूळ स्वभावानें उचल खाल्ल्यामुळें या नेमस्तपणाचें त्यांना अर्थातच स्मरण राहिलें नाहीं. कोणतीही गोष्ट हातीं घेतली म्हणजे तिला येणाऱ्या निरनिराळ्या भल्याबुऱ्या अवस्थांतून, ती पैलतीरास कशी पोहोंचवावयाची, इतकी टिळकांची दूरवर दृष्टि असती, तर चरित्रकारांना आपल्या ग्रंथास चरचरितपणा आणण्यास अनेक भाकड कथांची उचापत केव्हांही करावी लागली नसती.

## लेख पांचवा.

### टिळकांचा हातावरील प्रपंच.

सार्वजनिक सभा काबीज केल्यावर लोकांच्या डोळ्यांत भरण्यासारखी कांहीं तरी कामगिरी करून दाखवून पूर्वींच्या लोकांपेक्षां आपण अधिक कार्यक्षम व तेजस्वी आहोंत हें दाखविण्याची टिळकांना स्वाभाविकच इच्छा झाली. याच सालच्या म्हणजे १८९६ सालच्या अखेरीस जाणवण्यासारखा दुष्काळ पडला. दुष्काळासंबंधाची ठिकाठिकाणची परिस्थिति समजावून घेण्यास व लोकांनीं आपल्या आपत्तीची दाद लावून घेण्याकरितां कोणते मार्ग स्वीकारावे याबद्दल त्यांना माहिती देण्यास टिळकांनीं सार्वजनिक सभेमार्फत एजंटांचा एक तांडा पाठविला. टिळकांचाच तांडा तो, तेव्हां त्याला स्वतःचें शहाणपण चालविण्याचा मोह अनावर व्हावा, यांत कांहीं आश्चर्य नाहीं. त्यांतील एका ‘ एकसंबेकर ’ नांवाच्या एजंटानें धारवाड जिल्ह्यांत सभेचें काम करीत असतां खालीं दिलेला मजकूर असलेलें एक हस्तपत्रक प्रसिद्ध केलें.

“ चालू दुष्काळांत एकही मनुष्य उपासमारीनें मरूं नये अशी राणी सरकारची इच्छा असून त्याप्रमाणें व्हाइसराय साहेबांना तारही आली आहे. मुंबई सरकारचा रेव्हिन्यु कामिशनर लोकांना असा हुकूम आहे कीं जेथें पीक सहा आणेपर्यंत आलें असेल, तेथें शेतसारा एकदम माफ करावा व बारा आणे पीक आलें असल्यास एक वर्षाची तहकुबी द्यावी. ”

या हस्तपत्रकांतील मजकूर निराधार असल्यामुळें सरकारनें एक पत्र पाठवून सार्वजनिक सभेकडे याबद्दल तावडतोब खुलासा विचारला. एकसंबेकर हे सभेचे खरोखरच एजंट आहेत काय ? असले तर त्यांच्या

विधानांची जबाबदारी आपल्या शिरावर घेण्यास सभेची तयारी आहे काय ? असे दोन मुद्याचे प्रश्न सरकारनें या पत्रांत विचारले होते. हस्तपत्रकांत वरील मजकूर एकसंबेकरांनीं आपल्याच शहाणपणानें घातला होता. अर्थात् वरील प्रश्नांपैकीं पहिल्या प्रश्नास अस्तिपक्षीं व दुसऱ्या प्रश्नास नास्तिपक्षीं उत्तर देणें हाच सरळ मार्ग होता; पण आपल्या हातून प्रत्यक्ष झालेली किंवा जबाबदारीमुळें अप्रत्यक्षतया आपल्या गळ्यांत पडलेली चूक प्रांजलपणें कबूल करण्यास लागणारा संभावितपणा व दूरदर्शीपणा सभेच्या नवीन चालकांत नसल्यामुळें त्यांनीं आपल्या स्वभावास अनुसरून या बाबतींतही आडमार्ग स्वीकारला. आधीं सभेनें या पत्राचें उत्तर पाठविण्यास महिन्याहून अधिक काळ लावला. या गोष्टीनेंच सभेची बाजू लंगडी आहे हें सिद्ध झालें होतें. सभेनें वरील पत्रास असें उत्तर दिलें कीं, " एजंट लोकांनीं काढलेलीं सभांचीं हस्तपत्रकें सार्वजनिक सभेकडे आगाऊ पसंतीला येत नसतात. तेव्हां त्यांतील कोणतें विधान बरोबर, कोणतें चूक, याचा निर्वाळा सभेनें कसा द्यावा ? "

एजंट लोक सभेला कांहीं एक न विचारतांसवरतां आपलीं हस्तपत्रकें काढतात हें या उत्तरांत कबूल करून, कोणाचा पायपूस कोणाच्या पायांत नाहीं असा सभेचा कारभार बेबंदशाहीचा आहे हें सभेनें कबूल केलें. पण सभा येवढेंच करून थांबली नाहीं. तिच्या शहाणपणाची मजल याहीपुढें गेली. एकसंबेकरांनीं केलेल्या विधानांच्या शुद्धाशुद्धतेचा निर्वाळा आपल्याला देतां येत नाहीं असें म्हणून त्यांच्या विधानांचें समर्थनही करण्याचा सभेनें विचित्र व हास्यास्पद प्रयत्न केला. " एकसंबेकर यांना सभेकडून सर्वसाधारणपणें त्यांच्या कामाविषयीं ज्या सूचना देण्यांत आल्या होत्या त्यांचें कांहीं उल्लंघन एकसंबेकर यांचेकडून झालें असें सभेस दिसत नाहीं. " अशीही सभेनें आपल्या उत्तरांत मखलाशी केली ! एकसंबेकर यांना आपण दगा दिला नाहीं असें वरपांगी दिसावें आणि

त्यांच्या विधानांची प्रत्यक्ष जबाबदारी तर आपल्यावर शेकूं नये अशी सभेनें या उत्तरांत आपल्या मतानें मोठी विलक्षण शकल लढविली. पण या शकलीस शहाणपणा किंवा सरळपणा यापैकीं कशाचेंही पाठबळ नसल्यामुळें तिनें ' सार्वजनिक सभेचा कोणत्याही सार्वजनिक प्रश्नावर सरकारास लोकमत कळविण्याचा हक्क ' नष्ट करण्याचें काम मात्र शहाजोग रीतीनें केलें ! चरित्रकार मात्र सभेच्या या उत्तरास ' तेजस्वी ' हें विशेषण लावतात ! आणि तें एका दृष्टीनें अन्वर्थकही आहे. सार्वजनिक मत कळविण्याच्या सभेच्या हक्काची राखरांगोळी करण्याइतका ज्या उत्तरानें प्रभाव दाखविला त्यास तेजस्वी कोण म्हणणार नाहीं ?

यापूर्वी वीस वर्षे असाच दुष्काळ पडला होता. त्या वेळीं सार्वजनिक सभेनें जवळ जवळ अशाच पद्धतीनें काम केलें होतें. " त्या वेळीं सभेला न झिडकारतां सरकारनें तिचे उलट आभारही मानले आहेत " ही गोष्ट चरित्रकारांनीं नमूद केली आहे. रानड्यांसारख्या महात्म्यांनीं पंचवीस वर्षांच्या परिश्रमानें ज्या संस्थेस सर्व इलाख्यांत ' वजनदार ' अशी संज्ञा प्राप्त करून दिली तिचा टिळकांनीं, कुटिलनीति चालविण्याच्या आपल्या अनावर मोहानें अवघ्या एक वर्षाच्या अवधींत फडशा उडवून दिला ! विधायक कार्यास टिळक सर्वस्वी नालायक होते हेंच या प्रकारावरून उत्कृष्ट रीतीनें ठरलें. त्याचप्रमाणें रानड्यांनीं आपली डेक्कन सभा स्वतंत्र कां स्थापन केली या गोष्टीचेंही वरील प्रकारावरून निर्विवाद रीतीनें समर्थन होतें.

टिळकांच्या मार्गांत हीं गंडांतरें आलीं त्याची जबाबदारी खुद्द त्यांच्यावरच आहे. टिळकांना 'लोकसंग्रह' करावयाचा होता, तसा तो रानड्यांनाही करावयाचा होता. पण टिळकांचा ' लोकसंग्रह ' स्वतःची बडेजावी वाढविण्याकरितां होता, रानड्यांचा 'लोकसंग्रह' समाजोन्नतिकारक कार्यांचा प्रसार व्हावा या हेतूनें होत होता. टिळकांची दृष्टि ज्या वेळीं जो प्रतिपक्षी उपस्थित झालेला असेल त्याला चीत करून आपल्या भोंवतालच्या

संस्था या दृष्टीनें केसरीच्या कारखान्याची व एखाद्या विड्यांच्या कारखान्याची स्थिति सारखीच आहे. येथें विड्यांचे कारखानदारही कित्येक असे निघतील कीं, जे टिळकांच्याप्रमाणें तीन लाख रुपये मागें ठेवून गेले आहेत; त्यांत फरक इतकाच कीं, टिळकांनीं जेजुइटपणाचा बाणा चालविण्याच्या व्रतानें आयुष्यास आरंभ करून शेवटीं इस्टेट राखली आणि बाकीच्या कारखानदारांनीं तशा प्रकारचें कांहींही स्तोम न माजवितां केवळ श्रीमंत होण्याच्या प्रामाणिक हेतूनें आपले धंदे केले. केसरीची इतर दृष्ट्या किंमत कितीही मोठी असली किंवा त्या पत्रास टिळकांच्यासारखा विद्वान्, बहुश्रुत, कल्पक, अष्टपैलु, अकुंठितबुद्धी वा संपादक मिळाल्यामुळें त्या पत्रास कोणत्याही प्रकारचें वैशिष्ट्य प्राप्त झालें असलें, तरी अखेर केसरी कारखाना हा खासगी म्हणजे एका व्यक्तीच्या मालकीचा व व्यक्तीची मालमत्ता झालेला असा कारखाना होता हें विसरून चालणार नाहीं. म्हणूनच संस्था हा शब्द ज्या अर्थानें वर वापरला आहे त्या अर्थानें तो या कारखान्यास लावतां येत नाहीं.

टिळकांच्या चरित्राचा पूर्वार्ध आपण येवढा अगडबंब केला तरी त्यांत चरित्रनायकांची विशिष्ट व विधायक कामगिरी काय दाखवावी ही विवंचना चरित्रकारांनाही पडलेली दिसते. शेवटीं संशोधन करतां करतां त्यांना त्यांची एक मोठी कामगिरी सांपडली. ती म्हणजे सार्वजानिक सभा बळकावल्यानंतर त्या सभेच्या जर्नलमध्यें टिळकांनीं प्रांतिक खंडणीच्या पंचवार्षिक करारावर लिहिलेला निबंध ही होय. यासंबंधानें वर्णन करतांना चरित्रकार म्हणतात:—

“ हा निबंध सार्वजनिक सभेच्या त्रैमासिकाच्या १८९६ सालच्या एप्रिलच्या अंकांत प्रसिद्ध झालेला आहे. तो टिळकांनीं लिहिला असें त्यावर नांव नाहीं. पण याच विषयावर याच त्रैमासिक पुस्तकांत रा. ब. रानडे यांनीं असेंच चार लेख लिहून पूर्वींच्या चारहि पंचवार्षिक करारांचें .म निरीक्षण केलें होतें. रानडे यांच्या लेखावर नांव नाहीं. परंतु

पूर्वीचे चार लेख रानड्यांचे व पांचवा टिळकांचा ही गोष्ट परिचितांस माहीत आहे."

हाही लेख तयार होण्याचे कामीं रानड्यांचेंच सहाय्य कारणीभूत झालें हीही वस्तुस्थिति चरित्रकारांस माहीत नसली तरी ती 'परिचितांस' माहीत आहे. असो, टिळकांचा हा एकुलता एक लेख चरित्रकारांनीं अनेक प्रकरणांतून फिरविला आहे. टिळकांची दोनसवादोन वर्षांची कौन्सिलची कामगिरी वर्णन करतांना त्यांनीं याच लेखाचा हवाला दिला आहे. पुनः सार्वजनिक सभेची हकीकत देतांना या लेखाचाच त्यांनीं पाढा वाचला आहे. टिळकांच्या दुष्काळी चळवळीचें वर्णन करतांना तिच्या दुष्काळाचें निवारण करण्याकरितां याच लेखाचें चरित्रकारांनीं पुनरुच्चारण केलें आहे. एखादा दरिद्री माणूस समोर जितके देव असतील तितक्यांदा एकाच गुळखोबऱ्याचा नैवेद्य त्यांना समर्पण करतो त्याप्रमाणेंच विधायक कामगिरी दाखविण्याचा कोणताही प्रसंग आला तरी तो या लेखानेंच साजरा करण्याचा चरित्रकारावर अपरिहार्य प्रसंग आला आहे. यावरूनच टिळक व विधायक कामगिरी यांच्यामध्यें बारावा बृहस्पति कसा होता हें दिसून येतें.

---

## लेख सहावा.

### जेजुइट तत्त्वाचें माजविलेलें ढोंग.

विधायक कामाची टिळकांना खरोखरच हौस असती आणि त्यांच्या अंगीं तशी लायकी असती तर डे. ए. सोसायटीचा राजीनामा देण्याचा त्यांजवर प्रसंगच आला नसता. वस्तुतः शाळेच्या मूळ संस्थापकांपैकींच ते एक होते; सुमारें दहा वर्षें त्या संस्थेंत व तिचेंच विकासात्मक स्वरूप जें फर्ग्युसन कॉलेज त्यांत त्यांनीं काम केलें होतें. असें असूनही ते

संस्था सोडून गेल्याशिवाय संस्थेचें काम नीट रीतीनें चालणार नाहीं, असें त्यांच्याशिवाय प्रायः सर्व सभासदांना वाटावें, यावरूनच दोष कोणाचा होता याचा आपोआपच उलगडा होतो. शाळा काढण्याची कल्पना मूळ टिळक-आगरकर या दोघांपैकीं टिळकांची कीं आगरकरांची असा एक पुष्कळ दिवसांचा वाद आहे. वस्तुतः या वादांत कांहीं विशेष मुद्दा आहे असें आम्हांस वाटत नाहीं. कदाचित् याची मूळ कल्पना टिळकांची असेल किंवा आगरकरांचीही असेल. पण ती आगरकरांचीच असण्याचा संभव अधिक दिसतो. न्यू स्कूलच्या पहिल्या जाहिरातीवर विष्णुशास्त्री यांची एकट्याचीच सही आहे. यासंबंधानें चरित्रकार म्हणतातः—

"टिळक १८७९ च्या सप्टेंबरांत एलएल. बी. च्या अभ्यासाकरितां पुण्यास डेक्कन कॉलेजमध्यें येऊन राहिले. त्याच वेळीं त्यांचे आणि आगरकरांचे शाळा काढण्याविषयीं बेत झाले. दरम्यान एम. ए. ची परीक्षा टाकून देऊन एलएल. बी. कडे टिळक वळले याचें कारण, शिक्षक न होतां हायकोर्टांत वकिली करावी अशी इच्छा टिळकांना झाली असावी. टिळकांबरोबर बी. ए. पास झालेले बरेच लोक एलएल. बी. कडे गेले होते. एम. ए. कडे गेलेले असे फारच थोडे. शिवाय रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलिक यांचें उदाहरण कोंकणाशीं संबंध असलेल्या होतकरू व तरुण पदवीधरांच्या डोळ्यांपुढें नित्य असे.........त्यांच्यासारखे हायकोर्ट वकील व्हावें असें टिळकांच्या मनांत आपोआपच येण्याचाही संभव होता."

चरित्रकारांचें अनुमान खरें धरल्यास न्यू इंग्लिश स्कूल काढण्याच्या मूळ कल्पनेचें श्रेय आगरकरांनाच द्यावें लागतें. टिळक हे वकिली कोठें करावी हें ठरविण्याकरितां रा. उपासनी यांच्याबरोबर हिंडल्याचें रा. उपासनी यांनीं प्रसिद्ध केलें आहे. पण आमच्या मतें तो मोठासा मुद्दा नाहीं, हें आम्हीं वर सांगितलेंच आहे. मुख्य ध्यानांत ठेवण्यासारखा मुद्दा येवढाच कीं, आगरकर आजन्म दारिद्र्य सोसून आपल्या

ध्येयास आमरणान्त चिकटून राहिले आणि टिळक त्या ध्येयापासून सुटून पुण्यांतील चार मातबर लोकांत गणना होण्याइतके श्रीमंत झाले. टिळकांचें आणि त्यांच्या व्यवसायबंधूंचें कां जमलें नाहीं, याच्या अवांतर कारणांचा विचार करण्यापूर्वीं खुद्द टिळकांनीं आपल्या राजिनाम्यांत याबद्दलचें जें कारण दिलें आहे त्याचाच प्रथम विचार करूं.

" जेजुईट मिशनरी लोकांचे नियम याहूनहि अधिक कडक आहेत. त्यांच्याहून आम्हांला अधिक मिळकत देऊं केल्यावर इतर लोभ ठेवतां जर आम्हीं एकनिष्ठेनें काम केलें नाहीं, तर आम्हीं स्वतःला देशभक्त म्हणवून घेण्यास काय अधिकार ? "

संस्थेंतील तहाहयात सभासदांनीं जेजुईट लोकांप्रमाणें वागावयाचें म्हणजे शाळेव्यतिरिक्त दुसरा व्यवसाय कोणताही करावयाचा नाहीं, मग तो किफायतशीर असो किंवा बिनकिफायतशीर असो, असेंच संस्थेचें तत्त्व असल्याचें टिळक आपल्या राजिनाम्यांत म्हणतात; आणि त्या तत्त्वाचा उघड उघड भंग होऊं लागला म्हणूनच सर्व जन्माचें ध्येय सोडून आपल्याला राजिनामा द्यावा लागला असें टिळकांचें म्हणणें आहे. हें टिळकांचें म्हणणें पाहिलें म्हणजे स्वार्थत्यागाचें तत्त्व ज्यांच्या रोमरोमीं बाणलें होतें असे काय ते एकटे टिळकच होते. त्यांच्याव्यतिरिक्त सोसायटींतील इतर मंडळी म्हणजे स्वार्थसाधु लोकांचा एक तांडाच होता अशी सकृद्दर्शनीं कोणाचीही समजूत होण्याचा संभव आहे. पण त्यावेळच्या एकंदर परिस्थितीचा विचार केला म्हणजे संस्था सोडून जातां जातां संस्थेंतील लोकांवर कांहीं तरी कायमचें ट्रेपर ठेवतां यावें यासाठींच टिळकांनीं ही शक्कल काढली होती व राजिनाम्यांत घुसडून दिली होती, हें दिसून येईल.

संस्थेंतील सभासदांनीं जेजुईटप्रमाणें वागावें असा खरोखरच मूळ संकल्प असता तर तो शाळा स्थापन होण्याच्या सुमारास विष्णुशा-

त्यांच्या सहीनें निघालेल्या जाहीर पत्रकांत नमूद झाला असता; पण या पत्रकाचा आपल्या राजिनाम्यांत निर्देश करतांना टिळक म्हणतातः—

" आपल्याच सहीनें शास्त्रीबुवांनीं १५ डिसेंबर १८७९ रोजीं शाळेचें जाहीर पत्रक काढलें त्यांत मूळ हेतूचा कोणत्याही रीतीनें बडेजाव न करतां शिक्षण सुलभ व स्वस्त करणें एवढाच हेतु त्यांनीं लिहिला. "

अर्थात् या हस्तपत्रकांत टिळक म्हणतात त्याप्रमाणें जेजुईट पद्धतीचा मुळींच निर्देश नव्हता. हा निर्देश न करण्याचें कारण " जाहीर पत्रकांत उगीच बडेजावा कशाला करा " हें होतें किंवा मूळ उद्देश तसा कांहीं नसतांही संस्थेचा राजिनामा देतांना आपली बडेजावी वाढावी या हेतूनें टिळकांनींच तो आपल्या लोकोत्तर डोक्यांतून निर्माण केला होता, हें थोडक्यांत दाखवितां येण्यासारखें आहे. विष्णुशास्त्री यांनीं शाळा काढण्याची जाहिरात काढली तेव्हां ती एकट्याच्या हिंमतीवर काढली हीही गोष्ट यासंबंधांत मुद्याची होय.

शिस्तीसंबंधांत शास्त्रीबुवा टिळकांच्याच नमुन्याचे होते, किंबहुना कांकणभर अधिक म्हटलें तरी चालेल, ही गोष्ट चरित्रकारांनींही त्या वेळच्या माणसांच्या तोंडन ऐकलेल्या हकीकतीवरून दिली आहे. ती देऊन ते पुढें म्हणतातः—

" शिवाय शाळेच्या बरोबरीनें किंबहुना थोडें अधिकच त्यांचें लक्ष आपल्या इतर आवडत्या उद्योगाकडे लागलेलें होतें. न्यू इंग्लिश स्कुलांत बुकांचा खप पुष्कळ असल्यामुळें शास्त्रीबुवांच्या किताबखान्याची चलती झाली होती. तसेंच चित्रशाळची व्यवस्था शास्त्रीबोवांचे स्नेही वासुदेवराव जोशी यांजकडे दिली होती. तिकडेही त्यांना मधून मधून पहावें लागे."

संस्थेचें काम जेजुइट पद्धतीनें चाललें नाहीं म्हणून आपल्याला संस्थेचा कायमचा निरोप घ्यावा लागला असें जें टिळकांनीं राजिनाम्यांत म्हटलें आहे त्यासंबंधांत खाल उतारा अत्यंत महत्त्वाचा आहे.

शाळेशिवाय शास्त्रीबुवांचे किताबखाना व चित्रशाळा हे दोन उद्योग असत; ते असे तसे नसून आवडते असत. या आवडत्या उद्योगांत त्यांना जी किफायत होत होती ती शाळेकडे जात असे किंवा शास्त्रीबुवांच्या घरीं पोहोंचती होत असे, याबद्दल चरित्रकारांनीं चौकशी केली असती, तर ऐन राजिनाम्याचे वेळीं टिळकांनीं जेजुईटपद्धतीची टूम पुढें आणला तींतील खरें स्वारस्य काय आहे हें त्यांच्या तेव्हांच लक्ष्यांत आलें असतें. आपले किफायतशीर, म्हणूनच आवडते धंदे करण्यास शाळेच्या कामाची हेळसांड करणाऱ्या शास्त्रीबुवांना जर मुभा होती, तर शाळेची शिस्त सोळा आणे पाळन शाळेचें काम चोख रीतीनें करणाऱ्या बिचाऱ्या आपटे गोखल्यांनाच ती कां नसावी? टिळक जर जेजुईट पद्धतीचें तत्त्व प्रामाणिक बुद्धीनें प्रतिपादन करीत होते, त्यांत मत्सर, द्वेष वगैरे भावनांचा संबंध नव्हता तर त्यांनीं चिपळूणकरांनाही आपले आवडते धंदे करण्यासंबंधांत आडकाठी करणें जरूर होतें. ती त्यांनीं केली नाहीं, यावरून टिळकांचें " निःस्वार्थीपणाचें हें नुसतें स्तोम असून त्यांचा खरा हेतु आत्मश्लाघा व आत्मप्रतिष्ठा हा होय, " हा जो त्याच वेळीं कित्येकांनीं त्यांच्यावर टपका ठेवला तोच साधार ठरत नाहीं काय ?

न्यू स्कूलबरोबरच 'केसरी' व 'मराठा' हा दोन पत्रें चालविणें व आर्यभूषण छापखान्याची व्यवस्था करणें हीं कामें न्यू स्कूलचे चालक करीत होते. या कामाची वांटणीही पुढें डी. ई. सोसायटी स्थापन झाल्यावर सभासदांमध्यें झालेली आहे. नामजोशीही शाळेचें काम सोडून बाहेरचीं कामें फार करीत असत. त्यासंबंधानें टिळक आपल्या राजिनाम्यांत ह्मणतातः—

" हळूहळू नामजोशांचीं बाहेरचीं स्वतःचीं कामें फार वाढलीं. व नामजोशी माझे स्नेही असतांही मी त्याबद्दल त्यांस उघड दोष देत असें. आतां नामजोशी कॉलेजांत शिकवीत नसत, यामुळें तें डोळ्यांवर येत से. पण कॉलेजच्या शिक्षकांच तसें नाहीं. म्हणून बाहेरचें काम त्यांनीं

करूं नये किंवा त्या कामानें मिळणारें पैसे सोसायटीकडे जमा करावे असा निर्बंध घातल्याशिवाय गत्यंतर नाहीं. "

नामजोशी हे टिळकांचे स्नेही असत. तरीसुद्धां त्यांचीं बाहेरचीं कामें वाढल्यामुळें टिळक त्यांना उघड दोष देत असत. अर्थात् दोघेही एकटे असले म्हणजे ! ! यांतही त्यांनीं एक मखलाशी केली आहे. ती काय, तर नामजोशी कॉलेजांत शिकवीत नसत! म्हणजे शाळेंत शिकविणाऱ्या तहाहयात सभासदास जेजुईट पद्धतीचें तत्त्व लागू नव्हतें कीं काय ? न्यू स्कूल निघून कॉलेज निघण्यापर्यंतच्या काळांत कोणी कितीही कामें केलीं असतीं तरी त्याला टिळकांची कांहींच हरकत नव्हती, असें समजावयाचें कीं काय ? तात्पर्य काय कीं, ही जेजुईट पद्धति टिळकांनीं आपल्या कल्पनेंतून काढली. मूळ उद्देशांत ती मुळींच नव्हती. तशी ती असती तर चिपळूणकरांना किताबखाना व चित्रशाळा या फायद्याच्या संस्था चालविणें शक्य झालें नसतें. वरील उताऱ्यांत जो निर्बंध घातल्याशिवाय गत्यंतर नाहीं असें टिळक म्हणतात तोही 'बाहेरील कामानें मिळणारे पैसे सोसायटीकडे जमा करावे' हा निर्बंध विष्णुशास्त्र्यांच्या किफायतशीर उद्योगांना लागू करण्यांत आला नव्हता. आणि शाळेव्यतिरिक्त व्यवसाय कोणींही करूं नये, याचें कारण त्यांत वेळ जातो असें म्हटलें तर तें एक वेळ कोणास पटण्यासारखें आहे. पण टिळकांचा कटाक्ष वेळ जाण्यावर नव्हता, पैसे मिळविण्यावर होता हें "असल्या बाहेरच्या कामानें मिळणारे पैसे सोसायटीकडे जमा करावे" यावर व्यक्त झालेल्या त्यांच्या मतावरून स्पष्ट दिसून येतें. आणि लोकांनीं पैसे मिळविण्यावर त्यांचा कटाक्ष असणें अगदीं स्वाभाविक होतें. कारण स्वतः त्यांची स्थिति इतरांच्या मानानें पुष्कळ चांगली होती. स. १८७२ सालीं जूनच्या अठ्ठाविसाव्या तारखेस टिळकांचे वडील गंगाधरपंत यांनीं आपलें मृत्युपत्र लिहिलें त्यांत आपल्या मिळकतीची व्यवस्था खालीलप्रमाणें व्हावी असें ठरविल्याचें चरित्रकार म्हणतातः—

" तिच्यापैकीं ½ त्यांनीं आपला धाकटा बंधू गोविंद रामचंद्र टिळक यांस व सदर मृत्युपत्रानें ½ हिस्सा म्हणजे अदमासें पांच हजार रुपये आपला मुलगा बळवंतराव टिळक यांस दिले. "

यावरून टिळकांची स्थिति श्रीमंत नसली तरी बाकीच्या सभासदांच्या मानानें चांगली होती हें कोणीही कबूल करील. पन्नास वर्षांपूर्वीं पांच हजारांची इस्टेट हल्लींच्या निदान पंचवीस हजारांपर्यंत तरी येईल, हें लक्षांत ठेवलें म्हणजे " पहिल्या वर्षीं चिपळूणकर व मीं यांनीं एक पैही घेतली नाहीं " अशी राजिनाम्यांत गवाक्ति करतांना आगरकरांसारख्या आपल्या निर्धन पण निधारी व्यवसायबंधूवर आपण अन्याय करीत आहोंत ही गोष्ट त्यांच्या लक्षांत यावयास पाहिजे होती. पण राजिनामा देऊन संस्था सोडतांना संस्थेंत शिल्लक राहिलेल्या लोकांपेक्षां आपण विशेष स्वार्थत्यागी व तत्त्वप्रिय आहोंत असा बाहेर डांगोरा पिटविण्यास सांपडावें म्हणूनच त्यांनीं जेजुईट पद्धतीनें रहाण्याची संस्थेची शर्त आपल्या कल्पनेंतून काढली व राजिनाम्यांत नमूद करून ठेविली आणि या गोष्टीबरोबरच पहिल्या वर्षीं आपण पगार घेतला नाहीं ही गोष्ट, तिच्याच बरोबर हा पगार आपण पुढें वसूल करून घेतला, हें न सांगतां आपल्या राजिनाम्यांत निवेदन केली !

जेजुईट तत्त्वाचा हा डांगोरा पिटवितांना त्यासंबंधांतील एक मुख्य गोष्ट टिळकांच्या किंवा त्यांच्या चरित्रकारांच्याही लक्ष्यांत आलेली दिसत नाहीं. जेजुईट पंथाच्या लोकांना आपली वडिलार्जित इस्टेटही ज्या संस्थेंत ते काम करतात त्या संस्थेला अर्पण करावी लागते. टिळकांनीं आपली वडिलार्जित पांच हजारांची इस्टेट न्यू स्कूलला अर्पण केल्याचें कोठेंही ऐकिवांत नाहीं.

उच्च शिक्षण स्वस्त व सार्वत्रिक करावयाचें या ध्येयानें टिळकांनीं आयुष्यक्रमास आरंभ केला. पण अहंमन्यता व दुराग्रह या अवगुणांच्या जोडगोळीमुळें त्यांना बरोबरीच्या माणसांशीं खेळीमेळीनें काम करणें अशक्य झालें व संस्था सोडून जाण्याशिवाय त्यांना गत्यंतरच उरलें

नाहीं. बाकीचे सर्व लोक संस्थेंत राहिले आणि आपल्याला एकट्यालाच तींतून गाशा गुंडाळून बाहेर पडावें लागलें यामुळें बाहेर आपली नाचक्की होणार हें ते जाणून होते. संस्था तर सोडावयाची पण कांहीं तरी उच्च व उदात्त तत्त्वासाठीं आपल्याला निरुपायानें बाहेर निघावें लागलें असें दाखवितां आलें तर फारच चांगलें, असें त्यांच्या मनाला वाटलें असल्यास त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. आणि त्यांच्यासारख्या कल्पक व शाठ्यंनीतींत निसर्गतःच प्रवीण असलेल्या माणसाला, प्रतिपक्षास कायमची जाणवेल अशी बेमालुम शक्कल काढणें फारसें कठिण पडलें नाहीं. जेजुईट पद्धतीची शक्कल ही अशा प्रकारचीच होय. पण ती सर्वस्वी कशी फसली हें विष्णुशास्त्र्यांचा किताबखाना व चित्रशाळा या दोन संस्थांचीं आम्हीं जीं उदाहरणें न्यू स्कूल स्थापनेच्या वेळीं अस्तित्वांत असलेलीं दिलीं आहेत त्यावरून व अन्य दिलेल्या प्रमाणांवरून कोणाच्याही लक्षांत येईल.

या प्रश्नाचा विचार करतांना ज्या तत्त्वाकरितां आपल्याला डे. ए. सोसायटी सोडावी लागली असें टिळकांचें म्हणणें आहे तें तत्त्व सोसायटी सोडल्यानंतर आचरणांत आणण्याचा त्यांनीं प्रयत्न केला कीं काय हें पाहण्याची कोणालाही साहजिक बुद्धि होईल. आणि या दृष्टीनें पाहिलें म्हणजे जें निःस्वार्थीपणाचें तत्त्व आपले व्यवसायबंधु पाळीत नाहींत म्हणून टिळकांना हिरमुसलें होऊन सोसायटी सोडावी लागली, तें तत्त्व त्यांनीं सर्वस्वीं सोडून दिलेलेंच आढळून येतें. त्यानंतर त्यांची स्वार्थी द्रव्यदृष्टि बरीच ऐसपैस झालेली दिसते. सोसायटी सोडल्यानंतर त्यांनीं लॉ क्लास काढला. त्यांत त्यांना दरमहा "सुमारें दीडशें रुपये मिळत व तेवढ्यावर त्यांचा संसाराचा सर्व खर्च भागे" असें चरित्रकार म्हणतात. जे टिळक सोसायटींतील माणसांनीं फक्त पाऊणशें एक रुपये दरमहा घेऊनच संतुष्ट रहावें असें म्हणत होते, तेच सोसायटींतून बाहेर आल्याबरोबर त्यांचा संसार दरमहा १५० रुपये लागावेत इतका प्रशस्त झाला! पुढें

पुढें तर त्यांच्याजवळ हजारों रुपये सहज शिल्लक रहावेत इतका त्यांचा पैशाचा प्रपंच फैलावला! सोसायटी सोडल्यानंतर पांच सहा वर्षांतच टिळकांची पैशाची सुस्थिति कशी होती हें पाहिलें म्हणजे सोसायटी आणि तिच्याबरोबर आपल्याला अत्यंत प्रिय वाटणारें व सोसायटींतील आपल्या बंधूंनीं आजन्म पाळिलें पाहिजे असा ज्याबद्दल त्यांचा आग्रह होता तें जेजुईट तत्त्व त्यांनीं व्यवहारांत निखालस सोडून दिलें होतें असें स्पष्ट दिसून येतें. "गरजेप्रमाणें पगार कीं संस्थेच्या सांपत्तिक स्थितीप्रमाणें पगार" हें जें तत्त्व सोसायटींत असतां टिळक आग्रहानें प्रतिपादन करीत होते, त्या तत्त्वाची व आपली, सोसायटी सोडून गेल्यानंतर टिळकांनीं पुनः आजन्म दृष्टादृष्टही होऊं दिली नाहीं, हें लक्ष्यांत ठेवण्यासारखें आहे. १८९६–९७ सालच्या टिळकांच्या आर्थिक स्थितीसंबंधानें लिहितांना चरित्रकार आपल्या ग्रंथांत म्हणतातः—

" टिळकांना त्यांच्या आयुष्यांत पुढें पुढें केसरीच्या उत्पन्नामुळें सार्वजनिक किंवा कोर्टांतील भांडणासारख्या कामाकडे खर्च करण्याकरितां लागणाऱ्या पैशाची वाण पडली नाहीं. तथापि चिरोल केसच्या वेळीं दोन तीन लक्ष रुपये लागणारे असल्यामुळें तेव्हांही वेगळा सार्वजनिक फंडच उभारावा लागला. ताई महाराज प्रकरणीं त्यांना एकंदर पन्नास साठ हजार रुपये खर्च आला. पण तो अनेक वर्षांवर वांटून गेल्यामुळें त्याकरितां टिळकांना सार्वजनिक वर्गणी मागावी लागली नाहीं. तो खर्च पडेल तसतसा केसरीच्या चालू शिलकेंतून किंवा कर्जाऊ रकमा काढून व परत करून, म्हणजे केसरींतूनच टिळकांना भागवितां आला. "

यानंतर टिळकांची पैशाची सुस्थिति एकंदरीनें जास्त जास्त चांगली होत गेली. अखेर ती इतकी चांगली झाली कीं दरमहा एक हजार किंवा पंधराशें रुपये मिळविणाऱ्या माणसाला आपल्या पश्चात् जितकी

इस्टेट ठेवतां येईल तितकी त्यांना ठेवतां आली. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे चिरोल केसकरितां लोकांकडून पैही न घेतां त्या केसचा स्वतःच्या इस्टेटींतून खर्च भागवावयाचा असेंही त्यांनीं मनांत आणलें असतें तर तेंही त्यांना अशक्य नव्हतें. आपल्या पश्चात् भलीमोठी इस्टेट ठेवून जाणाऱ्या टिळकांसारख्या गृहस्थानें सोसायटींत जेजुईट तत्त्व पाळण्यांत येत नाहीं म्हणून सोसायटी सोडली, असें जर इतिहासानें भावी पिढीला सांगितलें तर तें त्यांना यत्किंचित् तरी खरें वाटेल काय ? उलट जेजुईट ज्या निग्रहानें निःस्वार्थीपणाचें तत्त्व आमरण पाळतात त्याच निग्रहानें या गृहस्थानें पैसे मिळविले, असें जर त्यांना कोणी सांगूं लागेल तर तें मात्र त्यांना हमखास पटल्याखेरीज राहणार नाहीं ! आगरकर निर्धन जन्माला आले आणि निर्धनच मेले. उलटपक्षीं टिळकांनीं जन्मभर अद्वितीय स्वार्थत्याग केल्याचा देखावा करून आपल्या पश्चात् इस्टेटही अद्वितीय ठेविली ! हें पाहिल्यानंतर ' काचः काचो मणिर्मणिः ' असे उद्गार कोणाही विवेकवान् माणसाच्या तोंडून निघाल्याशिवाय राहणार नाहींत.

---

## लेख सातवा.

### राजीनाम्याचीं खरीं कारणें.

टिळकांचा आणि कोणत्याही प्रकारच्या शिस्तीचा उभा दावा असे. नियमित वेळीं व नियमित पद्धतीनें काम करणें हें त्यांच्या स्वभावांतच नसे. आणि इतकेंही असून जर कोणी त्याबद्दल त्यांना बोललें तर त्यास शिरजोरपणानें उत्तरें देऊन ते त्याचा पाणउतारा करीत. आगरकर, आपटे, गोळे वगैरेंना या त्यांच्या अवगुणांचा पदोपदीं त्रास होऊं लागला. शाळा निघाल्याच्या दुसऱ्या वर्षी टिळकांकडे सहाव्या इयत्तेचें गणित दिलें होतें. चरित्रकारांनीं कर्णोपकर्णी माहितीवरून " गणितविषय शिक-

वितांनाही ते फळ्याकडे वगैरे न जातां स्मरणशक्तीच्या जोरावर लांब लांब उदाहरणेंही तोंडानें सोडवीत" हें जें लिहिलें आहे तें खरें असेल. पण या त्यांच्या शिक्षणपद्धतीचा सामान्य विद्यार्थ्यांना उपयोग होत नसे. आपल्याला गणितासाठीं दुसरा कोणी तरी शिक्षक द्यावा अशी वरील वर्षी सहाव्या इयत्तेतील विद्यार्थ्यांनीं तक्रार केली आणि शेवटीं तो क्लास वामनराव आपटे हे स्वतःच घेऊं लागले. शाळेसारख्या संस्थेला अवश्यक असणारे जे गुण ते सर्व वामनरावांच्या अंगीं ओतप्रोत भरलेले होते. "आपटे यांची सर कोणाही शिक्षकांस आली नाहीं. न्यू इंग्लिश स्कूलला ओळीनें शंकरशेट स्कॉलरशिपाचा मान मिळण्याचें श्रेय आपट्यांसच आहे. ते नेमका होतकरू विद्यार्थी निवडून काढून त्याला जवळ घेऊन परीक्षेच्या दृष्टीनें त्याची कसून तयारी करीत. किंबहुना आपटे लाभले नसते तर शिस्तीच्या दृष्टीनें बाहेर जो शाळेचा लौकिक राखला जाणें अवश्य असतें तो कदाचित् राखलाही गेला नसता." हें जें चरित्रकारांनीं आपट्यांच्यासंबंधीं लिहिलें आहे त्याबद्दल द्विधामत होणें शक्य नाहीं. आपट्यांना शिस्तीची जशी आवड तशीच तिजबद्दल टिळकांना मनापासून नावड. यामुळें या दोघांमध्यें सदासर्वदा खटके उडूं लागले आणि सर्वांनाच हळूंहळूं टिळकांची अडचण वाटूं लागली. आपली चुकी झाली तरी त्याबद्दल दिलगिरी प्रदर्शित करणें यास टिळकांच्या कोशांत 'नामर्दपणा' हाच समानार्थक शब्द असल्यामुळें अनियमितपणा करून तें करून आपट्यांना व आपट्यांचा पक्ष घेणारांना ते फार टाकून बोलूं लागले. इतर कित्येक कारणें जन्मासही येण्यापूर्वी या एकाच कारणानें टिळकांचें सर्वांनाच मोठें दुखणें झालें. त्यांची शिकविण्याची पद्धत विद्यार्थ्यांना रुचण्यासारखी नव्हती, इतकेंच नव्हे तर वर्गांचे तास घेण्यासंबंधांतही त्यांचें उडाणटप्पूपणाचें वर्तन असे. या गोष्टीची साक्ष पटविणारे आजमित्तीस या शहरांतही कित्येक गृहस्थ हयात आहेत. पण टिळकपक्षाला मान्य होणारी अशीच साक्ष यासंबंधांत

दिली पाहिजे. लोकसंग्रहाच्या ता. १ आगष्ट स. १९२१ च्या अंकांत रा. वामनराव पोतदार वकील म्हणतातः——

"१८८६ च्या सुमारास म्युनिसिपालिटीच्या निवडणुकी वगैरेच्या कामीं लोकमान्यांचे परमस्नेही कै. माधवराव नामजोशी यांचेकरितां खटपट करणेस्तव लोकमान्य वरचेवर जाहीर सभांस वगैरे जात व आठवड्यांतून कित्येक वेळां शाळेंतील त्यांचे तास घेणेबद्दल त्यांचा अनियमितपणा घडे."

या उताऱ्यानें दोन्हीं कामें होतात, एक तर त्याच्या योगानें टिळकांचा अनियमितपणा सिद्ध होतो; व दुसरें शाळेच्या बाहेरचें काम कोणींही करूं नये हें जें तत्त्व त्यांनीं आपल्या राजीनाम्यांत मोठें महत्त्वाचें म्हणून गोंवलें होतें त्यास स्वतःचा अपवाद ते कसा करीत होते, हेंही उत्कृष्ट रीतीनें दिसून येतें. जो शिरजोरपणा आश्रित लोक किंवा पगारी नोकर सहन करतील, प्रसंगविशेषीं "आमचे लोकमान्य कसे विक्षिप्त किंवा छांदिष्ट आहेत" असें त्याचें कौतुकही करतील, तो शिरजोरपणा बरोबरीच्या माणसांना नुसता असह्यच नव्हे, तर तिरस्करणीयही वाटावा हें स्वाभाविकच आहे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे जिचें काम शिस्तीनें, नियमितपणानें व पद्धतशीर रीतीनच चाललें पाहिजे अशी शिक्षणसंस्था चालविण्यास टिळक हे सर्वस्वी नालायक होते. म्हणूनच त्यांना डी. ई. सोसायटी सोडावी लागली. सोसायटी सोडल्यानंतर त्यांनीं प्रतिस्पर्धी अशी दुसरी शिक्षणसंस्था काढली नाहीं याबद्दल त्यांच्या थोरपणाचे कित्येक वेळां गोडवे गाईलेले आमच्या ऐकण्यांत आलेले आहेत, पण त्याचें उत्तर चरित्रकारांनींच एके ठिकाणीं उत्कृष्ट रीतीनें दिलें आहे. ते म्हणतातः——

"टिळकांनीं शाळा व कॉलेज काढलें असतें व स्वतः ते त्याचे मालक, सुपरिंटेंडंट किंवा प्रिन्सिपाल झाले असते तरी, आपल्या संस्थेंतील शिक्षक

किंवा प्रोफेसर मंडळींना त्यांना केवळ नोकरांच्या रीतीनें न वागवितां जवळ जवळ बरोबरीचे मित्र या नात्यानें वागवावें लागलें असतें. पण असल्या या नव्या प्रपंचांतील स्वाभाविक अडचण, विशेषतः टिळकांचा एकतंत्री स्वभाव व स्वतांत्र्यप्रियता हीं लक्षांत घेतलीं म्हणजे पूर्वीच्या अनुभवावरून ते शाळा किंवा कॉलेज काढण्याचे भानगडींत पडले नाहींत ही गोष्ट त्यांनीं योग्यच केली असें म्हणावें लागतें. ”

टिळकांना राजीनामा देण्यास जीं कारणें झालीं त्यांतील प्रमुख म्हणजे त्यांचा एकतंत्री स्वभावच होय, हें त्यांच्याशीं पंचवीस वर्षांचा निकट सहवास घडलेल्या चरित्रकारांसारख्या एका सुबुद्ध गृहस्थाचे उद्गार आहेत, व या दृष्टीनें त्यांस कोणीही स्वाभाविकच विशेष महत्त्व देईल.

न्यू स्कूलच्या व फर्ग्युसन कॉलेजच्या चालकांनीं संस्थांकरितां सरकारी ग्रँट घेतली ही गोष्ट टिळकांना पसंत नव्हती, हेंही त्यांच्या राजीनाम्याचें एक कारण होतें, असा लोकांचा समज करण्याचा प्रयत्न झाला होता. त्यावेळीं टिळक हे हयात होते. टिळकांच्या राजीनाम्यांत ग्रँट न घेण्यासंबंधानें एक अक्षरही नाहीं. उलट ग्रँट मिळविण्याच्या कामांत आपणच पुरस्कार घेतल्याचा त्यांच्या राजीनाम्यांत स्पष्ट उल्लेख आहे असें त्यावेळीं विरुद्ध बाजूनें प्रसिद्धही करण्यांत आलें होतें. आपण ग्रँट घेण्याविरुद्ध होतों ही परस्पर प्रसिद्ध झालेली बातमी खरी नाहीं असें म्हणावयास वस्तुतः टिळकांनींच पुढें यावयास पाहिजे होतें. त्यांनीं तसें केलें नाहीं; इतकेंच नव्हे तर सरकारी ग्रँट घेण्यासंबंधानें व संस्था कशा चालवाव्या यासंबंधानें मीं आपल्या राजीनाम्यांत सविस्तर खुलासा केला आहे असें सांगून आपला राजीनामा म्हणजे उदात्त विचारांचा एक अजबखानाच आहे असें ते लोकांना भासवीत होते ! पण चरित्रकारांनीं मात्र यासंबंधाची वस्तुस्थिति प्रांजलपणें कबूल करून हा वाद, निदान आपल्यापुरता तरी कायमचा मिटविला आहे. चरित्रकार म्हणतातः—

" शाळेला ग्रँट घ्यावी कीं नाहीं हाही वादांतील एक मुद्दा म्हणून पुढें येत असतो. सरकारी ग्रँट घेतल्यानें शिक्षणसंस्थांच्या चालकांचें स्वातंत्र्य नष्ट होतें. याकरितां सरकारी मदत घेऊं नये असें टिळकांचें म्हणणें व ग्रँट घेण्याला हरकत नाहीं असें इतरांचें म्हणणें. हा एक मुद्दा राजिनाम्याला कारणीभूत होता किंवा नाहीं असा वाद १९१९ च्या कलहांत पुढें आला होता. परंतु खुद्द राजीनाम्यावरून पहातां यास महत्त्व दिलें गेलें नव्हतें. सरकारी ग्रँट शाळांना किंवा कॉलेजला घेऊं नये असें टिळकांचें म्हणणें असणें शक्य नाहीं."

सन १९१६ सालीं टिळकांच्या ज्युबिलीच्या प्रसंगीं बालशिक्षण-मालेंत रा. हरि रघुनाथ भागवत यांनीं एक लेख लिहिला होता. त्यांत संस्थांना ग्रँट घेण्याविरुद्ध टिळकांचें मत होतें आणि इतरांनीं त्याचा स्वीकार केला नाहीं म्हणूनच टिळकांना सोसायटी सोडावी लागली असा स्पष्ट निर्देश होता. मालेच्या या अंकाचीं प्रुफें रा. टिळक यांनीं स्वतः पाहिलीं होतीं, याबद्दलचा निर्देश पूर्वीं आलेलाच आहे. टिळकांच्या जागीं सत्याबद्दलची चाड असलेला एखादा दुसरा गृहस्थ असता तर त्यानें वस्तुस्थितीचा विपर्यास करणारा हा मजकूर खाचित काढून टाकला असता. पण वस्तुविपर्यासाच्या पायावरच ज्यांच्या लोकमान्यतेचा डोलारा उभारलेला,त्यांना ही सरळ बुद्धि कशी सुचणार? सरकारी ग्रँटचा टिळकांच्या राजीनाम्याशीं कांहींही संबंध नव्हता ही गोष्ट चरित्रकारांनीं आतां खुलासेवार रीतीनें उघडकीस आणली याबद्दल त्यांचें आम्ही अभिनंदन करतों. तरी पण या खुलाशांत चरित्रकारांनीं अजूनही थोडी कूस ठेविली आहे. टिळक ग्रँट घेण्याच्या उलट नव्हते इतकेंच नव्हे तर ती मिळविण्याचे कामीं त्यांनींच पुढाकार घेतला होता हीही गोष्ट त्यांच्या राजीनाम्यांत नमूद आहे. चरित्रकारानीं त्यांच्या राजीनाम्याचा सारांश म्हणून जो दिला त्यांत ही गोष्ट त्यांनीं अर्थातच वगळली आहे. " संस्थे-करितां प्रथम ग्रँट मिळविण्याबद्दल आपण किती खटपट केली हें तुम्हांला

माहीत आहेच" ( You know how we fought for Government grant first ) हे राजीनाम्यांतील शब्द फार महत्त्वाचे आहेत आणि ही ग्रँट शाळेकरितां मिळविण्यांत आली ती स. १८८३ सालीं होय. म्हणजे संस्थेंत नवीन मंडळी कोणी येण्यापूर्वीच ग्रँट मिळाली होती हेंही लक्षांत ठेवण्यासारखें आहे. संस्थेंत नवीन मंडळी असल्यामुळेंच आपली स्वातंत्र्यप्रियतेची सर्व घडी विसकटून गेली असें जें टिळक आपल्या राजीनाम्यांत म्हणतात तें यावरून सर्वस्वीं निराधार ठरतें.

टिळक सोसायटींतून गेले तेव्हांपासून तिचा एकसारखा उत्कर्ष होत गेला व सार्वजनिक सभेस त्यांचा संसर्ग झाल्याबरोबर ती प्रत्यक्ष हाल-चालीच्या दृष्टीनें गतप्राण झाली ! यावरून संस्था चालविण्यासंबंधांत टिळकांचा हातगुण विशेषसा यशस्कर नव्हता हें स्पष्ट दिसून येतें. वरील दोन्ही संस्थांचा उदयास्त टिळकांच्या अस्तोदयाशीं समकालीन होता ही कदाचित् यदृच्छया घडून आलेली गोष्ट असेल. पण टिळकांच्या हयातींत संस्थांसंबंधांत वरील मासल्याच्या यदृच्छयां घडून आलेल्या गोष्टींची माळच माळ सांगतां येईल. सरकारी ग्रँटचा मुख्य मुद्दा चरित्रकारांनीं सोडून दिला असला तरी टिळकांनीं सोसायटी सोडल्यानंतर तिच्यांत कांहीं राम राहिला नाहीं असें भासविण्याचा मोह मात्र चरित्रकारांना आवरतां आला नाहींच. ते म्हणतातः—

" प्रोफेसर या नात्यानें टिळकांनीं कॉलेजांत चांगला लौकिक संपादन केला होता व राजीनामा देऊन बाहेर पडतांना ते महाराष्ट्रांतील लोकसमाजाची सहानुभूति बरोबर घेऊन बाहेर पडले होते. "

सोसायटी सोडतांना समाजाची सहानुभूति मिळावी या हेतूनेंच टिळकांनीं जेजुईटच्या तत्त्वाची टूम आयत्या वेळीं कशी काढली हें यापूर्वीं सविस्तर रीतीनें सांगितलेंच आहे. वरील उताऱ्यावरून त्यासच पुष्टि मिळते. जेजुईट तत्त्वाच्या शकलीमुळें एका पंथानें दोन कामें त्यांना साधतां आलीं.

सोसायटींत शिल्लक राहिलेली मंडळी कमअस्सल आहेत असें तें तत्त्व पुढें करून त्यांना भासवितां आलें व स्वतः आपण अस्सल संन्यस्त आहोंत अशी लोकांमध्यें भावना उत्पन्न करून आपला संन्याशाचाच संसार मी मी म्हणणाऱ्या गृहस्थाश्रमी माणसालाही लाजविल इतका गरमरित करतां आला !

टिळकांनीं सोसायटी सोडल्यानंतर शिल्लक राहिलेल्या मंडळीचं वर्णन करतांना चरित्रकार म्हणतातः—

" सोसायटींत शिल्लक उरलेली मंडळी ही नव्या सामाजिक मताची रावसाहेब, रावबहादूर अशांच्या कच्छपीं लागणारी व सरकारकडून दिवसें-दिवस अधिकाधिक मदत मिळावी अशी अपेक्षा करणारी होती. "

चरित्रकारांचें पुस्तक फारच अवजड झालें आहे अशी आम्हीं या लेखमालेच्या पहिल्याच लेखांत टीका केली होती. पुस्तक जसजसें आम्हीं चाळून पाहिलें तसतसा हा आमचा समज यत्किंचितही कमी न होतां उलट वाढतच गेला. कित्येक ठिकाणीं हा ग्रंथाचा अवजडपणा चरित्रकारांच्या स्मरणशक्तीसही डोईजड झालेला दिसतो. एखाद्या बाबीसंबंधानें एका ठिकाणीं एक विचार प्रदर्शित करावेत आणि शें दोनशें पानें आगें मागें त्याच्या विरुद्ध विचार व्यक्त करण्यांत यावेत, असे नमुने प्रस्तुत पुस्तकांत जागजागीं पहावयास सांपडतात. सोसायटींत शिल्लक राहिलेली मंडळी " रावसाहेब रावबहादुर अशांच्या कच्छपीं लागणारी " असें वरील उताऱ्यांत म्हणतांना याच्या दोनशें पानांपूर्वीं आपण काय म्हटलें आहे याची ग्रंथकारांना विस्मृति पडलेली दिसते. त्या ठिकाणीं चरित्रकार म्हणतातः–

"ता. २४ ऑक्टोबर स. १८८४ इसवी रोजीं सर वुइलियम वेडरबर्न यांच्या अध्यक्षतेखालीं गद्र्यांच्या वाड्यांत पुणें शहरांतील प्रमुख गृहस्थांची सभा भरली; तींत डेक्कन एज्युकेशन सोसायटीची रीतसर स्थापना

करण्यांत आली. प्रारंभीं वेडरबर्न साहेबांनीं 'न्यू स्कूल'च्या चालकांची योग्य स्तुति केल्यावर वामनराव आपटे यांनीं सोसायटीच्या स्थापनेचा ठराव पुढें मांडला व त्या वेळीं त्यांनीं असें बोलून दाखविलें कीं कॉलेज वगैरे काढण्याचा उपक्रम लोकांनीं द्रव्याची भरपूर मदत केल्याशिवाय होणार नाहीं व लोकांनीं दिलेल्या पैशाचा योग्य तोच उपयोग होतो याची खात्री होण्याकरितां प्रतिष्ठित लोकांची व्यवस्थापक मंडळी असणेंही जरूर आहे. **ही मंडळी निवडण्याचा ठराव टिळकांनीं मांडला.** त्या मंडळींत मंडलीक, वेडरबर्न, तेलंग, नारायणभाई दांडेकर, यशवंत मोरेश्वर केळकर इत्यादि गृहस्थ होते;"

वरील मंडळींत बरेच पदवीधर किंवा किताबधर गृहस्थ आहेत आणि त्यांची निवड करण्याचा ठराव टिळकांनींच मांडला. अर्थात् रावसाहेब रावबहादुर अशांच्या कच्छपीं लागण्याचा मान सोसायटींतील शिल्लक राहिलेल्या मंडळीलाच देण्यांत आपण आपल्या चरित्रनायकावर मोठा अन्याय करीत आहोंत ही गोष्ट चरित्रकारांनीं अवश्य लक्षांत ठेवावयास पाहिजे होती.

सरकारकडून अधिक अधिक मदत मिळण्याची अपेक्षा करणें हा जो दुसरा दोष सोसायटींत शिल्लक असलेल्या मंडळींत चरित्रकारांनीं दाखविला आहे त्याचीही स्थिति वरीलप्रमाणेंच आहे. चरित्रकार "लॉर्ड रे व लॉर्ड हारिस" या मथळ्याखालीं म्हणतातः—

"प्रो. गोखल्यापेक्षांही व्यक्तिशः टिळकांचा लॉर्ड रे यांच्याशीं अधिक निकट परिचय होता. कॉलेजांतील कुटुंबांत वडील बंधूचा मान टिळक-आगरकरांकडे असल्यामुळें सरकारदरबारीं शिक्षणविषयक ज्या उलाढाली करावयाच्या त्यांचीं सूत्रें या दोघांच्या हातीं असत. पण त्यांतल्या त्यांत, आगरकर हे कमी चलनशील, टिळक हे प्रकृतीनें अधिक सुदृढ म्हणून आगरकरांपेक्षां हीं सूत्रें टिळकांच्या हातींच अधिक रहात. टिळकांचे मदतनीस नामजोशी यांना प्रोफेसरीचा मान मिळाला नव्हता. तरी कल्पकता,

चतुराई व उद्योग यांत ते कांहीं कमी नव्हते. यामुळें टिळक व नामजोशी हेच सरकारदरबारीं येरझारा घालीत व कागदी घोडे नाचवीत."

हा उतारा पाहून वाचकांना खरोखरच आश्चर्य वाटेल. टिळकांसारख्या स्वातंत्र्यप्रिय, बाणेदार व साहेबांशीं झुंजण्यांत पटाईत म्हणून मिरवणाऱ्या माणसानें सरकारदरबारीं जोडे फाडण्यांत एवढी धन्यता मानावी व चरित्रकारांनीं त्याचें मिटक्या मारीत वर्णन करावें हें पाहून कोणास कौतुक वाटणार नाहीं!

टिळक, आगरकर यांना कोल्हापूर प्रकरणीं शिक्षा झाली ती सर जेम्स फर्ग्यूसन यांच्या अमदानींतच होय. असें असून कॉलेजला फर्ग्यूसन कॉलेज हें नांव कसें दिलें हा प्रश्न कित्येकांपुढें उभा राहील. कॉलेजला फर्ग्यूसन कॉलेज हें नांव देण्यास सोसायटींतील बरीच मंडळी प्रतिकूल होती. पण कॉलेजला मदत देणाऱ्या मोठमोठ्या अमीरउमरावांना "आम्हीं कॉलेजला गव्हर्नराचें नांव देणार आहों" अशा प्रकारें, इतर कोणासही न विचारतां न सवरतां, नामजोशी हे आधींच वचनबद्ध झाले होते. हें त्यांचें कृत्य व्यवहार, शिस्त, औचित्य वगैरे सर्व दृष्टींनीं गैरवाजवी होत. पण संस्थेला मदत मिळवावयाची तर तिला बड्या साहेबाचें नांव दिलें पाहिजे असें म्हणून टिळकांनींही आपले स्नेही नामजोशी यांना बाणेदार पाठबळ देऊन कॉलेजला साहेबांचें नांव चिकटविण्याचे कामीं पुढाकार घेतला!

टिळक सोसायटींत असतांना घडलेल्या ज्या गोष्टी चरित्रकारांना कौतुकास्पद वाटतात त्याच ते सोसायटींतून गेल्यानंतर दोषास्पद वाटाव्यात हा विभूतिपूजेचा एक विलक्षण मासला लक्षांत ठेवण्यासारखा आहे! असो. तर 'रावसाहेब रावबहादुर यांच्या कच्छपीं लागणें व सरकारच्या मदतीची अधिकाधिक अपेक्षा करणें' या ज्या गोष्टी चरित्रकारांनीं

शिल्लक राहिलेल्या मंडळीस कमीपणा आणणाऱ्या म्हणून दाखविल्या आहेत त्यांचे जनक स्वतः टिळकच होते ही वस्तुस्थिति वाचकांच्या लक्षांत वरील विवेचनावरून येईलच.

---

## लेख आठवा.

### राष्ट्रीय शिक्षणाचा सांवळा गोंधळ.

डे. ए. सोसायटींत असतांना कागदी घोडे नाचविण्याचें व सरकार-दरबारीं येरझारा घालण्याचें काम टिळकांनीं आपल्याकडे घेतलें होत व विरुद्ध पक्षानें कॉलेजचें " श्री शिवाजी कॉलेज " किंवा " न्यू पूना कॉलेज " असं कांहीं तरी नांव ठेवावें अशी सूचना केली असतांही नाम-जोशांना पाठबळ देण्याचें कर्तव्य करतांना त्यांनी कॉलेजला 'फर्ग्युसन कॉलेज ' हें नांव देण्यास संमति दिली; या गोष्टी टिळकांनीं पुढें जी कांहीं दिवस राष्ट्रीय शिक्षणाची धामधूम उडवून दिली तिचा विचार करण्याचे कामीं अत्यंत महत्त्वाच्या आहेत. न्यू इंग्लिश स्कूलच्या स्थापनेचा इतिहास देतांना चरित्रकार म्हणतात कीं ' राष्ट्रीय शिक्षणाची कल्पना याही वेळीं लोकांच्या मनांत उदित झाली होती. " गोष्ट खरी आहे. पण आज राष्ट्रीय शिक्षण हे शब्द ज्या अर्थानें वापरले जातात त्या अर्थानें ते त्या वेळीं वापरले जात नसत ही गोष्ट लक्षांत ठेवणें जरूर आहे. ( १ ) शिक्षणाच्या सोई वाढविणें, ( २ ) शिक्षण अधिक स्वस्त करणें, ( ३ ) सरकारी पद्धतीनें दिलें जाणारें शिक्षण सुधारणें, ( ४ ) खासगी शाळा शक्य तितक्या स्वतंत्र काढणें, ( ५ ) सरकारी पैशाची मदत घेऊनही शाळांची अंतर्व्यवस्था खुली राखणें, ( ६ ) शिक्षण इंग्रजीच्या ऐवजीं देशी भाषांतून अधिक देणें, ( ७ ) शिक्षणाचे नमुने इंग्लंडहून न आणतां येथेंच बनाविणें, ( ८ ) शिक्षणविषयक शालो-पयोगी पुस्तकें इकडेच तयार करून तीं शिकविणें, ( ९ ) वरिष्ठ शिक्षण

हिंदी लोकांच्या हातीं राहणें; अशीच पि. वा. शि. आपटे यांनीं १८८२ च्या एज्युकेशन कमिशनपुढें दिलेल्या साक्षींत राष्ट्रीय शिक्षणाची व्याख्या केली असल्याचें चरित्रकारांनीं लिहिलें आहे.

वस्तुतः ही व्याख्या अशी आहे कीं, तिच्या अनुरोधानें प्रचारांत येणाऱ्या राष्ट्रीय शिक्षणास कोणाचीही मनःपूर्वक पसंती मिळेल, आणि न्यू स्कूलमध्यें असतांना टिळक याच मताचे होते हें गृहीत धरण्यास हरकत नाहीं. इतकेंच नव्हे तर त्यांनीं आपल्या राजीनाम्यांतही ही गोष्ट स्पष्टपणें मान्य केली आहे. टिळक आपल्या राजीनाम्यांत म्हणतातः—

"सर जेम्स फर्ग्युसन हे संस्थेला भेट देण्यास आले व त्याच सुमारास आबासाहेब घाटगे कागलकर यांनीं संस्थेला उदार आश्रय दिला. गव्हर्नर साहेबांपुढें जें उद्देशपत्रक वाचण्यांत आलें त्यांतही थोडा पगार घेऊन महाराष्ट्रभर शाळा पसरणें व खाजगी कॉलेज काढणें हें ध्येय असल्याचें लिहिलें होतें."

महाराष्ट्रभर शाळा पसरणें हेंच त्यावेळच्या राष्ट्रीय शिक्षणाचें मुख्य अंग होतें हें या उताऱ्यावरून दिसून येईल.

टिळक सोसायटींत असतांना सोसायटीच्या संस्थांतून जी व्यवस्था होती तीमध्यें, ते सोसायटी सोडून गेल्यानंतर, कोणत्याही प्रकारचा फरक झालेला नाहीं हें या संस्थांच्या आजच्या स्थितीवरूनही लक्ष्यांत येण्यासारखें आहे. फरक जर कांहीं झाला असेल तर तो चांगल्या बाजूनेंच झाला आहे. खुद्द टिळकांचे बाबतींत मात्र यासंबंधानें वरचेवर जे फरक व फेरफरक झाले ते मोठे गमतीचे आहेत. न्यू स्कूल व फ. कॉलेजमधील शिक्षकांनीं शिक्षणाव्यतिरिक्त इतर भानगडींत पडूं नये असें आपलें ठाम मत असल्याचें व संस्थास्थापनेचा तो मुख्य हेतु असल्याचें जे टिळक आपल्या राजिनाम्यांत म्हणतात तेच पुढें शिक्षकांनीच काय पण विद्यार्थ्यांनींही राजकारणांत पडावें असें म्हणूं लागले ! इतकेंच नव्हे तर

"विद्यार्थ्यांनीं राजकारणांत भाग घेऊं नये" असें मत प्रतिपादन करणारे लोक विद्यार्थ्यांचा तेजोभंग करतात अशीही हाकाटी करण्यास त्यांनीं कमी केलें नाहीं! याच आवेशांत त्यांनीं डे. ए. सोसायटीच्या संस्थांचा 'हमालखाने' या शब्दानें निर्देश करण्यांत भूषण मानलें. 'सोसायटी सोडल्यानंतरही तिच्यावरील त्यांनीं आपलें प्रेम अखंड राखलें' हें जें चरित्रकार टिळकांच्यासंबंधानें म्हणतात तें कसें निखालस खोटें आहे हें यावरून सिद्ध होतें. सोसायटींतील शिल्लक राहिलेली मंडळी व मागाहून त्यांस येऊन मिळालेले लोक लेचेपेचे असते तर टिळकांनीं सोसायटीची सहज जातां जातां रेवडी उडवून दिली असती! पण टिळकांसारख्या माणसाचेंही सोसायटीपुढें कांहीं न चालून सोसायटीचा एकसारखा उत्कर्षच होत गेला. यावरून सोसायटींतील माणसांच्या कर्तृत्वशक्तिबद्दल कोणासही कौतुक वाटल्यावांचून राहणार नाहीं.

राष्ट्रीय शिक्षणाची एक महत्त्वाची व मुद्याची बाब म्हटली म्हणजे देशभाषांतून शिक्षण देणें ही होय. पण याहीसंबंधांत टिळकांची वृत्ति त्यांच्या इतर आयुष्यक्रमास साजणारी म्हणजे विक्षिप्तपणाची किंवा साधारण माणसास न उकलण्यासारखी अशी दिसून आली आहे. यासंबंधांत खालील उतारा वाचकांस निःसंशय बोधप्रद, निदान मौजेचा वाटेल.

"कै. रानडे यांनीं स्वभाषेचा उच्च परीक्षांच्या शिक्षणक्रमांत अंतर्भाव करण्यासाठीं एक ठराव आणला होता. पण टिळकांनीं त्या ठरावास दुजोरा दिला नाहीं. फार काय, पण वामन–मोरोपंतांचीं काव्यें विद्यार्थ्यांना पढवून सद्यःस्थितींत लाभ कोणता असा रानड्यांपुढें सवाल टाकण्यास ते कचरले नाहींत, हें सांगितल्यास आज कोणाला खरें देखील वाटणार नाहीं.........टिळक कंपार्टमेंटल परीक्षांना अनुकूल नव्हते. ही बाब रानड्यांनींच सेनेटपुढें आणली होती. टिळक त्तिला आडवे आले, बाकीच्या कामाचा हाच मासला," (नवयुग–वर्ष–९ अंक–६–७पृ. २६७)

टिळक युनिव्हर्सिटींत फेलो होते. अर्थात् आपल्या फेलोशिपच्या अमदानींत त्यांनीं कांहीं तरी विशेष कामगिरी करून दाखविली असेल अशी स्वाभाविकच कोणाची अपेक्षा असणार. वस्तुतः शिक्षण हा त्यांचा आवडता विषय. "राजकारणाकडे आपली निसर्गतः प्रवृत्ति केव्हांच नव्हती. तें केवळ परिस्थितीच्या ओघानें आपल्या यदृच्छया गळ्यांत पडलें" असें स्वतः टिळकच म्हणत असत. ज्याच्याबद्दल त्यांना मनापासून आवड अशा शिक्षणविषयाची चर्चा करणाऱ्या युनिव्हर्सिटींत त्यांच्या अष्टपैलु बुद्धीनें कांहीं तरी विशेष कर्तबगारी करून दाखविली असली पाहिजे असें कोणासही वाटणें स्वाभाविक आहे. पण युनिव्हर्सिटींतील त्यांची विधायक ( ? ) कामगिरी मराठी भाषेच्या प्रवेशास विरोध करणें येवढीच होय ! चरित्रकारांनीं क्राफर्ड प्रकरण, संमतिवयाचा वाद, ग्रामण्य प्रकरण, बापट कमिशन वगैरे भाकड कथांचीं लांबच लांब चऱ्हाटें आपल्या पुस्तकांत वळलीं आहेत. पण कायदेकौन्सिल व युनिव्हर्सिटी या ज्या विधायक कामगिरीस मुबलक अवसर देणाऱ्या संस्था त्यांतील टिळकांच्या कामगिरीच्या वर्णनास त्यांना पानें तर राहोतच पण कांहीं भरपूर ओळीही देतां आल्या नाहींत ! त्यांच्या युनिव्हर्सिटींतील फेलोशिपचें आवाहनविसर्जन चरित्रकारांनीं पान ४०७ व पान ४०९ मध्यें एकेका ओळींतच आणि तेंही जातां जातां इतर विषयाच्या अनुषंगानें दिलें आहे !

उलटपक्षीं या बाबतींत आगरकरांचें मत त्यांच्या दणदणीत देशाभिमानास व तत्त्वैकनिष्ठेस साजेसेंच होतें. "कोल्हापूर प्रकरणीं आगरकरांचे विचार" या मथळ्याखालीं पुस्तकांत प्रसिद्ध झालेल्या मजकुरांत आगरकर म्हणतात: —

"आम्हीं आरंभलेलीं कामें आमच्या हयातींत व आमच्या पाठीमागें कित्येक वर्षें अप्रतिहत चाललीं तर आमच्या देशस्थितीवर त्यांचा काय परिणाम होईल. या देशावर इंग्रजांचें राज्य झाल्यानें कोणकोणत्या

बाबतींत हित आणि अनहित होत आहे. लोकशिक्षण उत्तरोत्तर जारीनें पसरत गेलें तर हिंदुस्थानची भावी स्थिति काय होईल; नेटिव्ह संस्थानांची सुधारणा होण्यास काय उपाय करावे; देशभाषा युनिव्हर्सिटींत आणण्याला कोणती युक्ति काढावी. वगैरे ”

डोंगरीच्या तुरुंगांत असतांना आगरकरांचे हे विचार चालत. नव्हे त्यांच्यामध्यें व टिळकांच्यामध्यें अशा प्रकारचा विचारविनिमय होत असे. आपल्याशीं संवाद करणारा गृहस्थ आपल्याशीं समरस आहे अशीच त्यावेळीं आगरकरांची ठाम समजूत झाली असली पाहिजे. पण या ठामपणास टिळकांच्या अस्थिर व धामधूमप्रिय वृत्तीनें पुढें मोठा थोरला धक्का बसणार आहे ही सरळ मनाच्या व सर्वस्वी सालस स्वभावाच्या आगरकरास त्यावेळीं कल्पना तरी झाली असेल काय ? “ आपण जणूं काय दुसरें हृदय, अशा मोकळ्या मनानें ज्याच्याशीं आतां बोलत आहां, तोच मित्र पुढें होळकरांच्या पैशासंबंधानें तुमच्यावर उचलेगिरीचा आरोप करण्यास प्रवृत्त होईल ” असें त्या वेळीं कोणी भविष्य वर्तविलें असतें तर तें आगरकरांना केव्हां तरी खरें वाटलें असतें काय ? हें सर्व भविष्य खरें ठरल्यानंतर, चरित्रकारांच्या म्हणण्याप्रमाणें आगरकर हे मृत्युशय्येवर असतां त्यांनीं टिळकांना मुद्दाम भेटावयास बोलाविलें या थापेवर कोणाचा तरी विश्वास बसणें शक्य आहे काय ? आणि टिळक आपण होऊन त्यांना भेटावयास गेले त्यावेळेस टिळकांच्या दर्शनानें वरील अनिष्ट गोष्टीचा चित्रपट त्यांच्या डोळ्यांपुढें आल्यानें त्यांस परमावधीचें दुःख झालें असल्यास त्यांत आश्चर्य तें काय ?

असो, देशभाषा युनिव्हर्सिटींत आणण्याला कोणती युक्ति काढावी याबद्दल आगरकरांना पहिल्यापासूनच तळमळ वाटत होती. टिळकांच्या हातून आपण होऊन तशी कांहीं युक्ति योजण्याचें दूरच राहिलें, पण रानड्यांसारख्या दूरदर्शी गृहस्थांनीं योजलेल्या युक्तीसही त्यांनीं, नुसता नव्हे, तर उपहासबुद्धीनें विरोध केला. इतर कित्येक गोष्टींप्रमाणें हीही गोष्ट टिळकांच्या चरित्रावर निःसंशय प्रकाश पाडील अशी आहे.

आपल्यांनीं आपल्या साक्षींत वर्णन केलेल्या राष्ट्रीय शिक्षणाच्या स्वरूपांत व त्यानंतर पंचवीस वर्षांनीं अस्तित्वांत आलेल्या राष्ट्रीय शिक्षणाच्या स्वरूपांत मुख्य अंतर म्हणजे त्यावेळीं राष्ट्रीय शिक्षण याचा अर्थ शिक्षणाचा सार्वजनिक प्रसार आणि तोही आपल्याच लोकांकडून व्हावा येवढाच होता. सरकारी ग्रँट न घेतां राष्ट्रीय शिक्षण चालवावयाचें ही कल्पना त्यावेळीं मुळींच अस्तित्वांत नव्हती. शाळेला मदत मागण्याकरितां सरकारदरबारीं येरझारा घालण्याचें काम स्वतः टिळक हौसेनें करीत होते. यावरून सरकारी ग्रँटचें त्या वेळच्या राष्ट्रीय शिक्षणास मुळींच पथ्य नव्हतें हें उघड दिसून येतें. पण टिळक हे त्याही चळवळींत होते आणि याही चळवळींत होते! त्यावेळची चळवळ शिक्षणविषयक स्वरूपाची होती; नंतरच्या चळवळींत राजकारणाची कालवाकालव झाली होती. 'अशी कालवाकालव केल्यानें आपलें नुकसान होणार आहे. कोणतीही चळवळ करावयाची झाल्यास ती शुद्ध व निर्मळ स्वरूपांत करावी' असा विचारी माणसांनीं यावेळीं सल्लाही दिला होता. पण कांहीं दिवस तरी धांवाधांव करावयास व लोकांकडून वहावा मिळावयास हें साधन चांगलें उपयोगी पडण्यासारखें आहे असा विचार करून टिळकांनीं त्याचा भरपूर फायदा घेतला. टिळकांनीं या नवीन ध्येयाच्या संस्थांस स्वतःचा पैसा देऊन किंवा पोटचीं मुलें त्यांत ठेवून कितपत सहानुभूति दाखविली हें महशूर आहे. परस्पर पावणेबाराचा सारा प्रकार!

भिन्न स्वरूपाच्या चळवळींची किंवा कार्यांची भेसळ करणें सर्वथा अनिष्ट आहे, हा सल्ला टिळकांना या वेळीं मानवला नसला तरी सोसायटी सोडतांना त्यांचेंही तसेंच मत होतें. न्यू इंग्लिश स्कूलला एक औद्योगिक शाखा जोडावी अशा प्रकारची सूचना टिळक सोसायटींत असतांनाच आली होती, पण त्या सूचनेचा त्यांनीं इनकार केला; त्या वेळीं त्यांनीं असें स्पष्ट सांगितलें कीं, धंदेशिक्षणाची आवश्यकता मलाही मान्य आहे.

पण आपण जें मुख्य कामं हातीं घेतलें आहे त्यापासून आपला लक्ष्य-भेद न होईल अशी आपण खबरदारी घेतली पाहिजे. धंदेशिक्षणाचें महत्त्व ज्यांना विशेष वाटत असेल त्यांनीं तसा वेगळा प्रयत्न करावा. आपल्या कार्यांत या प्रयत्नाची भेसळ होऊं देणें म्हणजे दोन्ही कार्यांची नुकसानी करून घेण्याप्रमाणें आहे. पण टिळकांच्या म्हणण्याचा आमच्या शब्दांत सारांश देण्यापेक्षां त्यांच्या राजीनाम्यांतीलच यासंबंधाचा उतारा देणें अधिक चांगलें असें आम्हांस वाटतें. टिळक आपल्या राजीनाम्यांत म्हणतात:—

"I do not mean and never meant that technical education is not a necessity, but the only way of accomplishing any object is to keep it steadily before our eyes and not allow ourselves to be drifted anywhere by the force of circumstances. If one thinks that he (one ?) can work up another aim better, the best thing is to do it separately and not to mix up the two things together to the prejudice of both."

परिस्थितीच्या प्रवाहाबरोबर वहात जाणें हें सर्वस्वीं गैरशिस्त आहे अशा आशयाचे वरील उताऱ्यांत जे उद्गार काढले आहेत त्यांची आठवण ठेवून टिळक हे आपल्या पुढल्या तीस वर्षांच्या आयुष्यक्रमांत वागले असते तर त्यांची प्रशंसा करण्यास हल्लीं आम्ही लिहीत आहों त्याच्या किती तरी पट लेख आम्हांला लिहावे लागले असते! फार कशाला, चरित्रकार आमचे मित्र रा. नरसिंह चिंतामण केळकर यांनाही टिळकचरित्र गाण्याकरितां अठरापगड प्रकरणें आणि शेंकडों भाकड भानगडी यांचा आश्रय करण्याचा उपहासास्पद प्रसंग केव्हांही आला नसता!

चाळीस वर्षांपूर्वींच्या व पंधरा वर्षांपूर्वींच्या राष्ट्रीय शिक्षणाच्या चळवळींत अनेक रीतींनीं फरक होता. कोणत्याही एका चळवळींत पुरस्कार घेणारास दुसऱ्या चळवळींत पडण्याची सोय नव्हती इतकें त्यांचें

स्वरूप भिन्न होतें. तरी सुद्धां या दोन्ही चळवळींत सारख्याच जोरानें व प्रमुखत्वानें पडण्यास टिळकांना यत्किंचित्हि संकोच वाटला नाहीं! जें ज्या वेळीं उपस्थित होईल तें मुक्तमनानें धोपटीत बसावयाचें हेंच त्यांच्या अस्थिरताप्रिय आयुष्यक्रमाचें सारसर्वस्व कसें होतें याचा हा एक नमुन्यांतला नमुना आहे. बरें, इतकेंही करून त्यापासून कांहीं निष्पत्ति झाली म्हणावें तर तेंही नाहीं! सोसायटी सोडतांना तिच्या कामाचा जसा त्यांनीं उपहास केला तसा अखेर याही चळवळींचा केला. या चळवळींसंबंधानें एका व्याख्यानांत त्यांनीं खालील उद्गार काढल्याचें प्रसिद्ध झालें आहे:—

"शिक्षण देणें हें सरकारचें काम आहे. सुशिक्षित लोकांनीं छोट्या शाळा उघडून शिक्षणप्रसार करूं पहाणें म्हणजे दर गांवाला निरनिराळीं पोस्ट ऑफिसें उघडून देशांतील टपाल खातें चालवूं पहाण्यासारखें व्यर्थ होय. अशानें काम होईल, पण तें फारच थोडें होईल. हें कर्तव्य सरकारचें आहे आणि तें करण्यास सरकारनें तयार झालें पाहिजे." (विविधज्ञान-विस्तार–वर्ष ५२–अंक–११–नोव्हेंबर–१९२१).

याप्रमाणें राष्ट्रीय शिक्षणाचें बारावें आणि बारसें दोन्हीं टिळकांच्या हातूनच झालीं! त्यांनीं केलेल्या चळवळींत पद्धतशीरपणा किंवा आदि-मध्यावसान केव्हांही न सांपडण्याचें कारण ते केव्हांही फारशा खोल पाण्यांत शिरत नसत हें होय. आणि असें होणें स्वाभाविकच होतें. खळबळ उडवून देण्यास त्यांना उथळ पाणीच विशेष सोयीचें वाटत असे!

# लेख नववा.

## कपटानें खेळलेला डाव.

राजीनामा देऊन स्वतः सोसायटी सोडून जातांना सोसायटींत शिल्लक राहिलेल्या माणसांच्या मागें जन्मभर कांहीं तरी शुक्लकाष्ठ लागावें या हेतूनें टिळकांनीं जेजुइट तत्त्वाचें नसतेंच लचांड आपल्या राजीनाम्यांत घुसडवून दिलें, त्याचप्रमाणें सोसायटीसंबंधानें लोकांच्या मनांत अप्रियता उत्पन्न व्हावी या हेतूनें न्यू इंग्लिश स्कूलच्या आद्यसंस्थापकांपैकीं सोसायटींत अवशिष्ट राहिलेले रा. गोपाळ गणेश आगरकर यांच्याही वर एका गलिच्छ आरोपाचे शिंतोडे उडविण्याचा त्यांनीं अश्लाघ्य प्रयत्न केला. तो प्रयत्न होळकरांच्या देणगीसंबंधांतील होय. या देणगीसंबंधांत राजीनाम्यांतिल मजकुराच्या आधारानें चरित्रकारांनीं दोन विधानें केलीं आहेत. (१) होळकरांनीं दिलेल्या सातशें रुपयांपैकीं टिळकांनीं आपल्या वांट्याची रकम संस्थेस दिली व (२) आगरकरांनीं आपल्या हिश्याची रकम खासगीकडे घेतली, हींच तीं दोन विधानें होत आणि तीं दोन्ही विधानें निखालस खोटीं आहेत. एक तर, ही रकम टिळक व आगरकर या दोघांना मिळून दिली अशी मुळींच वस्तुस्थिति नव्हती. अर्थातच सदरील रकमेंत टिळकांचा वांटाच नव्हता, तर ते तो संस्थेस जमा करतील कसे? या देणगीसंबंधांत टिळकांनीं नसतेंच भांडण उपस्थित केल्यामुळें "असला मत्सरानें विटाळलेला पैसा मी विष्ठेसमान मानतों. मी त्याला स्पर्शही करणार नाहीं." अशी आगरकरांनीं प्रतिज्ञा केली आणि ती आगरकरांची प्रतिज्ञा असल्यामुळें शब्दशः पाळण्यांत आली हें सांगावयास नकोच. यावरून वरील दोन्ही विधानें सर्वस्वीं कशी असत्य आहेत याबद्दल वाचकांची खात्री होईल.

शक्य नाहीं. फार कशाला, त्यांच्या एका भक्तनायकानें हें जें सातशें पानांचें चरित्र लिहिलें आहे त्यांतही हे कपटाचे डाव येथून तेथून पसरलेले दिसतील. टिळकांचें चरित्र म्हणजे कपटाच्या डावांचा चित्र-विचित्र गालिचाच आहे, याबद्दल टिळकांच्या भक्तांत व आमच्यांत द्विधामत नाहीं. द्विधामत आहे तें त्यांचे भक्त टिळकांच्या या 'हिकमतबहादुरीचें' भाविकपणानें कौतुक करतात आणि आम्ही त्याचा निर्भेळ निषेध करतों यांतच आहे!

आगरकरांना कमीपणा आणण्याचा टिळकांचा हेतु नव्हता का? याचेंही उत्तर अस्तिपक्षीं म्हणजे "होय, होता" असेंच दिलें पाहिजे. सोसायटी सोडून जावें असें टिळकांना वाटूं लागलें तेव्हांपासूनच सोसायटींत शिल्लक राहणाऱ्या प्रमुख सभासदांवर व्यक्तिशः व समूहशः कांहीं तरी नवीनच बिनतोड तोहमत ठेवण्याचे कामीं त्यांच्या कल्पक डोक्यांत धडपड सुरू झाली आणि होळकरांच्या देणगीसंबंधांतील कलागत हें त्याच धडपडीचें नामांकित अपत्य होय. पण हें अपत्य अगदींच अल्पजीवि ठरलें. कारण, आपली मुळींच नसलेली निम्मी रक्कम सोसायटीकडे जमा करण्याचा त्याचा डाव, रक्कम हातीं येणें व होळकरांचें पत्र येणें, या सर्व व्यवहाराच्या दरम्यानचा काळ म्हणजे सुमारें पंधरा सोळा तासच होता! टिळकांच्या कल्पनेचें व मायावीपणाचें हें अपत्य फक्त कांहीं तासांच्या गर्भावस्थेनंतरच जन्मास आलें आहे. पण त्यानें एका थोर व असामान्य पुरुषाच्या चारित्र्यावर शिंतोडे उडविण्याचें काम, कांहीं कालपर्यंत कां होईना, पण बिनतोड रीतीनें केलें. असो. या खुलाशानें तरी हें गुणी अपत्य कोणत्या जातीचें आहे, व त्याच्या जनकत्वाचा मान कोणाकडे येतो याचा खरा इतिहास जनतेस पटेल असा आम्हांस पूर्ण भरंवसा वाटतो.

अशी देणगी आपल्याला आधीं मिळेल हें भाकित टिळकांनीं पूर्वीच कसें केलें होतें यासंबंधानें चरित्रकारांनीं लिहिलेला मजकूर फारच मनोरंजक आहे. ते म्हणतातः—

"इंदुर सरकारकडून मिळालेल्या ७०० रुपयांच्या देणगीसंबंधानें टिळकांनीं असें स्पष्ट विधान केलें होतें कीं इंदुरकर महाराजांकडून उभयतांना बोलावणें आलें तेव्हां ते कांहीं तरी रक्कम देणगी म्हणून देतील अशी उभयतांना कल्पना आली. पण संभावनेदाखल मिळणारी रक्कम स्वतःकरितां न घेतां केवळ संस्थेकरिताच स्वीकारण्याचा संकल्प जाण्यापूर्वीं स्पष्ट करूनच आपण महाराजांकडे गेलों. पण पुढें रक्कम मिळाल्यावर आगरकरांचें मन पालटलें व शेवटीं आगरकरांनीं आपल्या हिश्याची रक्कम खासगीकडे घेतली व टिळकांनीं ती घेतली नाहीं."

"सातशें रुपयांच्या देणगीसंबंधानें टिळकांनीं असें स्पष्ट विधान केलें होतें" या वाक्यांतलि स्पष्ट हा शब्द खरोखरच टिळकांची आठवण करून देतो! एकाद्या शब्दामागें एकादें ठासून विशेषण घातलें कीं लोकांना तें हमखास खरें वाटलेंच पाहिजे, अशा समजुतीनेंच चरित्रकारांनीं या ठिकाणीं गुरूंचें अनुकरण केलें आहे; पण "हें स्पष्ट विधान केलें होतें." तें कोठें, केव्हां व कोणापाशीं हें सांगितल्याशिवाय त्यास कवडीचीही किंमत येत नाहीं, हें चरित्रकारांना लोकांनीं सांगावयास पाहिजे असें नाहीं. टिळकांच्याच शब्दांत सांगावयाचें म्हणजे "हें कोर्टांत टिकावयाचें नाहीं" इतकेंच नव्हे, तर कोर्टाबाहेरील सामान्य व्यवहारांतही त्यास कोणी मान देणार नाहीं हें उघड आहे.

महाराज संभावनेदाखल उभयतांना कांहीं रक्कम देणार अशी टिळकांना आधींच कल्पना झाली होती! टिळकांचीच कल्पना ती! ती अचूक खरी व्हावयाची हें ठरल्यासारखेंच होतें. अर्थात् कल्पनेप्रमाणें संभावनेदाखल कांहीं रक्कम मिळाल्यास ती सोसायटीला द्यावयाची हें टिळकांच्या वैराग्यशील मनानें ठरविणें व तें त्यांनीं आगरकरांना कळवून त्यांचेकडून त्याबद्दल मान्यता घेणें हें क्रमप्राप्तच होतें आणि त्याप्रमाणें तें सर्व घडूनही आलें! पण महाराज टिळकांच्या बारशाला जेवलेले! टिळकांचें दर्शन होतांच या सर्व कल्पना व त्यांवर टिळकांनीं

शक्य नाहीं. फार कशाला, त्यांच्या एका भक्तनायकानें हें जें सातशें पानांचें चरित्र लिहिलें आहे त्यांतही हे कपटाचे डाव येथून तेथून पसरलेले दिसतील. टिळकांचें चरित्र म्हणजे कपटाच्या डावांचा चित्र-विचित्र गालिचाच आहे, याबद्दल टिळकांच्या भक्तांत व आमच्यांत द्विधामत नाहीं. द्विधामत आहे तें त्यांचे भक्त टिळकांच्या या ' हिकमत-तबहादुरीचें ' भाविकपणानें कौतुक करतात आणि आम्ही त्याचा निर्भेळ निषेध करतों यांतच आहे!

आगरकरांना कमीपणा आणण्याचा टिळकांचा हेतु नव्हता का? याचेंही उत्तर आस्तिपक्षीं म्हणजे "होय, होता" असेंच दिलें पाहिजे. सोसायटी सोडून जावें असें टिळकांना वाटूं लागलें तेव्हांपासूनच सोसायटींत शिल्लक राहणाऱ्या प्रमुख सभासदांवर व्यक्तिशः व समूहशः कांहीं तरी नवीनच बिनतोड तोहमत ठेवण्याचे कामीं त्यांच्या कल्पक डोक्यांत घडपड सुरू झाली आणि होळकरांच्या देणगीसंबंधांतील क्लृप्ति हें त्याच घडपडीचें नामांकित अपत्य होय. पण हें अपत्य अगदींच अल्पजीवि ठरलें. कारण, आपली मुळींच नसलेली निम्मी रक्कम सोसायटीकडे जमा करण्याचा त्याचा डाव, रक्कम हातीं येणें व होळकरांचें पत्र येणें, या सर्व व्यवहाराच्या दरम्यानचा काळ म्हणजे सुमारें पंधरा सोळा तासच होता! टिळकांच्या कल्पनेचें व मायावीपणाचें हें अपत्य फक्त कांहीं तासांच्या गर्भावस्थेनंतरच जन्मास आलें आहे. पण त्यानें एका थोर व असामान्य पुरुषाच्या चारित्र्यावर शिंतोडे उडविण्याचें काम, कांहीं कालपर्यंत कां होईना, पण बिनतोड रीतीनें केलें. असो. या खुलाशानें तरी हें गुणी अपत्य कोणत्या जातीचें आहे, व त्याच्या जनकत्वाचा मान कोणाकडे येतो याचा खरा इतिहास जनतेस पटेल असा आम्हांस पूर्ण भरंवसा वाटतो.

अशी देणगी आपल्याला आधीं मिळेल हें भाकित टिळकांनीं पूर्वीच कसें केलें होतें यासंबंधानें चरित्रकारांनीं लिहिलेला मजकूर फारच मनोरंजक आहे. ते म्हणतात:-

"इंदुर सरकारकडून मिळालेल्या ७०० रुपयांच्या देणगीसंबंधानें टिळकांनीं असें स्पष्ट विधान केलें होतें कीं इंदुरकर महाराजांकडून उभयतांना बोलावणें आलें तेव्हां ते कांहीं तरी रक्कम देणगी म्हणून देतील अशी उभयतांना कल्पना आली. पण संभावनेदाखल मिळणारी रक्कम स्वतःकरितां न घेतां केवळ संस्थेकरिताच स्वीकारण्याचा संकल्प जाण्यापूर्वीं स्पष्ट करूनच आपण महाराजांकडे गेलों. पण पुढें रक्कम मिळाल्यावर आगरकरांचें मन पालटलें व शेवटीं आगरकरांनीं आपल्या हिश्याची रक्कम खासगीकडे घेतली व टिळकांनीं ती घेतली नाहीं."

"सातशें रुपयांच्या देणगीसंबंधानें टिळकांनीं असें स्पष्ट विधान केलें होतें" या वाक्यांतील स्पष्ट हा शब्द खरोखरच टिळकांची आठवण करून देतो! एकाद्या शब्दामागें एकादें ठासून विशेषण घातलें कीं लोकांना तें हमखास खरें वाटलेंच पाहिजे, अशा समजुतीनेंच चरित्रकारांनीं या ठिकाणीं गुरूंचें अनुकरण केलें आहे; पण "हें स्पष्ट विधान केलें होतें." तें कोठें, केव्हां व कोणापाशीं हें सांगितल्याशिवाय त्यास कवडीचीही किंमत येत नाहीं, हें चरित्रकारांना लोकांनीं सांगावयास पाहिजे असें नाहीं. टिळकांच्याच शब्दांत सांगावयाचें म्हणजे "हें कोर्टांत टिकावयाचें नाहीं" इतकेंच नव्हे, तर कोर्टाबाहेरील सामान्य व्यवहारांतही त्यास कोणी मान देणार नाहीं हें उघड आहे.

महाराज संभावनेदाखल उभयतांना कांहीं रक्कम देणार अशी टिळकांना आधींच कल्पना झाली होती! टिळकांचीच कल्पना ती! ती अचूक खरी व्हावयाची हें ठरल्यासारखेंच होतें. अर्थात् कल्पनेप्रमाणें संभावनेदाखल कांहीं रक्कम मिळाल्यास ती सोसायटीला द्यावयाची हें टिळकांच्या वैराग्यशील मनानें ठरविणें व तें त्यांनीं आगरकरांना कळवून त्यांचेकडून त्याबद्दल मान्यता घेणें हें क्रमप्राप्तच होतें आणि त्याप्रमाणें तें सर्व घडूनही आलें! पण महाराज टिळकांच्या बारशाला जेवलेले! टिळकांचें दर्शन होतांच या सर्व कल्पना व त्यांवर टिळकांनीं

रचलेला व्यूह हें त्यांच्या अचूक ध्यानांत येऊनच कीं काय त्यांनीं आपल्या देणगींतून नेमकें टिळकांना खड्यासारखें वगळलें. "आपल्याला माणसाची अचूक परीक्षा आहे व आपण माणूस पाहिल्याबरोबर तो सच्चा आहे कीं लुच्चा आहे हें ओळखतों" असा कै. शिवाजीराव होळकर यांना मोठा अभिमान असे. हा अभिमान यदृच्छया कां होईना, पण टिळक व आगरकर हे त्यांना भेटावयास गेले तेव्हां खरा ठरला. कारण या दोघांना पाहिल्याबरोबरच आगरकर हे सच्चे आहेत अशी त्यांची भावना झाली व या गृहस्थाला कांहीं रक्कम द्यावी असें साहजिकच त्यांच्या मनांत आलें. रोकड रक्कम द्यावी तर ते घेणार नाहींत असें त्यांच्या समीपवर्ती माणसांनीं त्यांना सांगितल्यावरून "वाक्यमीमां " या पुस्तकाच्या पांच सहाशें प्रती घेऊन त्यांना ही रक्कम पोहोंचवावी असें त्यांनीं ठरविलें आणि त्याप्रमाणें रकमेच्या पाठोपाठ पत्रही पाठविलें. टिळकही कांहीं कमी नव्हते. कोणतेंही काम हातीं घेतलें म्हणजे ते एका क्षणाचाही आळस करणारे नव्हते. रक्कम आलीरे आली कीं त्यांत-ल्या निम्यावर आपला 'गोमागणेशी' शिक्कामोर्तब करून ती त्यांनीं सोसा-यटीस देऊनही टाकली! त्यांनीं कोणालाही न कळवितां सवरतां गुप्त-दान करण्याकरितां हा जो परस्पर स्वार्थत्याग करण्याचा उदात्त हेतु अमलांत आणण्याचा घाट घातला होता तो होळकरांच्या पत्रानें समूळ फसला! कारण टिळकांनीं जमा केलेल्या रकमेची शाई वाळते न वाळते तोंच होळकरांचें पत्र येऊन त्यानें टिळकांना सबंद रकमेच्या तीन सप्तमां-शाच्या (तीनशेंच्या) एक दशांशाचें म्हणजे अवघ्या तीस रुपयांचें मालक ठरविलें!

होळकरांची रक्कम आणि पत्र यांजमधील कांहीं थोड्याच तासांच्या अवधींत टिळकांनीं या प्रकरणीं जी उलाढाल केली तिचा विचार करतां "आगरकरांना तोंडघशीं पाडण्याचा हा कपटाचा डाव होता" असें म्हणण्याशिवाय गत्यंतर रहात नाहीं आणि वस्तुस्थितिही तशीच होती.

तरीसुद्धां ज्या पैशाकरितां, होळकरांचें पत्र आलें असतांही टिळकांनीं इतका वाद माजविला त्यांतील एक पैही घ्यावयाची नाहीं हा आपला बाणा आगरकरांनीं आचरणांत आणला हीच यांतील मुख्याची गोष्ट होय.

होळकरांकडून आपल्याला रकम मिळाल्यास ती सोसायटीला द्याव-याची असें टिळक व आगरकर यांचें खरोखरच ठरलें असतें तर त्यांतून आगरकर माघार घेतील अशी त्यांच्या कट्ट्या शत्रूचीही कल्पना होणार नाहीं. ज्यानें आपलें सर्वस्व शिक्षणकार्यास अर्पण करून आजन्म निःसीम स्वार्थत्याग केला तो गहस्थ, एका चारशें रुपयांकरितां एवढी घासाघीस घालीत बसेल कीं काय, याचा निवाडा कोणासही सहज करतां येण्यासारखा आहे. आपण दोघेही महाराजांना भेटावयास गेलों, आपला दोघांचाही दर्जा सारखा, असें असून महाराजांनीं आगर-करांचाच गौरव करावा आणि आपल्याकडे दुर्लक्ष्य करावें ही गोष्ट टिळकांच्या आत्मैकनिष्ठ व महत्त्वाकांक्षी मनास दुःसह वाटावी हें स्वाभा-विक आहे आणि पुढें जें या गोष्टीचें एवढें काल्पित कथानक त्यांनीं रचिलें त्याचे मूळ टिळकांच्या या मनोवृत्तींतच खोल गेलेलें सांपडेल.

होळकरप्रकरणाची बोर्डापुढें चर्चा झाली त्या वेळेस टिळकांचा विरोधी पक्षच नव्हे तर त्यांचे जिवलग स्नेही म्हणविणारे सभासदही आगरक-रांच्या बाजूस होते, ही यासंबंधांतील स्थिति सत्य कोणत्या बाजूस होतें, याचें निःसंशय प्रदर्शन करणारी आहे. यासंबंधांत आगरकरांवर टिळकांनीं तोंडी व लेखी जे गलिच्छ आरोप केले त्यांबद्दल त्यांच्यावर फिर्याद करावी असाही कित्येक सभासदांनीं सल्ला दिला. पण आपसांतील ही यादवी चव्हाट्यावर आणणें हें विशेषतः लोक-शिक्षणाचें काम करणारास, कमीपणा आणणारें आहे, याच युक्तिवादाचा अखेर जय होऊन या प्रकरणाची कोर्टापर्यंत मजल गेली नाहीं.

होळकरांना आगरकरांच्याबद्दल विशेष आदर वाटत होता, याला दुसराही एक प्रत्यंतर पुरावा आहे. आगरकरांच्या निधनोत्तर त्यांच्या

मुलाला होळकरांनीं शिष्यवृत्ति दिली होती, ही गोष्ट सर्वांना महशूरच आहे. या सर्व गोष्टींचा समवायानें विचार केला म्हणजे होळकरांच्या देणगीसंबंधानें वस्तुस्थिति काय असली पाहिजे, याचा कोणासही आपल्या मनाशीं उलगडा करतां येण्यासारखा आहे. होळकरांच्या पैशा-संबंधांत आपली बाजू सर्वथा सत्य आहे, या कामीं टिळकांव्यतिरिक्त आपले सर्व व्यवसायबंधु आपल्या बाजूचे आहेत, अशी अनुकूल स्थिति असतांही कलहानें कलंकित झालेल्या या पैशावर आगरकरांनीं अखेर उदकच सोडलें, यावरून निष्कलंक चारित्र्य खरोखरच कोणाचें होतें, टिळकांचें कीं आगरकरांचें, याचाही आपोआपच निर्णय लागतो.

## लेख दहावा.

### टिळक आणि गोखले.

डेक्कन एज्युकेशन सोसायटीवरून टिळकांचें चित्त उडण्यास आण-खीही एक विशेष कारण घडून आलें. टिळकांनीं सोसायटीचा प्रत्यक्ष अखेरचा निरोप घेतला त्यापूर्वीं पांच वर्षें गोखले हे सोसायटीस येऊन मिळाले होते. टिळक—आगरकरांना कोल्हापूरच्या खटल्यांत शिक्षा झाली त्या वेळेपासूनच गोखल्यांची या उभयतांवर विशेष भक्ति बसली आणि या भक्तीनें प्रेरित होऊनच ते सोसायटीस येऊन मिळाले. गोखले हे टिळक व आगरकर व सोसायटींतील इतर मंडळी यांच्याहून वयानें फार लहान होते. पण कर्तृत्वांत इतर कोणाहीपेक्षां कमी नव्हते. अशा प्रकारचा बुद्धिवान्, होतकरू, व्यासंगी व लोकहिताबद्दल तळमळ बाळगणारा असा मनुष्य आपल्या सोसायटीस मिळाला याबद्दल सोसायटींतील सभासदांना विशेष आनंद व कौतुक वाटे. टिळक हे त्यास अर्थातच अपवाद होते. गोखले सोसायटींत आले ते टिळकभक्तीनेंच आले. पण टिळकांना, गोखल्यांचें हें आपल्या मार्गांत एक नवीनच लचांड उपस्थित

झालें असें वाटून सोसायटीसंबंधानें त्यांची आधींच बावरलेली वृत्ति अधिकच बावरली ! गोखल्यांच्या होतकरूपणास व उपयुक्त कार्य करण्याच्या हौसेस बाकी सर्व सभासदांकडून, विशेषतः आगरकरांकडून शक्य त्या सर्व प्रकारें उत्तेजन मिळत असे. पण आपल्यापेक्षां दहा वर्षें लहान असलेल्या व ओंठावर पुरती मिशीही न फुटलेल्या या पोरसवदा माणसानें आपल्या प्रतिष्ठेस धक्का बसविण्याइतकी हुषारी व कार्यक्षमता दाखवावी ही गोष्ट टिळकांच्या आत्मैकनिष्ठ बाण्यास व मत्सरी स्वभावास स्वाभाविकच असह्य होऊं लागली आणि गोखले सार्वजनिक कामांत पडून सार्वजनिक सभेचे सेक्रेटरी झाले तेव्हां तर या असह्यतेचा पारा भयंकर वर चढला आणि टिळकांनीं नसते वाद सोसायटीमध्यें माजविले व सोसायटीचा राजीनामा देण्यांत त्याचें पर्यवसान झालें !

टिळकांचा मोठेपणा, त्यांचा लौकिक, त्यांचा कार्यविस्तार हीं सर्व परोपजीवी कशीं होतीं याबद्दल यापूर्वीच विवेचन केलें आहे. कोणाची तरी कुचेष्टा किंवा कुचाळकी करण्याची संधि सांपडल्या-शिवाय त्यांच्या लोकोत्तर बुद्धीस उठावणी मिळत नसे. अनेक प्रमुख व कार्यकर्त्या पुरुषांनीं त्यांना या कामीं हात दिला आहे. पण त्यांतल्या त्यांत त्यांना उत्कृष्ट सहाय्य कोणाचें झालें असेल तर तें गोखल्यां-चेंच होय. गोखल्यांची इतर कोणती कामगिरी टिळकभक्तांच्या डोळ्यांत भरण्यासारखी नसली तरी त्यांची ही कामगिरी निःसंशय त्यांनाही संस्मरणीय वाटेल !

गोखल्यांचा पाडाव करण्याची भलीबुरी संधि टिळकांनीं कव्हांही वायां जाऊं दिली नाहीं. गोखल्यांनीं कोणतेंही कार्य, कितीही सद्धेतुपूर्वक केलें, तरी तें विकृत स्वरूपांत दाखविण्याचे कामीं टिळकांची बुद्धि कधींही असमर्थ ठरली नाहीं. टिळक हे गोखल्यांच्या आधीं १० वर्षें जन्मास आले व पांच वर्षांनीं मागून गेले. आयुष्यक्रमांत अशा

रीतीनें दहा वर्षांचा स्टार्ट मिळाला असतांहि टिळकांना दृश्य व भावी पिढ्यांना जिचा प्रत्यक्ष अनुभव घ्यावयास सांपडेल अशी म्हणण्या- सारखी कोणतीही कामगिरी करून दाखवितां आली नाहीं. आज पुण्यांत एखादा परका मनुष्य आला आणि टिळकांचें कार्य कोणतें आणि गो- खल्यांचें कार्य कोणतें हें पाहूं लागला तर रानडे गोखले संप्रदायाच्या अनेक संस्था येथें व्यवस्थित रीतीनें चालू असलेल्या त्यास दिसतील; आणि तेवढ्या पाहूनच त्यास परत जावें लागेल! टिळकांचें कार्य पाहण्याचा तो आग्रह धरून बसेल तर त्याच्या पदरीं केवळ निराशेचें माप पडल्यावांचून राहणार नाहीं. त्यास टिळकांची विधायक अशी कामगिरी कोणतीही दिसणार नाहीं. मात्र ज्या भांडणांत व कज्जे- कफावतींत त्यांनीं आपलें सर्व आयुष्य वेंचलें त्याच भांडणाची परंपरा त्यांचे शिष्य, परस्परांचा हेवादावा करून अव्याहत रीतीनें चालवीत आहेत असें त्यास दिसून येईल! टिळकांनीं आपल्या आयुष्यक्रमांत विलक्षण प्रकारची जागृति केली, पण ती कार्यप्रवर्तक नव्हती, कार्यवि- घातक होती, त्याचाच हा परिणाम होय. व्यक्तिमाहात्म्य किंवा विभूति- पूजा हाच या जागृतीचा मध्यबिंदु असल्यामुळें व्यक्तीच्या देहावसाना- बरोबर ही जागृतिही देहावसानाच्या पंथास लागावी हें स्वाभाविकच आहे. आणि आजची टिळकांच्या अनुयायांची स्थिति हीच गोष्ट सिद्ध करीत आहे.

आपणांमध्यें नाहीं अशी विलक्षण कर्तबगारी गोखल्यांच्या मध्यें आहे हें न साहून टिळकांच्या मत्सरी मनाचा जळफळाट झाला असल्यास त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. याचमुळें गोखले सोसायटींत येऊन सार्वजनिक कामांत पडूं लागल्यापासून तों तहत त्यांचे अंतकालापर्यंत टिळकांनीं त्यांचा पाठपुरावा केला, आणि आपल्या नेहमींच्या रिवाजास अनुसरून त्या कामीं टिळकांनीं भल्याबुऱ्याची किंवा खऱ्याखोट्याची काडी- मात्रही परवा बाळगली नाहीं. आपण लिहूं तें वेदवाक्याप्रमाणें मानणारे आपले हजारों वाचक आहेत, प्रतिपक्षीयांची बाजू खरी असली तरी

तिला विचारतो कोण? अशा घमेंडीनें गोखल्यांच्या नालस्तीनें भरलेले रकानेचे रकाने केसरींत प्रसिद्ध करून गोखल्यांच्या संबंधीं जनतेंत गैरसमज पिकविण्याचे टिळकांनीं शेंकडों प्रयत्न केले. त्यांपैकीं सार्वजनिक महत्त्वाचा असा विशेष प्रसंग म्हणजे स. १८९७ सालीं गोखल्यांनीं मागितलेल्या माफीचा होय.

पंचवीस वर्षांपूर्वीं पुणें येथें प्रथम प्लेग सुरू झाला त्या वेळीं सरकारनें जे उपाय योजले त्यासंबंधांत कांहीं खासगी पत्रांवर विसंबून गोखल्यांनीं विलायतेंत कित्येक विधानें केलीं. पण या विधानांचें समर्थन होणें शक्य दिसेना, तेव्हां गोखल्यांना माफी मागितल्यावांचून गत्यंतरच उरलें नाहीं. टिळक--आगरकरांवर कोल्हापूरचा खटला झाला त्या वेळेस बरोबर याच कारणावर त्यांना माफी मागावी लागली आणि तिचा उल्लेख चरित्रकारांनींही पा. १४१ वर केला आहे. स. १८९७ सालीं टिळकांच्यावर खटला झाला त्या वेळेस त्यांनींही एक माफीचा मसुदा तयार केला होता ही गोष्ट त्या काळची प्रत्यक्ष माहिती असलेल्या गृहस्थांस सांगावयास नकोच. चरित्रकारांनीं मात्र या गोष्टीचा निर्देश करण्याचें टाळलें आहे. त्यांनीं उलट असें लिहिलें आहे कीं, "टिळकांनीं माफी मागावी अशाबद्दल कित्येक स्नेह्यांनीं मध्यस्थी केली पण ही माफी मागण्याची सूचना टिळकांनीं झिडकारली." पण ही गोष्ट खरी नाहीं.

"मीं लिहिलेले लेख राजद्रोहात्मक आहेत असें मला वाटत नाहीं. तथापि सरकारच्या कायद्याचे सल्लागारांना ते तसे वाटत असतील तर त्याबद्दल मला वाईट वाटतें." अशा आशयाची माफी मागण्यास टिळक तयार होते, इतकेंच नव्हे तर एक वर्ष शिक्षा भोगल्यानंतर "मी पुनः असें करणार नाहीं. केल्यास राहिलेले सहा महिने मी विनतक्रार भोगीन" असें स्पष्टपणें सरकारास लिहून देऊन तुरुंगांतून त्यांनीं आपली सुटका करून घेतली. ही गोष्ट मात्र मोठ्या शिताफीनें टिळकांनीं बहुत काळ लपवून ठेवली होती. परंतु हल्लीं ती सुप्रसिद्ध झाली आहे. टिळकांनीं

लिहून दिलेला हा करार चिरोल-केसमध्यें पुराव्यांत दाखल झाला असून टिळकांनीं स्वतः आपल्या जबानींत, मीं तो लिहून दिला होता असें कबूल केलें आहे. या गोष्टी वेळींच चव्हाट्यावर येत्या तर गोखल्यांच्या माफी-संबंधानें वेळोवेळीं काहूर उठविणें टिळकांना खचित शक्य झालें नसतें. यासंबंधानें लिहितांना चरित्रकार म्हणतातः--

"दुर्दैवानें गोखले यांनीं केलेल्या विधानांत अतिशयोक्ति होती. पुण्याहून कित्येक प्रतिष्ठित, पोक्त व विद्वान् स्नेह्यांनीं पाठविलेल्या खासगी पत्रांच्या आधारावर गोखल्यांकडून हीं विधानें करण्यांत आलीं होतीं. पण एक चूक निराधार बातम्या लिहिणारांची तर दुसरी चूक त्या जाहीर करणारांची. गोखल्यांना काय माहीत कीं आयत्या वेळीं आपले बातमीदार दगा देतील. पण कोल्हापूर प्रकरणांत जो अनुभव टिळकांना आला तोच या प्रकरणांत गोखल्यांनाही आला. पूर्वी टिळक-आगरकरांना जशी माफी मागावी लागली तशीच पुढें गोखल्यांनाही मागावी लागली."

चरित्रकारांची माफीची ही मीमांसा कोणासही मान्य होण्यासारखी आहे. पण "गोखल्यांनीं केलेल्या आरोपाच्या बाबतींत गोखल्यांच्या मित्रांकडून गोखल्यांचें जें समर्थन किंवा पाठपुरावा झाला नाहीं तो टिळकांकडून झाला असेंही कदाचित् पुढें लोकप्रत्ययास येण्याचा संभव होता" व "गोखल्यांनीं केलेलीं विधानें शाबीत करण्याच्या खटपटींत असतां टिळक हे तुरुंगांत गेले" अशीं दोन निरनिराळ्या ठिकाणीं विधानें करून टिळक हे गोखल्यांच्यासाठीं योग्य पुरावा जमविण्याच्या खटपटींत खरोखरच होते, असें भासविण्याचा चरित्रकारांनीं प्रयत्न केला आहे. प्लेगच्या पुण्यांतील अमदानीमधील अत्याचाराबद्दल माहिती गोळा करून ती इंग्रजींत छापण्याची टिळक यांची खटपट, त्यांस पकडलें त्या वेळीं चालू होती. परंतु त्याचा गोखल्यांच्या पाठपुराव्याशीं कांहीं संबंध नव्हता. प्लेगच्या बंदोबस्तासंबंधांतील योजना टिळकांना सामान्यतः मान्य असल्याचें चरित्रकारांनींच केसरींतून दिलेल्या एका उताऱ्यावरून दिसून येतें. ता. १३ एप्रिलच्या अंकांतील उताऱ्यांत टिळक म्हणतातः--

" या असल्या राक्षसाला ( प्लेगला ) विरोध करण्यास राक्षसीच उपाय पाहिजे व तो सांपडेल तेथें त्यास धरून खणून काढला पाहिजे. हल्लीं घरें सफाई करण्याचें वगैरे जें काम गांवांत चाललें आहे तें शास्त्रोक्त आहे व हें काम जर अशा रीतीनें चाललें नसतें तर पुण्याच्या रस्त्यांत प्रेतें पडण्याची वेळ आली असती. "

ता. २० जुलै १८९७ च्या केसरीच्या अंकांतील एका स्फुटांत "प्रो. गोखले हे शेवटपर्यंत येथें नसल्यामुळें त्यांच्या **वर दिलेल्या दोन विधानांत थोडीशी अतिशयोक्ति आहे व एकास तर कांहींच पुरावा नाहीं** " असे टिळकांनीं उद्गार काढले आहेत. याच स्फुटांत " प्लेगसंबंधाच्या ज्या कोणाच्या तक्रारी असतील त्या पत्त्यामुद्यासह केसरीकडे कळवाव्या" असेंही त्यांनीं प्रसिद्ध केलें होतें. गोखल्यांना पुरावा जमवून देण्याकरितां त्यांनीं केलेली खटपट ती हीच काय ती दिसते. यानंतर एक आठवड्यानेंच टिळक पकडले गेले आणि त्यांना पकडण्यांत आल्यानंतर तीन दिवसांनीं म्हणजे ता. ३० जुलै रोजीं गोखले विलायतेहून मुंबईस परत आले. गोखल्यांना आपलीं विधानें सपशेल परत घ्यावीं लागणार याचा सुगावा ते हिंदुस्थानांत येण्यापूर्वींच टिळकांना कित्येक दिवस लागला होता म्हणूनच गोखल्यांकरितां पुरावा जमविण्याची टिळकांची खरोखरच इच्छा होती तर तसा प्रयत्न त्यांनीं यापूर्वींच करावयास पाहिजे होता. शिवाय गोखल्यांनीं केलेलीं विधानें अत्युक्तियुक्त किंवा निराधार आहेत असें आपलें मत प्रदर्शित करणारे टिळक त्याच स्फुटांत पुरावा मागतात, नव्हे लोकांना कांहीं तक्रारी असल्या तर त्या कळविण्यास सूचना करतात, याचें महत्त्व लोकांना तरी किती वाटणार ? लोकांना त्यांचें महत्त्व वाटलें नाहीं तरी टिळक हे गोखल्यांच्या करितां पुरावा जमवीत आहेत अशा लोकांत पसरणाऱ्या बातमीस या स्फुटानें पुरावा मिळावा हा हेतु मात्र शहाजोग रीतीनें पदरांत पडला ! आणि या व्यवसायांत असतांच टिळकांवर खटला झाला या गोष्टीनें तर ही द्रुम विशेष उठावांत दासविण्यास उत्कृष्ट मदत केली !

# लेख अकरावा.

## पुनः तेंच.

" प्रो. गोखले हे शेवटपर्यंत येथें नसल्यामुळें त्यांच्या वर दिलेल्या दोन विधानांत थोडीशी अतिशयोक्ति आहे व एकास तर कांहींच पुरावा नाहीं " ही गोष्ट केसरींतील एका स्फुटांत टिळकांनीं कबूल केल्यानंतर टिळकांना पुरावा जमविण्यास शिल्लक काय राहिलें हेंच आम्हांस समजत नाहीं. गोखल्यांना माफी मागावी लागली ती याच दोन विधानांबद्दल आणि हीं दोन्हीं विधानें अत्युक्तियुक्त असून एकास तर कांहींच पुरावा नाहीं असें कबूल करणारे टिळक म्हणजे या विधानांबद्दल माफी मागण्यावांचून गत्यंतर नाहीं असेंच कबूल करणारे टिळक पुढें पुरावा कशाचा जमविणार होते ? ज्याला मुळींच पुरावा नाहीं त्याला टिळक झाले तरी पुरावा काय जमविणार ? आणि ज्या इतर गोष्टींबद्दल पुराव्याचें कारणच नव्हतें, म्हणजे ज्यांचा वर्तमानपत्रांतून वगैरे उघड रीतीनें ऊहापोह चालू होता त्यांना पुरावा जमविण्याचा प्रश्नच उपस्थित होणें शक्य नव्हतें. अर्थात् गोखल्यांच्याकरितां टिळकांच्या पुरावा जमविण्याच्या खटपटीस वावच रहात नाहीं, ही गोष्ट वरील विवेचनावरून कोणाच्याही ध्यानांत येईल.

गोखल्यांचा व टिळकांचा सार्वजनिक कामांत कट्टा विरोध असतांही गोखल्यांना एका आणीबाणीच्या प्रसंगीं सहाय्य करण्याइतकें टिळकांचें मन थोर व उदार आहे असेंच भासविण्याचा टिळक व त्यांचे भक्त यांचा, ही बातमी जाहीर करण्यांत, स्पष्ट उद्देश दिसून येतो. पण त्यामुळें निदान आतां तरी कोणी फसलें जाईल असा संभव दिसत नाहीं. गोखल्यांनीं माफी मागितली यांत त्यांनीं कांहीं गैरवाजवी केलें असें चरित्रकारांनाही वाटत नाहीं. ते म्हणतातः—

" पुढें हिंदुस्थानांत परत आल्यावर, या विधानांचें समर्थन होत नाहीं असें पाहिल्यावर अर्थात् त्यांना तीं परत घ्यावीं लागलीं व तीं त्यांनीं घेतलीं यांतही चूक नाहीं."

आणि माफी मागण्यांत कांहीं गैरवाजवी नव्हतें असें मत असणाऱ्या लोकांतहि " माफी तर मागावी पण जातां जातां आत्मसमर्थनही करावें " असे वाटणारे लोक होते.पण गोखल्यांच्यासारख्या सरळ स्वभावाच्या माणसास या लोकांचें म त अर्थातच पटण्यासारखें नव्हतें. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे पंचहौद मिशनच्या प्रायश्चित्त प्रकरणीं टिळकांनीं जी दुटप्पी वृत्ति बेधडक स्वीकारली ती स्वीकारण्यासारखा गोखल्यांचा स्वभाव नव्हता. आपल्या निराधार विधानांनीं विशिष्ट वर्गावर खरोखरच अन्याय झाला अशी त्यांची एकदां खात्री पटल्यावर त्या अन्यायाचें समूळ निरसन करण्याची संधि साधण्यांत चुकारपणा दाखविणें किंवा हिकमत लढविणें हें संभावित माणसास व शिष्टाचारास लांछनास्पद आहे, असेंच त्यांचें मत असल्यामुळें माफीची शब्दयोजना करण्यासंबंधांत, ज्यांची बदनामी झाली त्यांच्या बाजूला जरी थोडा ढळता कांटा राहिला तरी कांहीं हरकत नाहीं, पण दुसऱ्याला दुखापत करून पुनः ती भरून देण्याचे कामीं आखडता हात धरणें हें सर्वस्वी निंद्य आहे असेंच गोखल्यांच्या पुण्यशील स्वभावास वाटलें असल्यास त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. ज्यांना ही विचारसरणी पटणार नाहीं त्यांची मनोदृष्टि कोणत्याही गोष्टीची उच्च व उदात्त भूमिका आपल्या कक्षेंत घेण्यास असमर्थ आहे असेंच म्हटलें पाहिजे. मि. रॅटक्लिफ यांनीं लिहिलेलें वेडरबर्नसाहेबांचें चरित्र नुकतेंच प्रसिद्ध झालें आहे; त्यांत त्यांनीं या बाबीसंबंधानें काढलेले उद्गार सर्वांनीं लक्ष्यांत ठेवण्यासारखे आहेत. गोखल्यांच्या माफीसंबंधानें लिहितांना ते म्हणतात:—

" Returning soon afterwrds to India, he published immediately on landing at Bombay a complete apology and retraction to which his *extreme conscientiousness* led him to give a form, that was for many years bitterly resented by large number of his compatriots. "

या माफीप्रकरणामुळें गोखल्यांना, चरित्रकार म्हणतात त्याप्रमाणें, वर्ष दीड वर्ष अज्ञातवासांत काढावा लागला. पण त्याबरोबर हेंही लक्ष्यांत ठेवलें पाहिजे कीं देशहिताबद्दल जळजळित तळमळ व देशहिताचे कामीं आपल्या हातून कांहीं तरी भरीव कामगिरी व्हावी अशी आकांक्षा त्यांचे ठिकाणीं होती, म्हणूनच त्यांना आपला आयुष्यक्रम यानंतर अल्पावर्षांतच सांवरतां येऊन आपलें नांव हिंदुस्थानच्या इतिहासांत अजरामर करतां आलें. पहिल्यापासूनच त्यांना खालीं दडपण्यास टपलेल्या त्यांच्या प्रतिपक्षीयांनीं त्यांच्यावर आलेल्या या संकटाचा गैरफायदा घेऊन जनतेंत त्यांच्याविषयीं अप्रियता उत्पन्न करण्याचा आसुरी प्रयत्न करावा हेंही स्वाभाविकच होतें. पण गोखल्यांच्या बावनकशी देशभक्तीमुळें व असामान्य कर्तृत्वामुळें हा प्रयत्न अखेर सर्वस्वीं निष्फळ झाला. निदान सुबुद्ध व डोळस लोक तरी त्यायोगानें बिलकुल फसले गेले नाहींत.

१८९७ च्या खटल्यांत टिळकांनीं, मित्रांच्या भिडेमुळें कां होईना, स्वतःच्या सुटकेकरितां माफीचा गुळमुळीत मसुदा तयार केला हें मागें सांगितलेंच आहे. यानंतर " मी कांहीं असा गोखल्यांच्या सारखा लेचापेचा नाहीं " असें अमृतबझार पत्रिकेच्या संपादकांस कळवून आपली माफी तर अंधारांत रहावी आणि गोखल्यांच्या माफीचा सर्वत्र डांगोरा पिटून आपल्या स्वतःच्या धैर्याची दूरवर जाहिरात लागावी असा टिळकांनीं व्यूह रचला. लोकांचे गुणावगुण टिळक नेहमीं धारवाडी कांट्यानें मापीत असत. त्याच कांट्यानें त्यांच्या या कृतीचें वजन ठरविल्यास त्यांच्या धैर्याचें पारडें वर हवेंत जाऊन त्यांच्या कुटिल नीतीचें पारडें मात्र धरित्रीचा घट्ट आश्रय धरून राहील! गोखल्यांच्या माफीचा निरनिराळया स्वभावाच्या व प्रवृत्तीच्या लोकांवर काय परिणाम झाला याची मीमांसा चरित्रकारांनीं निरनिराळया स्थळीं ऐसपैस रीतीनें केली आहे. पण त्याच बरोबर टिळकांच्या वरील व्यूहाचा कोठें मागमूसही दिसूं नये अशी त्यांनीं उत्कृष्ट खबरदारी घेतली आहे!

टिळकांच्या चरित्रांत त्यांच्या शिष्यांनाही प्रकाशांत आणण्यास अयोग्य असे अनेक प्रकार सांपडतील. पण गोखल्यांचें सर्व चारित्र उघडाउघड आहे. त्यांनीं जें काय केलें त्याचे हेतू, पद्धति व संसिद्धि यांच्यांत सर्वस्वी सुसंगतता दिसून येते. राजकारणांत ते एकमार्गी, सत्यनिष्ठ व प्रतिपक्षीयांच्याही मनःप्रवृत्तीबद्दल आदर बाळगणारे होते. लोकसंग्रह किंवा सरकारसंग्रह यांच्याबद्दल उदासीनता बाळगून केवळ कार्यसिद्धीवरच त्यांची दृष्टि असे. यामुळेंच अल्पावकाशांत त्यांना विचारवंत व समाजधुरीण यांना सर्वस्वी मंजूर होणारा असा कार्यभाग करतां आला. वडीलधाऱ्या माणसांबद्दल आदरबुद्धि व तरुणांबद्दल कौतुकबुद्धि हे गुण त्यांच्या अंगीं विशेष प्रमाणांत वास करीत होते. टिळकांना त्यांच्याबद्दल कौतुकबुद्धि नव्हती तरी गोखल्यांनीं टिळकांबद्दलची आदरबुद्धि केव्हांही ढळूं दिली नाहीं. गोखल्यांना टिळकांच्या कार्यपद्धतीबद्दल कितीही अनादर वाटत असला तरी तो अनादर व्यक्त करतांना वडील माणसांबद्दल जी आदरबुद्धि असावी लागते तिचा त्यांनीं स्वतःस केव्हांही विसर पडूं दिला नाहीं. त्यांनीं जीं जीं भाषणें केलीं किंवा लेख लिहिले त्यांतील अर्थबोध कोणालाही सुलभ रीतीनें होण्यासारखा आहे. त्यांत संदिग्धपणा बिलकूल नसल्यामुळें त्यांच्या अर्थासंबंधानें किंवा अर्थास आधारभूत असणाऱ्या त्यांच्या राजकीय धोरणासंबंधानें त्यांच्या अनुयायांना हमरीतुमरीवर येण्याचे केव्हांही प्रसंग आले नाहींत. अर्थात् केसरीकारांच्याच भाषेंत बोलावयाचें म्हणजे टिळकांच्या पश्चात् त्यांच्या "राजकारणाचें खोबरें" होऊन त्यांच्या शिष्यांच्या हातीं शेवटीं करवंट्या आल्या आहेत तशी गोखल्यांच्या राजकारणाची स्थिति झाली नाहीं ! इतकेंच नव्हे तर आज गोखल्यांच्याच शिष्टसंमत मार्गानें जाण्यांत देशाचें खरें हित आहे असें टिळकशिष्यांनाही वाटूं लागलें आहे.

"कपट आणि मायावीपणा" या ज्या दोन गुणांचा केसरीकारांनीं आपल्या गुरूंच्या चारित्र्यांत मोठ्या कौतुकानें समावेश केला आहे

ते गुण गोखल्यांच्या चारित्र्यास सर्वस्वी अपरिचित होते. या गुणांच्या आश्रयानें टिळकांनीं गोखल्यांची आजन्म पाठपुरवणी केली. पण आरशावर राख जसजशी अधिक घांसावी तसतसा आरसा स्फटिकाप्रमाणें स्वच्छ होऊन राख घांसणाराचाच हात काळा होतो, त्याप्रमाणेंच टिळकांच्या या कृतींनीं गोखल्यांच्या आयुष्याची उज्वलता अधिकच वृद्धिंगत झाली. इतकेंही असून गोखल्यांच्या अंगीं विलक्षण प्रकारची नम्रता होती. टिळकांच्या अंगीं नम्रतेचा अभाव नसता तर बरोबरीच्या माणसाशीं न पटल्यामुळें आजन्म त्यांचा काळ भांडणें भांडण्यांत खास गेला नसता. त्यांची मान फक्त हार घालून घेण्याच्या वेळींच नम्र होत असे असेंही म्हटलें असतां अतिशयोक्ति होईल असें वाटत नाहीं! स्वतःचा बडेजाव हाच टिळकांच्या स्वभावाला विशेष प्रिय होता. गोखल्यांचें सर्व लक्ष्य कार्याचा बडेजाव करण्याकडेच असे. निःसीम स्वार्थत्यागाच्या तत्त्वाचे आपण खरे पुरस्कर्ते आहोंत असा डांगोरा पिटवून टिळकांनीं त्या तत्त्वाच्या भंगाचें पातक डे. ए. सोसायटींतील आपल्या व्यवसायबंधूंच्या गळयांत अडकविलें आणि स्वतः त्या तत्त्वाचा राजरोस रीतीनें त्याग करण्यास ते कायमचे मोकळे झाले! गोखल्यांनीं या तत्त्वाचा गाजावाजा केव्हांही केला नाहीं. पण याच तत्त्वावर एक नमुनेदार संस्था स्थापन करून हें स्वार्थत्यागाचें तत्त्व खरेंखुरें कोणाच्या अंगांत बाणणें शक्य होतें हें त्यांनीं जगाच्या निदर्शनास कृतिरूपानें आणून दिलें. टिळक आणि गोखले या दोन समकालीन पुरुषांच्या आयुष्यक्रमाचें निरीक्षण करतांना इतिहासास हीच विवेचक दृष्टि ठेवावी लागेल हें निःसंशय आहे.

# लेख बारावा.

## राजकीय कीं सामाजिक ?

टिळकांच्या चरित्रावर विशेष रीतीनें प्रकाश पाडणाऱ्या अशा कित्येक ठळक गोष्टींचें आम्हीं विवेचन केलें. पण त्यांचें सामाजिक सुधारणेसंबंधांतील दुटप्पी धोरण तर या सर्व गोष्टींच्या शिरोभागीं बसविण्यासारखें आहे. सामाजिक सुधारणेस आपण विरोधी आहों, असें टिळकांनीं स्पष्ट म्हटल्याचें एकही उदाहरण कोणास दाखवितां येणार नाहीं; पण सुधारणेचे पुरस्कर्ते जे सुधारक त्यांचा सदासर्वदा उपहास करून सुधारणेच्या कट्ट्या शत्रूसही तिची जितकी हानि करतां येणें शक्य नव्हतें तितकी त्यांनीं केली आहे. त्यासंबंधांत त्यांनीं निरनिराळ्या वेळीं जे कोटिक्रम लढविले ते मोठे विचार करण्यासारखे आहेत. " सुधारणेसाठीं जनसमूहाची व आपली ताडातोड करण्याचा प्रयत्न केल्यास सुधारणा होणें शक्य नाहीं " असें एक मत त्यांनीं सन १८९० सालीं सार्वजनिक सभेच्या हॉलांत प्रतिपादिलें असल्याचें चरित्रकार म्हणतात. यांतील ताडातोड हा शब्द मोठा कनवाळा दाखविणारा आहे आणि तो वापरणारा गृहस्थ जनतेचा खरोखर जिव्हाळ्याचा मित्र आहे असें सकृद्दर्शनीं कोणासही वाटण्याचा संभव आहे आणि टिळकांच्या तोंडून हा शब्द निघाला, त्यावेळेस लोकांची अशी समजूतही झाली असेल; पण वरील विधानांतील हेत्वाभास सिद्ध करणें फारसें कठीण नाहीं. जनतेची कोणत्याही बाबतींत सुधारणा करावयाची म्हटल्यास त्यांत ताडातोडीचा हा प्रकार अपरिहार्यच असतो. फार कशाला, टिळकांनीं प्रतिपादिलेला हा सिद्धांत अबाधित मानल्यास टिळकांना एलएल. बी. होण्याची सुद्धां सोय राहिली नसती ! कारण सर्व जनता अज्ञानांत ठेवून ते एकटे एलएल. बी. झाले यांत

त्यांनीं जनतेशीं आपली ताडातोडच केली कीं नाहीं? त्यांच्याच सिद्धांता-प्रमाण चालावयाचें म्हटल्यास प्रथम सर्व लोकांना प्राथमिक शिक्षण द्यावयाचें, नंतर दुय्यम शिक्षण द्यावयाचें व मग युनिव्हर्सिटया स्थापन करून उच्च शिक्षणास हात घालावयाचा असा क्रम स्वीकारावा लागला असता! परिस्थितीची, बुद्धीची किंवा आनुवंशिक गुणांची ज्याला जशी अनुकूलता असेल त्या मानानें तो समाजास सोडून पुढें जातोच. आणि तेवढ्यापुरती समाजाची आणि त्याची ताटातूट ही होतेच. सामाजिक सुधारणेसही हाच न्याय लागू आहे. सुदैवानें शिक्षण मिळून ज्यांना उच्च प्रकारची संस्कृति लाभली आहे त्यांनीं आपल्या ज्ञानाचा उपयोग समाजाची प्रगति होईल अशा दिशेनें अवश्य केला पाहिजे. असें करण्यांत त्यांस समाजाची कांहीं काळपर्यंत अप्रियताही सोसावी लागेल. पण ती सोसण्यास तयार न होणें म्हणजे वस्तुतः समाजासंबंधानें आपलें एक महत्त्वाचें कर्तव्य करण्यास चुकण्याप्रमाणें आहे. मुलांना हरएक प्रकार योजून योग्य मार्गास लावण्याचा प्रयत्न करणारे आईबाप मुलांना कित्येक वेळां अप्रिय असे वाटतात. पण मुलें मोठीं होऊन त्यांना चांगलेंवाईट कळूं लागल्यानंतर त्यांच्या ठिकाणची ही अप्रियतेची भावना जाऊन आपले आईबाप हे खरोखरच आपले उपकर्ते होत अशी त्यांची खात्री होते. उलटपक्षीं जे आईबाप मुलांचीं मनें दुखावतील या सबबीवर त्यांना चांगली ओळ लावण्याचें टाळतील ते मुलांना तात्पुरते प्रिय झाले तरी पुढें उत्तरवयांत मुलें अशा आईबापांना दोष लावल्या-शिवाय खचित रहाणार नाहींत. आगरकर व टिळक यांच्यासंबंधानें समाजाच्या आजच्या भावना अशाच प्रकारच्या आहेत, यावरून समाजास उपकारक असें धोरण कोणाचें होतें हें स्पष्ट दिसत आहे.

जनतेचें मन दुखावेल, जनसमूहाची व आपली ताडातोड होईल, या बुद्धीनें टिळकांनीं सामाजिक सुधारणेंत मन घातलें नाहीं, येवढेंच त्यांच्या सामाजिक सुधारणेविषयींच्या विशिष्ट प्रवृत्तीचें कारण नाहीं;

तर " सामाजिक सुधारणेपेक्षां राजकीय सुधारणेचें महत्त्व परराज्याखालीं हिंदी लोकांना अधिक आहे; याकरितां सुशिक्षित लोकांनीं राजकीय सुधारणा आधीं हातीं घेतली पाहिजे " असेंहि त्यांचें मत होतें. म्हणजे स्वराज्य असतें तर इतर सर्व गोष्टींच्या पूर्वीं टिळकांना सामाजिक सुधारणेचें महत्त्व पटण्यास कांहीं प्रत्यवाय नव्हता असें समजण्यास कांहीं हरकत नाहीं. यासंबंधांत एक विशेष गोष्ट लक्ष्यांत ठेवणें जरूर आहे ती ही कीं, सामाजिक सुधारणेचा हा जो प्रश्न उपस्थित झाला तो परराज्यामुळेंच होय. किंबहुना स्वराज्यांत असे प्रश्न उपस्थित करणारांना प्रसंगी हत्तीचे पायच पहावे लागले असते ! हिंदुस्थानांत परकीयांचें एकछत्री राज्य स्थापन झालें तें त्यांच्या अंगांतील पराक्रमापेक्षां आपल्या अंगच्या विशिष्ट अवगुणांमुळेंच होय, ही जाणीव रानड्यांच्यासारख्या ज्या दूरदर्शी पुरुषांना झाली त्यांचें लक्ष समाजसुधारणेकडे स्वाभाविकच विशेष तांतडीनें गेलें. टिळकही कांहीं सामान्य बुद्धीचे गृहस्थ नव्हते. त्यांना ही एवढी साधी गोष्ट कशी समजली नाहीं 'असा कोणीही सहज रीतीनें प्रश्न करील आणि त्याचें उत्तर देणें आमच्या मतें फारसें कठिण नाहीं. टिळकांचें लक्ष गेलेल्या स्वराज्याकडे विशेष होतें, रानड्यांचें मिळवावयाच्या स्वराज्याकडे होतें आणि गेलेलें स्वराज्य आणि मिळवावयाचें स्वराज्य हीं दोन्हीं अगदीं भिन्न स्वरूपाचीं आहेत ही जाणीव रानड्यांना जशी होती तशी ती टिळकांना होती असें वाटत नाहीं.

एखाद्या प्रबल व प्रभावशाली अशा माणसानें स्थापलेल्या राज्यावर त्याचेच वारस वंशपरंपरा बसावयाचे व त्यांनीं एकतंत्री राज्यकारभार चालवावयाचा अशा जुन्या थाटाच्या राज्यांत सामाजिक सुधारणेचें तादृश महत्त्व नसतें. राष्ट्रांत दहा पांच शहाणीं माणसें असलीं म्हणजे असलीं राज्यें सहज चालूं शकतात. सामान्य जनसमूहापैकीं कांहींच्या अंगीं शिपाईबाण्याचें कर्तृत्व असलें म्हणजे बस्स होतें. यापलीकडे समाजाचें

कर्तृत्व अशा राज्यांना अवश्यकच असतें असें नाहीं. पण रानड्यांच्या दृष्टिपथांत अशा प्रकारचें स्वराज्य नव्हतें. येथें पुढें कालांतरानें स्थापन व्हावयाचें जें स्वराज्य तें समाजानें चालवावयाचें स्वराज्यच होय अशी त्यांनीं आपल्या मनाशीं खुणगांठ बांधून ठेवली होती. असें स्वराज्य मिळणें आणि मिळाल्यानंतर तें चालविणें या दोन्ही गोष्टी समाजाच्या कर्तृत्वावरच अवलंबून आहेत, व म्हणूनच सामाजिक सुधारणेचें महत्त्व रानड्यांना विशेष वाटत होतें.

"सुशिक्षित लोकांनीं राजकीय सुधारणा आधीं हातीं घेतली पाहिजे" हें विलक्षण मत रानड्यांना पटणें वरील कारणामुळें सर्वथा अशक्य होतें. कारण सामाजिक व राजकीय या सुधारणांच्या दोन स्वतंत्र शाखा नसून त्या एकाच विकासात्मक सुधारणेचें दोन परस्परपूरक असे घटक आहेत असेंच रानड्यांचें मत होतें. ज्या सुधारणा आज सामाजिक वाटतात त्या परिणामाच्या दृष्टीनें राजकीयच असतात हें सहज समजण्यासारखें आहे. स्वराज्य मिळाल्यानंतर मग सामाजिक सुधारणेचें पहातां येईल हें जें टिळकांचें म्हणणें होतें, तें भावी स्वराज्याची स्पष्ट कल्पना नसलेल्या माणसाचें म्हणणें होतें, हें रानड्यांनीं स्पष्टपणें ओळखलें असलें पाहिजे. आपल्याला जें स्वराज्य मिळवावयाचें आहे त्याचें स्वामित्व समाजाकडेच येणार आहे. अर्थात् हें स्वराज्य मिळविणें व टिकविणें हें समाजाच्याच कर्तृत्वावर, संघशक्तीनें काम करण्याच्या मगदुरावर व समूहाचा स्वार्थ तोच आपला स्वार्थ या भावनेच्या विकासावर सर्वस्वीं अवलंबून आहे ही बालंबाल खात्री झाल्यामुळेंच आपल्या बहुविध कार्यांच्या व्यापांत रानड्यांनीं समाजसुधारणेस महत्त्वाचें स्थान दिलें होतें आणि या लोकमतानुवर्ती स्वराज्याची व त्यास साहाय्यक अशा समाजघटनेची कल्पना आपल्याला ज्या लोकांच्या सहवासानें लाभली ते लोक परकीय असले तरी त्यांचा आपला सहवास घडून आला, हा विलक्षण ईश्वरी नेमानेमच समजला पाहिजे, असें रानडे समजत असत. टिळक या समजुतीचा अर्थातच उपहास

करीत असत व याचें कारण भावी स्वराज्यापेक्षां गेलेलें स्वराज्यच त्यांना विशेष ठळक रीतीनें दिसे, हें होय.

वरील युक्तिवाद पाहून पुष्कळांना अचंबा वाटेल. पण टिळकांच्या आयुष्यक्रमाचें जो सूक्ष्म रीतीनें निरीक्षण करील त्यास हा युक्तिवाद ग्राह्य मानल्याशिवाय गत्यंतर राहणार नाहीं. त्यांनीं ज्या ज्या चळवळी केल्या त्यांत संघशक्तीस बिलकुल अवसर नसे. टिळकांनीं बोलावयाचें आणि त्यांच्या भोंवतालच्या परिवारानें मान तुकवावयाची असाच ते आणि त्यांचा परिवार यांच्यामधील कार्यविभाग असे! बरोबरीच्या माणसांशीं गांठ पडण्याचा त्यांच्या आयुष्यांत जेव्हां जेव्हां प्रसंग येई तेव्हां तेव्हां ते हमरीतुमरीवर येऊन त्यांच्यापासून विभक्त व्हावयाचें हें ठरल्यासारखेंच होतें. त्यांच्या समकालीन असा हिंदुस्थानांतील एकही पुढारी सांपडावयाचा नाहीं कीं ज्याचा त्यांनीं केव्हांना केव्हां तरी उपहास करून त्याची लोकांत फजिती उडवून देण्याचा प्रयत्न केला नाहीं. कोणत्याही संस्थेंत आपण स्वत: आहोंत तोंपर्यंतच ते तिचे गोडवे गात. डे. ए. सोसायटींतून राजीनामा देऊन ते निघून गेल्याबरोबर त्या सोसायटीच्या संस्था हमालखाने बनल्या; कायदे कौन्सिलचीं द्वारें त्यांना बंद झाल्याबरोबर कायदेकौन्सिलें डिबेटिंगक्लब झालीं व कॉंग्रेसमधून त्यांची उचलबांगडी झाल्याबरोबर तिला मजलसीचें स्वरूप प्राप्त झालें! रानडे-गोखल्यांसारखे हिंदू व काय, पण दादाभाई, मेथा वाच्छांसारखे पारशी पुढारीही त्यांच्या शिव्याशापाच्या सपाट्यांत केव्हांना केव्हां तरी सांपडल्याशिवाय राहिले नाहींत. वस्तुत: मेथांच्यासारख्या पारशी गृहस्थांना हिंदुस्थान देशाचें भांडण भांडण्याचें कांहीं कारण नव्हतें. "आपली जात फार लहान आहे. हिंदुस्थानास स्वराज्याचे हक्क मिळाले तरी आपण अल्पसंख्याक असल्यामुळें आपलों कोठें पत्ताही लागणार नाहीं, आजच्या स्वरूपाचें ब्युरॉक्रसीचें राज्य असण्यांतच आपल्या ज्ञातीची सुरक्षितता आहे" असा त्यांनीं पोक्त

विचार केला असता तर तोही क्षम्य ठरला असता. पण त्यांनीं आपली अशी आकुंचित दृष्टि केव्हांही ठेवली नाहीं. सर्व राष्ट्राचें हित तेंच आपलें हित, अशी सर्वस्वी प्रशंसनीय दृष्टि ठेवून त्यांनीं राष्ट्रास आपल्या उज्ज्वल आयुष्यक्रमानें उपकृत करून ठेविलें. अर्थात् इतर पुढाऱ्यांपेक्षांही या पुढाऱ्यांची किंमत एका दृष्टीनें अधिक आहे आणि टिळकांना लोक-मतानुवर्ती स्वराज्याची खरीखुरी आवड व स्पष्ट कल्पना असती, तर अशा पुढाऱ्यांच्यावरही स्वार्थलोलुपता, भ्याडपणा वगैरे क्षुद्र वृत्तींचा आरोप करण्याचें धाडस त्यांनीं केव्हांही केलें नसतें.

संघशक्तीनें चालणारें स्वराज्य त्यांच्या मनश्चक्षूच्या टप्प्यांत आलें असतें, तर अशा स्वराज्याचें योग्य शिक्षण देणाऱ्या सामुदायिक संस्था निर्माण करण्याकडे त्यांच्या कल्पकतेचा व निग्रही स्वभावाचा खचित उपयोग झाला असता. तो तसा झाला नाहींच, पण उलट व्यवस्थित चाललेल्या संस्थांत 'बीचमे मेरा चांदभाई' हा न्याय लावून त्रिस्कळितपणा आणण्यांतच त्यांनीं आपली लोकोत्तर बुद्धि कामास लावली! 'टिळक' हा शब्द उच्चारल्याबरोबरच त्यांची अहं[illegible] मध्यभागीं बसलेली व भोंवतालीं 'होयबा'जींचा परिवार हात जोडून उभा राहिलेला असा एखाद्या संस्थानिकाचा देखावा दृष्टीपुढें उभा राहतो. जुन्या काळांत स्वतंत्र राज्य स्थापण्यास जे गुण अवश्य असत ते सर्व टिळकांच्या अंगीं होते असें जें एका मोठ्या माणसानें त्यांचें एका प्रसंगीं वर्णन दिलें आहे तें त्यांच्या आयुष्यक्रमास उत्कृष्ट रीतीनें लागू पडतें.

## लेख तेरावा.

### ध्येयाचा अनिश्चितपणा.

सामाजिक व राजकीय "या दोन्ही सुधारणांच्या बाबतींत श्रमविभाग झाला तर तो अधिक इष्ट होय असें टिळकांचें मत पूर्वींपासून होतें" असें चरित्रकार एके ठिकाणीं म्हणतात. टिळकांचें हें मत कोणत्याही प्रकारें गैर नव्हतें आणि या मताप्रमाणें त्यांनीं आपलें आचरण राखलें असतें तरी त्यांनीं मोठा कार्यभाग केला असेंही समजतां आलें असतें; पण टिळकांनीं समाजसुधारणेस कधीं आडून तर कधीं उघड विरोध करून सुधारणेच्या मार्गांत कांटे पसरण्याचा उद्योग अव्याहत रीतीनें केला. टिळकांना राजकीय चळवळीकरितां लोकसंग्रह पाहिजे होता म्हणून त्यांनीं हें धोरण स्वीकारलें असें त्यांच्या कांहीं भक्तांचें म्हणणें आहे. समाजाला अप्रिय अशी सामाजिक सुधारणा पुढें ढकलून, समाजाचा रोष निष्कारण आपल्यावर ओढून घेणें म्हणजे राजकीय चळवळीचा जंम बिघडविण्यासारखें आहे, असाच विचार करून टिळकांनीं सामाजिक सुधारणेची उपेक्षा केली असें हे भक्त म्हणतात. हेंही त्यांचें म्हणणें, टिळकांना भावी स्वराज्याची स्पष्ट कल्पना नव्हती, किंबहुना ती होण्यासारखी त्यांच्या मनाची ठेवणच नव्हती हें आमचें अनुमान बरोबर ठरविणारेंच आहे. स्वराज्य पाहिजे आणि सामाजिक सुधारणा नको असें म्हणणाऱ्या लोकांच्या मताची मीमांसा अन्य तऱ्हेनें लागणें शक्य आहे असें आम्हांस वाटत नाहीं.

पूर्वींच्या स्वराज्यांत राज्यकर्ता कोणीही येवो, तो आपला ईश्वरप्रेषित प्रभू आहे या भावनेनें त्याचे हुकूम बिनतक्रार रीतीनें मानणें, किंबहुना त्याचेकडून कोणत्याही प्रकारची जुलुमजबरदस्ती झाली तरी ती

अस्मानी आपत्ति म्हणून निमुटपणें सहन करणें येवढेंच समाजाचें काम होतें. पण नव्या स्वराज्यांतील थाट यापेक्षां अगदीं वेगळा आहे. या स्वराज्यांत समाजाकडे हुकूम करण्याचें काम येणार आहे. राजपुरुष किंवा अधिकारी लोक हे समाजाचे धनी नसून सेवक आहेत हीच कल्पना या स्वराज्यास आधारभूत आहे. हें स्वराज्य ज्याच्या दृष्टिपथांत आलें तो समाजांतील कृत्रिम भेदाभेद व अन्यायमूलक नियंत्रणा मोडून समाजाची कार्यक्षमता किंवा कर्तृत्वशक्ति वाढविणाऱ्या समाजसुधारणेस सर्व चळवळीच्या अग्रस्थानीं बसवील हें उघड आहे. न्याय व नीति आणि व्यवहार व उपयुक्तता या सर्व दृष्टींनीं समाजांत योग्य सुधारणा करून त्याच्या अंगीं निकोपपणा आणल्याशिवाय इतर कोणत्याही प्रकारच्या चळवळी केल्या तरी त्यांस खरी यशस्विता येणें कठीण आहे, हें ओळखूनच रानड्यांच्यासारख्यांनीं समाजसुधारणेच्या कार्याकडे विशेष लक्ष्य पुरविलें.

समाजसुधारणा हें स्वराज्यसंपादनाचें त्याचप्रमाणें स्वराज्यरक्षणाचें उत्कृष्ट साधन आहे ही दृष्टि पटून टिळकांनीं, कांहींनीं सामाजिक चळवळींत पुढाकार घ्यावा व कांहींनीं आपल्यास राजकीय चळवळीला वाहून घ्यावें हें श्रमविभागाचें तत्त्व आचरणांत आणलें असतें तर त्या विरुद्ध आक्षेप घेण्यास कदाचित् जागा राहिली नसती. पण तोंडानें श्रमविभागाचें हें तत्त्व प्रतिपादन करून त्यांनीं कृति मात्र सुधारकांचा श्रमविघात व्हावा अशी केली.

काँग्रेसच्या पहिल्या दहा वर्षांत कधींही उत्पन्न न झालेला व त्यानंतरच्या काळांत म्हणजे अगदीं आज तारखेपर्यंत पुनः केव्हांही उपस्थित न झालेला असा "सामाजिक परिषद् काँग्रेसच्या मंडपांत भरावी किंवा नाहीं" हा वाद उकरून काढून फक्त एका सालापुरतेंच काँग्रेसच्या मंडपांतून सामाजिक परिषदेचें उच्चाटण करण्याचे कामीं जिवाचें रान करून टिळकांनीं समाजसुधारणेसंबंधाचें आपलें हाडवैर कसें निद-

शीनास आणलें हें सर्वांना माहितच आहे. इंग्रज लोक स्वातंत्र्यप्रिय आहेत तर त्यांनीं लोकांना पारतंत्र्यांत ठेवण्याचा हव्यास कां धरावा असा राजकीय व्यवहारांत आपण सवाल टाकतों. हीच विचारसरणी स्वीकारून तुम्हांला स्वातंत्र्य पाहिजे तर तें सामाजिक व्यवहारांत तुम्हीं आपल्या बंधुभगिनींना कां देत नाहीं ? असा उलट सवाल आपल्याला टाकला तर निरुत्तर होण्याचा प्रसंग येऊं नये, याच व्यापक दृष्टीनें रानड्यांसारख्यांनीं समाजांतील कृत्रिम भेदाभेद व कृत्रिम नियंत्रणा नाहींशा होऊन सर्वांच्या कर्तृत्वशक्तीचा राष्ट्रोन्नतीच्या कामीं योग्य उपयोग व्हावा यासाठीं सामाजिक सुधारणेची चळवळ व उदार मताचा सांप्रदाय सुरू केला. या सांप्रदायाची व्याख्या डेक्कन सभेच्या प्रसिद्धिपत्रकांत त्यांनीं उत्कृष्ट रीतीनें केली आहे. या पत्रकांत ते म्हणतातः—

The spirit of Liberalism implies a freedom from race and creed prejudices and a steady devotion to all that seeks to do justice between man & man, giving to the rulers the loyalty that is due to the law they are bound to administer but securing at the same time to the ruled the equality which is their right under the law.

जात, धर्म, पंथ वगैरेंमुळें उत्पन्न होणारे पूर्वग्रह टाकून देणें, लोकांमध्यें समतेची भावना उत्पन्न करणें, कायद्याबद्दल आदर बाळगणें व जनतेच्या सदनशीर समान हक्काबद्दल झगडणें हीं तत्त्वें वरील उताऱ्यांत गोंविलीं आहेत. यावरून रानड्यांचें राजकारण किती व्यापक होतें हें दिसून येईल. सामाजिक सुधारणेनें जनतेची आपली ताडातोड होईल अशी टिळकांना भीति वाटत होती. पण जातिभेद व कृत्रिम नियंत्रणा यांनीं निरनिराळ्या वर्गांची केलेली ताडातोड नाहींशी करून ज्याला त्याला आपल्या मगदुराप्रमाणें आपली वाढ करून घेण्यास पूर्ण अवसर ठेवणें हेंच रानड्यांच्या कार्याचें सर्वस्व होतें आणि स्वराज्याचे हक्क मिळविण्यास व ते टिकविण्यास अशा प्रकारची पूर्व तयारी केल्याशिवाय

गत्यंतर नाहीं हेंही ते पूर्णपणें जाणून होते. त्यांनीं ज्या निरनिराळ्या चळवळी केल्या व संस्था चालविल्या त्यांस वरील तत्त्वेंच आधारभूत असत. संस्था चालविण्याचे कामीं त्यांचा दुहेरी हेतु असे. एक संस्थांच्या हातून लोकहिताचें काम व्हावें व दुसरा त्या त्या चालविणारांस संघशक्तीनें काम करण्याचें शिक्षण मिळावें. संस्थेचें काम नेहमींच यशस्वी न झालें तरी त्या कार्याच्या योगानें लोकांत जी कार्यप्रवर्तक जागृति होते तिचेंच महत्त्व रानडे हे विशेष मानीत. या मुद्यासंबंधानें याच पत्रकांत ते म्हणतातः—

" After all, political activities are chiefly of value not for the particular results achieved, but for the process of political education, which is secured by exciting interest in public matters and promoting the self respect and self reliance of citizenship. "

सामाजिक, राजकीय, धार्मिक, औद्योगिक, आर्थिक वगैरे कोणत्याही प्रकारची चळवळ झाली तरी उत्कृष्ट नागरिक निर्माण करणें हाच तिचा अंतिम हेतु असला पाहिजे, हेंच रानड्यांचें धोरण होतें आणि म्हणूनच आधीं कोणती चळवळ करावयाची आणि मग कोणती चळवळ करावयाची या शुष्क वादाची बाधा त्यांना केव्हांही झाली नाहीं. राष्ट्राची सर्वांगसुंदर उन्नति करावयाच्या कामीं या सर्व चळवळी परस्परपोषकच आहेत अशी त्यांची ठाम समजूत होती आणि या आपल्या उद्देशांच्या सिध्द्यर्थ त्यांनीं शहाण्या व व्यवहारचतुर अशा माणसांचाच संग्रह केला. या माणसांच्या प्रयत्नांनींच उदार संप्रदायाचीं तत्त्वें क्रमाक्रमानें समाजाच्या अगदीं खालच्या थरापर्यंत झिरपत झिरपत जातील असा त्यांना पूर्ण भरंवसा होता. रानड्यांनीं नुसत्या सद्यःस्थितीचेंच नव्हे तर भविष्यस्थितीचेंही आकलन केलें होतें. अगदीं नवीन उपस्थित झालेल्या ब्राह्मणब्राह्मणेतर वादासही त्यांची भविष्यदर्शी दृष्टि चुकवितां

आली नाहीं येवढें सांगितलें म्हणजे रानड्यांचा अधिकार केवढा मोठा होता हें कोणाच्याही सहज लक्ष्यांत येईल.

टिळकांचा थाट याहून अगदीं वेगळा होता. सामाजिक सुधारणेच्या महत्त्वाचें आकलन त्यांना न होण्याचें कारण त्यांच्या राजकारणाचें ध्येय सामाजिक स्वराज्य हें नव्हतें. सामाजिक सुधारणेची नालस्ती करणें हाच त्यांच्या राजकीय चळवळीचा एक प्रमुख भाग होऊन बसला होता, तो यामुळेंच होय. राजकीय बाबतींत आपली विशिष्ट पद्धतीनें प्रगति होईल अशी टिळकांना केव्हांही निश्चित कल्पना नव्हती. सनदशीर चळवळीनेंच आपलें पाऊल पुढें पडणें शक्य आहे ही जी रानडे-गोखल्यांना श्रद्धा वाटत होती तिचा टिळकांच्या ठिकाणीं पूर्ण अभाव होता. रानडे-गोखल्यांना आपलें उद्दिष्ट स्पष्ट दिसत होतें म्हणूनच त्यांच्या हातून उत्क्रांतीच्या मार्गानें मनःपूर्वक प्रयत्न झाले. या बाबतींतील टिळकांच्या मनाची चलबिचल अगदीं अखेरपर्यंत कायम होती. टिळकांनीं सनदशीर चळवळ पत्करली ती अनिर्वाहपक्षींच पत्करली. राजकारणांत त्यांनीं हरएक बाबीसंबंधांत उलट सुलट मतांचें खंडणमंडण वेळ येईल तसें केलें, हाही त्यांच्या या अनिश्चित वृत्तीचाच परिणाम होय. रानड्यांच्या लोकसंग्रहांत बुद्धि, तारतम्य व दूरदर्शित्व या गुणांचा भरणा दिसतो. याचें कारण त्यांच्या चळवळीचा मार्ग राजमार्ग होता, त्यांच्या काम करण्याच्या पद्धति शिष्टसंमत होत्या हें होय. टिळकांचा लोकसंग्रह आंधळ्यांच्या माळेप्रमाणें एकमेकांमागें जाणारा होता. आंधळ्यांच्या माळेचा म्होरक्या नाहींसा झाल्याबरोबर त्या माळेची दाणादाण होते तशीच आज टिळकांच्या अनुयायांची स्थिति झाली आहे. राजकारणांतील टिळकांचीं मतें काय होतीं याबद्दल त्यांच्या शिष्यांतच आज जी मारामारी जुंपून राहिली आहे ती जर कांहीं दाखवीत असेल तर हेंच कीं, टिळक हे आपल्या हयातींत कोणत्याच मतास नेकीनें चिकटून राहिले नाहींत.

रानड्यांच्या सांप्रदायाची अशी वाताहत झालेली नाहीं, कारण त्यांनीं त्यास निश्चित परंपरा घालून दिली व ती शास्त्रशुद्ध व व्यवहारशुद्ध

पायावर घालून दिली. त्यांची परंपरा आज तीन पिढ्या अव्याहत चालली आहे. आजचा राजकीय विकास हा रानड्यांनीं केलेल्या बीजारोपणाचेंच फळ होय. आपसांतील कलहानेंच देशावर पारतंत्र्य ओढवलें ही दृष्टि ठेवून रानड्यांनीं सर्व वर्गांचा सलोखा घडून येईल अशीच आपल्या कार्याची दिशा राखली. उलट पक्षीं ज्यामुळें देशाचें स्वातंत्र्य गमावलें गेलें त्या कलहाशिवाय टिळकांनीं आपल्या आयुष्यांत दुसरें कांहींच केलें नाहीं! टिळकांचें सर्व राजकारण परकीय राजकर्त्यांबद्दल असंतोष पसरविण्यांतच सांठविलें होतें. 'असंतोषः श्रियो मूलम्' हें तत्त्व रानड्यांनाही अमान्य नव्हतें. पण त्यांचा असंतोष कार्यप्रवर्तक असे, टिळकांचा असंतोष निराशेची उत्पत्ति करणारा होता. परिस्थितींत कोणत्याही प्रकारें बिघाड झाला तर त्याची जबाबदारी आपल्यावर किती आहे अशा अंतर्मुख दृष्टीनें रानडे प्रत्येक बाबतीचा विचार करीत असत. टिळक कोणत्याही बिघाडाची किंवा वेबनावाची जबाबदारी परकीय राजकर्त्यांवर टाकून मोकळे होत असत. त्यांचा हा कित्ता गिरविण्याची त्यांच्या अनुयायांची कितीही इच्छा असली तरी आजच्या परिस्थितींत तसें करणें त्यांना योग्य व शक्यही नाहीं. कारण आज सुधारणांच्या योगानें आपली कर्तृत्वशक्ति दाखविण्याची आपणांस उत्तम संधि प्राप्त झाली आहे. या संधीचें योग्य व वक्तशीर चीज होणें हें अर्थातच आपल्या स्वाभिमानावर व स्वावलंबनावर अवलंबून आहे. अनिष्ट गोष्ट घडली कीं, तिचें खापर सरकारच्या माथीं फोडून मोकळे होण्याचे दिवस आतां अर्थातच राहिले नाहींत. आपल्या सामाजिक, औद्योगिक वगैरे सर्व चळवळी स्वराज्य पदरांत पडेतोंपर्यंत थांबवून धरल्या पाहिजेत या मताचें वैयर्थ्य व अनिष्टता बिनतोड रीतीनें सिद्ध होण्यासारखी आज परिस्थिति उत्पन्न झाली आहे. आजच्या कौन्सिलांतून सामाजिक कायदे व इतर कित्येक सामाजिक बाबी, यांसंबंधानें जो निर्णय होत आहे त्यावरून सामाजिक व राजकीय प्रश्नांची वस्तुतः फोडच करतां येत

नाहीं, ते एकाच देहाचे दोन घटक आहेत ही वस्तुस्थिति आतां चांगली निदर्शनास येत आहे.

सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीचे सभासद, सेवासदन, सोशल सर्व्हिस लीग, सहकारी मंडळ्या, अस्पृश्यतानिवारणाची चळवळ, हिंदु-मुसलमानांची एकी, प्राथमिक शिक्षणाचा प्रसार, असलीं कामें करण्यांत वेळ कां घालवितात, ते राजकीय चळवळ कां करीत नाहींत ? असा कित्येक टिळकानुयायांचा प्रश्न असे. पण आजच्या परिस्थितींत या प्रश्नांना निराळें उत्तर देण्याचें कारणच रहात नाहीं. मिळालेल्या हक्कांचा विलंब न लागतां विकास होणें हें सर्वस्वीं मतदारांच्या लायकीवर अवलंबून आहे आणि मतदारांना आपल्या हक्कांची व जबाबदारीची योग्य जाणीव होण्यास वरील कार्येंच सर्वस्वी उपकारक ठरतात हें त्यांच्या उपहासकांनाही आज नाकबूल करण्याची सोय राहिली नाहीं. इतकेंच नव्हे तर अशा कार्यांची आपण यापूर्वीं हेटाळणी केली याबद्दल त्यांना कदाचित् पश्चात्तापही होत असल्याचें त्यांच्यांतील सच्चा लोकांच्या उद्गारांवरून स्पष्ट होत आहे. आज कोणी कितीही गप्पा मारल्या तरी ज्याला म्हणून व्यवहाराला धरून वागावयाचें आहे त्याला रानडे, गोखल्यांनीं चोखाळून ठेवलेल्या मार्गानेंच विनतक्रार गेलें पाहिजे हें उघड आहे. टिळकांनीं ज्या मार्गाचा उपहास करून लोकमान्यता मिळविली तोच मार्ग आज श्रेयस्कर व हितपरिणामी ठरत आहे. महात्मा गांधी यांचा विधायक कार्यक्रम हा त्यांचे गुरु गोखले यांच्या शिकवणीचाच हा परिणाम होय ही गोष्ट टिळकभक्तांना कितीही अप्रिय वाटली तरी ती सत्य आहे.

# लेख चौदावा.

## उपसंहार.

टिळकांच्या चरित्रासंबंधीं आतांपर्यंत आम्हीं जें संक्षिप्त विवेचन केलें तें इतिहासदृष्टीनें म्हणजे सत्यान्वेषणदृष्टीनें केलें, हें वाचकांच्या लक्षांत आलें असेलच. या निरीक्षणांतील निरनिराळीं विधानें वाचून, टिळकांचे कित्येक भक्त रागावलेही असतील. पण इतिहास हा कोणाच्या रागालोभाची प्रतिष्ठा बाळगीत नाहीं. तो त्या त्या काळांतील परिस्थितीची न्यायनिष्ठुरतेनें छाननी करून अखेर सत्य तें बाहेर काढतोच. इतिहास हा भावी पिढ्यांस योग्य मार्ग दाखविणारा प्रज्वलित दीप होय, असें जें त्यास महत्त्व देण्यांत आलें आहे, तें यामुळेंच होय. टिळक या व्यक्तीशीं आमचा कोणत्याही प्रकारचा द्वेष किंवा वैर नाहीं व तसें असण्याचें कारणही नाहीं. टिळकांची बुद्धिमत्ता, त्यांची धडाडी, त्यांचा शोधकपणा, त्यांची विलक्षण चिकाटी व उद्यमशीलता या गुणांबद्दल त्यांच्या भक्तांप्रमाणेंच आम्हांलाही त्यांचेबद्दल अत्यंत आदर वाटतो. टिळक हे जर कोणी सामान्य मनुष्य असते, तर त्यांची उठाठेव करण्याचें आम्हांस कारणच पडलें नसतें. इतिहास त्यांची गणना पुढारी पुरुषांतच करील हें निःसंशय आहे. टिळक हें नांव उच्चारतांच आजच्या पिढीपुढें एक विशिष्ट व्यक्ति उभी राहिली तरी इतिहासांत विशिष्ट विचारसरणीचे व विवक्षित दृष्टीचे अध्वर्यू म्हणूनच त्यांचा विचार केला जाईल आणि आम्ही त्यांच्या चरित्राचें निरीक्षण केलें तें याच भावनेनें होय. आम्हीं आपल्या लेखांत स्वीकारलेली निरीक्षणदृष्टि कित्येकांना कदाचित् सर्वस्वी नापसंत वाटेल, पण टिळकांच्या चरित्राचें सांगोपांग विवेचन करावयाचें म्हटल्यास या दृष्टीकडे कानाडोळा करून चालणार नाहीं, हेंही लक्षांत ठेवलें पाहिजे. चरित्र म्हणजे स्तोत्रपाठ नव्हे, ही जी चरित्रकारांनीं आपला ग्रंथ तयार करतांना दृष्टि राखली आहे, तिचा

टिळकांच्या इतर भक्तांनीं अवलंब केल्यास हे लेखही त्यांना मस्तक शांत राखून वाचतां येणें शक्य आहे.

टिळकांच्यासंबंधानें आम्हीं केलेलीं विधानें कोणास कितीही अप्रिय वाटलीं, तरी त्यांचें सप्रमाण खंडण करणें शक्य आहे काय, याचा त्यांनीं अवश्य विचार केला पाहिजे. टिळकांचें चरित्र अनेक दृष्टींनीं चमत्कृतिपर असलें तरी त्यांच्या हातून लोकोपकारक अशी विधायक कामगिरी केव्हांही झाली नाहीं, असें आम्हीच म्हणतों असें नाहीं तर त्यांच्या भक्तांनाही तें कबूल करावें लागत आहे. परवां त्यांच्या पुण्यतिथीच्या दिवशीं कलम-बहाद्दरांनीं त्यांचें वाङ्मयश्राद्ध करून त्यांच्याबद्दलची आपली भक्ति प्रगट केली; पण त्यांपैकीं एकालाही टिळकांनीं विधायक कामगिरी कोणती केली हें दाखवितां आलें नाहीं. या कामीं खुद्द चरित्रकारांचीही कशी तारांबळ उडून गेली आहे हें त्यांचें पुस्तक काळजीपूर्वक वाचणारांच्या तेव्हांच लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं. टिळकांनीं नानाप्रकारचे वाद खेळून, “ वादमतंगज ” ही पदवी प्राप्त करून घेतली. पण, या सर्व धामधुमींत त्यांची एखादी भरीव कामगिरी आपणांस दाखवितां यावी अशी चरित्रकारांची उत्कट इच्छा असतांही, अखेर त्यांना निराशेनें हात टेकण्याचीच पाळी आली. शेवटीं १८९६–९७ सालच्या दुष्काळांत टिळकांनीं जी चळवळ केली, तिच्यासंबंधांत चरित्रकारांना एक विधायक कामगिरी सांपडली व ती त्यावेळीं “ पुणें शहरांत टिळकांनीं स्वस्त धान्याचीं दुकानें मांडविलीं ” ही होय! दुष्काळांत तात्पुरतीं स्वस्त धान्याचीं दुकानें मांडविण्यांतच टिळकांच्या कर्तृत्वाचें कौतुक गाण्याचा चरित्रकारांवर प्रसंग यावा, यावरून विधायक कामगिरीच्या दृष्टीनें टिळकांचा आयुष्यक्रम किती निराशाजनक होता हें उत्कृष्ट रीतीनें सिद्ध होतें. आज राष्ट्रांतील सर्व चळवळींचा भर विधायक कामगिरीवर आहे, यावरून रानडे पक्षाचें धोरण हेंच कसें राष्ट्रहिताचें होतें हें स्पष्ट दिसत आहे. टिळकांच्या हातून अशी कामगिरी न होण्याचें कारण अर्थातच टिळकांची

कलहप्रियता हेंच होय. बरोबरीच्या माणसांशीं त्यांचें केव्हांही जमलें नाहीं, यामुळें आपल्या खांद्याला लागणारीं माणसेंच संग्रहीं ठेवून त्यांच्यांत कालक्रमणा करणें त्यांना भाग पडलें व टिळकांच्या पश्चात् त्यांच्या पक्षाचा आज जो पोरवडा झालेला दिसतो, तोही वरील विधानांचाच उत्कृष्ट पुरावा होय.

त्यांच्या चरित्रांतील आणखी लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हटली म्हणजे एखाद्या तत्त्वास किंवा धोरणास फार दिवस चिकटून राहणें त्यांना कधींही मानवत नसे. याचें कारण केव्हां कोणतीही चळवळ निघो, त्यांत सर्वांच्यापुढें आपण असलें पाहिजे ही त्यांची महत्त्वाकांक्षा होय. यामुळें, त्यांच्या आयुष्यक्रमाची अशी कांहीं बहार उडून गेली कीं, सार्वजनिक बाबींसंबंधांत त्यांनीं प्रसंगानुसार त्याच त्याच मताचा निरनिराळ्या वेळीं पुरस्कार व निषेधही केलेला आढळेल! आज त्यांच्या अनुयायांत तात्त्विक स्वरूपाचे असे तीव्र मतभेद सुरू झाले आहेत व त्या सर्वांना टिळकांच्या तोंडचींच वचनें प्रमाण म्हणून दाखवितां येतात! सर्व मतांना व सांप्रदायांना पुरून 'दशांगुळें' उरले, असें जरी कोणीं टिळकांचें वर्णन केलें तरी तें शोभण्यासारखें आहे! त्यांच्या वाङ्मय-श्राद्धाच्या दिवशीं त्यांच्याबद्दल निरनिराळ्या लेखकांनीं जे लेख लिहिले आहेत, त्यांचा एकमेकांशीं मेळ लावण्याचा कोणीं खटाटोप केल्यास तो सर्वस्वीं निष्फळ ठरेल! निरनिराळ्या लेखकांनीं टिळकांच्या अंगचे वर्णन केलेले गुण एकत्र केले तर टिळक हीं इतके परस्परभिन्न गुण धारण करणारी व्यक्ति खरोखरीच झाली असेल कीं नाहीं, असाही भावी पिढ्यांना संशय येईल! त्यांच्या भक्तांनीं लिहिलेल्या लेखांतून कोणी त्यांच्या सत्यनिष्ठेचें वैभव गाइलें असेल, तर कोणी त्यांच्या मायावीपणाचें कौतुक केलेलें सांपडेल! कोणी त्यांच्या शांत व गंभीर वृत्तीची प्रशंसा केलेली आढळेल, तर कोणी त्यांच्या तापटपणाचें स्तोत्र गाइलेलें दृष्टोत्पत्तीस येईल! तत्त्व, धोरण किंवा कार्याची दिशा यासंबंधांत जेथें

मुळांतच निश्चितपणा नव्हता, तेथें शेवटीं चरित्रकथनाच्या कामीं भक्तांची अशी तारांबळ उडून जावी, यांत आश्चर्य नाहीं.

टिळक हे आपल्या वर्तनांतील विसंगतीची केव्हांही परवा बाळगीत नसत, याचें कारण सत्यासत्यतेसंबंधाच्या त्यांच्या कल्पना त्यांच्या लोकोत्तर बुद्धीप्रमाणेंच लोकोत्तर असत! एखाद्या मनुष्यापाशीं ते जर कांहीं बोलले, तर तेवढ्यावरून त्यांची त्या बोलण्यासंबंधानें शाश्वती धरण्याची सोय नसे. अमुक गोष्ट आपण माझ्याजवळ बोललां असें जर त्या मनुष्यानें त्यांना सांगितलें तर ते त्याला तावड-तोब म्हणत कीं, "बाबा, हें तुझें म्हणणें कोर्टांत टिकणार नाहीं!" त्यांच्याशीं बोलावयाचें म्हणजे दोन साक्षीदार ठेवूनच बोललें पाहिजे होते. एखाद्या ठिकाणीं ते बोलत असतां आपण पूर्वी याच्याविरुद्ध बोललां होतां, असें जर त्यांना कोणी सांगूं लागला तर "मी असें बावळया-सारखें सरळ विधान केव्हांही केलें नसेल; त्यांत कांहीं तरी मख्खी ही असलीच पाहिजे" असें ते मोठ्या आढ्यतेनें उत्तर देत! कौटिल्य किंवा हिकमत लढविण्यांत आपल्या कुशाग्र बुद्धीचा उपयोग करणें हें त्यांना व्यसनच लागल्यासारखें झालें होतें.

एकदां त्यांना कांहीं कायद्याच्या मुद्यासंबंधानें प्रमाणभूत असे लॉ रिपोर्टरांतील आधार पाहिजे होते. हें काम त्यांनीं चरित्रकारांसारख्या आपल्या एका शिष्याकडे दिलें. हा शिष्य सात्त्विक, सरळ व पापभीरु असल्यामुळें "आपण म्हणतां या मुद्याला लॉ रिपोर्टांत प्रमाणभूत अशा केसीस सांपडत नाहींत." ही खरी गोष्ट त्यानें टिळकांना सांगितली. त्याबरोबर त्याच्यावर संतापून टिळकांनीं तीं सर्व पुस्तकें त्याच्या हातून आपल्या हातीं घेतलीं व तीं उघडून त्यांनीं त्यांच्यावर तावडतोब तांबड्यानिळ्या पेन्सिलीनें अनेक ठिकाणीं आडव्यातिडव्या खुणा केल्या. हें पहातांच समोर बसलेला शिष्य अर्थातच विस्मयचकित झाला व तो म्हणाला "बळवंतराव, तुम्हीं खुणा केलेल्या

केसीसच्या या मुद्याशीं कांहींही संबंध दिसत नाहीं. " सरळमार्गी शिष्याचें हें बोलणें ऐकून बळवंतराव त्याला आवेशानें म्हणाले कीं, " या केसीसचा आपल्या मुद्यांशीं कांहीं संबंध नाहीं हें तुम्हीं कशाला म्हणतां ! उलट बाजूच्या वकीलाला म्हणूं द्या ! आपण काढलेल्या केसीस लागू आहेत किंवा गैरलागू आहेत हें पहाण्यास त्याला बराच वेळ मोडावा लागेल. त्याचा इतका वेळ निष्कारण मोडला तर त्यांत आपलाच फायदा नाहीं का ?" शिष्य बिचारा पुढें काय बोलणार ? अर्थात्, तो स्वस्थ बसला !

प्रतिपक्षाला जेरीस आणण्याच्या कामीं कोणत्या युक्त्या प्रयुक्त्या योजाव्यात याचा टिळकांना मुळींच विधिनिषेध नसे. राजकारण हा तर येथून तेथून 'लबाडीचा बाजार' असेंच त्यांचें ठाम मत असे. शठाशीं शाठ्यच केलें पाहिजे, या त्यांच्या नीतीचा प्रसव याच मतांतून झाला. शठ कोण, हें स्वतः टिळकच ठरविणार आणि टिळक साधारणतः सज्जन माणूस मुळींच दिसत नसे ! अशी वस्तुस्थिति असल्यामुळें त्यांचें चरित्र येथून तेथून शाठ्यनीतिप्रचुरच व्हावें, यांत आश्चर्य तें काय ?

टिळकांचे अवगुण त्यांच्याबरोबर जाऊन त्याचा निग्रह, त्यांचें श्रम-सातत्य, धडाडी वगैरे त्यांचे गुणच त्यांच्या अनुयायांनीं उचलले असते तर टिळकांचें अवतारकृत्य तितक्या प्रमाणांत फलद्रूप झालें असें मानतां आलें असतें. पण कोणत्याही पुढारी म्हणविणाऱ्या माणसास विभूतींचें महत्त्व प्राप्त झालें म्हणजे त्याच्या गुणाबरोबरच त्याच्या अवगुणांचेंही कौतुक होऊं लागतें. किंबहुना हे अवगुणही त्यांच्या अंधभक्तांस गुणा-प्रमाणेंच वाटूं लागतात. टिळकांच्या अनुयायांची आज अशीच स्थिति झालेली आहे. टिळक कुटिल नीतीचे पुरस्कर्ते होते; त्यांच्या आत्मप्रतिष्ठ स्वभावामुळें शहाण्या व स्वयंप्रकाश गृहस्थांचा सहकार त्यांना केव्हांही मानवला नाहीं; त्यांचें सर्व आयुष्य विध्वंसक कामगिरींतच गेलें; या सर्व गोष्टी त्यांच्या भक्तांनाही मान्य आहेत. पण त्यांनीं केलें तें सर्वच चांगलें आणि त्यांच्या विरोधी पक्षांत त्यांच्या बरोबरीचीं सर्व माणसें असलीं तरी

तीं सर्व चुकलीं होतीं आणि एकटे टिळकच काय ते बिनचूक होते असली विलक्षण भावना त्यांच्या मनांत उत्पन्न झाली ! आज एक मत स्वीकारणें, उद्यां दुसऱ्याचाच आश्रय करणें, परवां तिसरेंच कांहीं तरी कुलंगडें काढून या दोन्ही मतांना मूठमाती देणें आणि वेळ आली म्हणजे आम्ही हेंच म्हणत होतों किंवा आम्हीं असें कधींच म्हटलें नाहीं असेंही म्हणण्याची तयारी ठेवणें असा टिळकांचा बहुरंगी कारभार होता. नजरबंदीचा चमत्कार या दृष्टीनें हा कारभार कदाचित् कौतुकास्पद ठरला तरी तो शिष्टसंमत व्यवहाराच्या व कार्यसिद्धीच्या दृष्टीनें सर्वस्त्री त्याज्य आहे, ही गोष्ट भक्तीनें आंधळया झालेल्या टिळकानुयायांच्या लक्षांत केव्हांही आली नाहीं, व आतांही फारच थोड्यांच्या ध्यानांत येत आहे.

टिळकांच्या चरित्रांत जनमनावर अचूक छाप बसविणारी जर कोणती गोष्ट हमखास रीतीनें सहाय्यभूत झाली असेल तर ती त्यांचा कारागृहवास हीच होय. कारागृहांत जाण्यांत त्यांनीं दाखविलेलें धैर्य व तेथें सोसावे लागलेले क्लेश यांनींच त्यांच्या आयुष्यांतील विधायक कामगिरीची उणीव पुष्कळ अंशांनीं भरून काढली. टिळक हें नांव उच्चारलें कीं त्यांच्या विशिष्ट कामगिरीपेक्षां त्यांचा कारागृहवासच लोकांच्या दृष्टीपुढें विशेष प्रामुख्यानें उभा रहातो. हा त्यांचा कारागृहवासही परोपजीवी होता. कारागृहवासाची तोहमत त्यांनीं स्वतःच्या कृतीनें गळयांत घेतली नसून ती लोकांच्या कृति निस्तरण्याच्या प्रयत्नांतच त्यांच्या गळयांत पडली. ती टाळण्याकरितां न्यायासनापुढें ज्या मामूल खटपटी कराव्या लागतात त्याही त्यांनीं केल्या. त्या करण्याचे कामीं त्यांनीं दाखविलेली हिंमत व धैर्य हीं निःसंशय वाखाणण्यासारखीं आहेत ! कारागृहवास पत्करल्याबद्दल व त्यांतील क्लेश सहन केल्याबद्दल त्यांची कोणी तारीफ केली तर त्यांत गैरवाजवी असें कांहीं नाहीं. पण एक कारागृहवास भोगला कीं तो मनुष्य सर्वगुणसंपन्न झाला अशी जी जनतेची समजूत होते तीच चुकीची असते. अनुयायांच्या या चुकीमुळेंच टिळकांच्या आयुष्यक्रमांतील विसंगतीस व

घरसोडीस उत्तेजन मिळालें. आपण लिहितां ही गोष्ट खरी नाहीं असें टिळकांना कोणीं सांगितलें तर ते त्यास ताडकन उत्तर देत कीं, "खऱ्या-खोट्याचें रडगाणें तुम्ही खुशाल गात बसा. आम्ही लिहूं तेंच हजारों लोक खरें मानतील. याच्या विरुद्ध तुम्हांला लिहावयाचें असेल तर खुशाल लिहा; पाहूं तुमचें कोण खरें मानतें तें!" श्रद्धाळु रोग्यावर एखाद्या रासवट डॉक्टरानें हव्या त्या औषधाचे प्रयोग करून पहावेत त्याप्रमाणेंच अनुयायांच्या अंधभक्तीचा फायदा घेऊन टिळकांनीं खऱ्या-खोट्याची पर्वा न करतां, हव्या त्या गोष्टी त्यांच्या गळीं उतरविण्याचा प्रयत्न केला, आणि जगांत अखेर शाठ्यनीतीचाच जय होतो अशी त्यांची विपरीत व माणुसकीस सर्वस्वी कमीपणा आणणारी समजूत करून दिली! टिळकांच्या लोकोत्तर आयुष्यक्रमाचें खरें रहस्य त्यांच्या अनुयायांना कळून त्यांची दृष्टि संशोधक व्हावी, निदान टिळकांच्या चरित्राची एक दुसरी बाजू आहे येवढी तरी गोष्ट त्यांच्या लक्ष्यांत यावी येवढ्याचकरितां आम्हीं ही लेखमाला लिहिली. हा आमचा उद्देश अंशतः सफल झाला तरी आमच्या श्रमाचें चीज झालें असें आम्ही समजूं. शेवटीं टिळकांच्या चरित्राचा पूर्वार्ध लिहून आम्हांस हे लेख लिहिण्याची संधि आणून दिल्याबद्दल आमचे मित्र रा. न. चिं. केळकर व लेखमाला प्रसिद्ध होत असतांना कित्येक मित्रांनीं मुद्दाम पत्रें पाठवून तिजबद्दल गुणग्रहणपर उद्गार काढून आमची वेडीवांकडी सेवा गोड करून घेतली याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार मानून आम्ही वाचकांची रजा घेतों.

# परिशिष्ट १.

# आगरकरांच्या माफीचा इतिहास.

## लेख पहिला.

( लेखकः—सीताराम गणेश देवधर. )

" ता. १४ नोव्हेंबर १८९२ च्या सुधारकांत टिळकांवर अशी टीका आली कीं टिळक हे वडवाघुळासारखे आहेत. त्यांना धर्माभिमानी आपल्यांत घेत नाहींत व ते एका अर्थानें खरोखर सुधारक असतां सुधारकांच्या पंक्तींत उघडपणें जाऊन बसण्याला कचरतात. XXXX पण वरील टीका करतांना आगरकरांनीं मध्येंच एक वाक्य असें घुसडून दिलें होतें कीं, 'धर्माभिमानी म्हणविणारे टिळक ख्रिस्त्याच्या हातचा चहा घेतात एवढेंच नव्हें, तर स्टेशनावरील मुसलमान किंवा पोर्तुगीज मेसमनच्या हातचा भात खाण्यासही ते मागें घेत नाहींत.' या आरोपाला ता. २२ च्या केसरींत टिळकांनीं स्पष्ट नकारार्थी उत्तर दिलें, तरी आगरकरांचा आग्रह सुटेना. ऐकीव गोष्टींवर सर्वस्वीं अवलंबून राहून, कोणास बेअब्रूकारक अशीं विधानें वर्तमानपत्रांत प्रसिद्ध करूं नयेत, कारण प्रसंग आल्यास मोठीं माणसें-सुद्धां पुढें येऊन पुरावा देण्यास कचरतात किंवा पुरावा खोटा ठरतो, या गोष्टीची अक्कल आगरकरांना पूर्वीं घडली होती, व आपल्या व्यवसायबंधूंना त्यांनीं आढ्यतेनें उपदेशही केला होता. पण पक्षांधतेमुळें या वेळीं स्वतः आगरकरांनाच या उपदेशाचा विसर पडला. ज्यांच्या आधारावर आगरकरांनीं वरील विधान केलें, त्यांनीं खरें खोटें करण्याची वेळ आली तेव्हां आगरकरांना दगा दिला तरीही ते आपलें विधान परत घेईनात × × × अखेर ता. ४ डिसेंबरच्या सुधारकांत आगरकरांनीं टिळ-

कांची माफी मागितली. बेअब्रूच्या खटल्यांत (?) माफी मागण्याचा आगरकरांवर हा दुसरा प्रसंग. पहिल्या प्रसंगीं माफी मागूनही त्यांना शिक्षा भोगावी लागली, या खेपेस माफी मागितल्यानें ती वांचली इतकाच फरक."

वरील अवतरण रा. न. चिं. केळकरकृत टिळकचरित्रांतून घेतलेलें आहे. यांत, स्वतः मोठ्या आढ्यतेनें इतरांस शिकविलेलें शहाणपण स्वतः आगरकरच पक्षांधतेमुळें विसरून गेले, व ज्यांच्या आधारावर त्यांनीं हें साहस केलें त्यांनीं ऐन प्रसंगीं दगा दिल्यामुळें फिरून शिक्षा भोगण्याचा दुर्धर प्रसंग टाळण्यासाठीं माफी मागण्याचा अपमानही सोसण्यास ते राजी झाले, वगैरे ज्या गोष्टी चरित्रकारांनीं प्रतिपादल्या आहेत त्यांपैकीं एकही कशी खरी नाहीं, हें मी त्या वेळीं सुधारकाच्या संपादकांपैकीं एक असल्यामुळें मला इत्थंभूत माहीत आहे. म्हणून या माफी-प्रकरणाची साद्यंत हकीकत जनतेपुढें मांडून वरील लेखामुळें आगरकरांच्या धवल कीर्तीवर उडणारा शिंतोडा पुसून टाकणें हें आपलें पवित्र कर्तव्य जाणून पुढील लेख लिहिला आहे. तो वाचून, या माफीनें आगरकरांच्या चारित्र्यास किंचितही कमीपणा न येतां ती उलट त्यांच्या उदार मनःप्रवृत्तीचीच कशी द्योतक आहे, हें जनतेला स्पष्ट दिसून येईल. इतकेंच नाहीं तर केवळ २५-३० वर्षांपूर्वीं घडलेल्या गोष्टीच्या रा. केळकरांसारख्या योग्यतेच्या माणसाकडून केल्या जाणाऱ्या वर्णनांत जर 'इति ह आस' हें सांगतांना इतकी कादंबरी म्हणजे निवळ कल्पनेचें साम्राज्य असलेलें पहावयास सांपडतें, तर प्राचीन काळीं घडलेल्या गोष्टींच्या हकीकतींत इतिहास आणि कादंबरी यांची किती तरी भेसळ झाली असली पाहिजे याची अटकळ करतां येऊन, त्या हकीकतीपासून आपण काढतों तीं अनुमानें कधीं कधीं वस्तुस्थितीशीं सर्वथा विसंगत कशीं असूं शकतात हेंही कळून येण्यासारखें आहे. असो, सदर माफी प्रकरणाच्या हकीकतीस सुरुवात करण्यापूर्वीं येथें हें स्पष्ट सांगून टाकणें मला इष्ट

वाटतें कीं, वरील अवतरणांत चरित्रकाराकडून जो वस्तुविपर्यास झाला असल्याचें मीं वर निर्दिष्ट केलें आहे, तो वस्तुविपर्यास त्यांनीं जाणून बुजून आगरकरांची अवहेलना करण्याच्या हेतूनें केला आहे, असें भासविण्याचा माझा यत्किंचितही इरादा नाहीं. रा. केळकर व टिळक यांचें साहचर्य १८९५–९६ नंतरचें आहे व हें माफी प्रकरण १८९२ अखेरचें आहे. तेव्हां त्यासंबंधाची अथपासून इतिपर्यंतची सर्व हकीकत त्यांना माहीत असण्याचा संभव कमी. त्यांची सारी भिस्त सुधारक व केसरी यांमधून प्रसिद्ध झालेल्या मजकुरावरच असल्याचें दिसून येतें, व नुसत्या त्या मजकुरावरून त्यांनीं जीं अनुमानें काढलीं आहेत तशीं अनुमानें काढण्याचा मोह त्यांना आंवरतां आला नाहीं, यांत फारसें आश्चर्य वाटण्याचेंही कारण नाहीं. सदर चरित्राच्या ८ व्या भागाच्या शेवटीं अवघ्या आठ ओळींतच आगरकरांच्या अनुकरणीय चरित्राचें संकलित दिग्दर्शन करून "'स्वार्थो यस्य परार्थ एव स पुमान् एकः सतामग्रणीः' या वचनाप्रमाणें आगरकरांची गणना महाराष्ट्रांतील मोठ्या मनुष्यांतच केली पाहिजे यांत शंका नाहीं." असे त्यांच्या अल्पकालीन चरित्रास पूर्णपणें साजेसे प्रशंसापर उद्गार ज्यांनीं काढलें तेच रा. केळकर जाणून बुजून आगरकरांची अवहेलना करण्यास प्रवृत्त झाले अशी मला क्षणभरही कल्पना करवत नाहीं. असें आहे तरी या लेखाच्या शिरोभागीं त्यांच्या ज्या लेखांतील उतारा दिला आहे तो लेख अजाणतेपणानें कां होईना, पण आगरकरांच्या शीलास कमीपणा आणणारा असल्यामुळें त्यांत सत्याचा कसा विपर्यास झाला आहे हें दाखविण्यास आतां मी आरंभ करतों.

## मीं या प्रकरणांत कां व कशी मध्यस्ती केली ?

हें मला प्रथम सांगितलें पाहिजे. ता. १४ नोव्हेंबरच्या सुधारकाच्या अंकांत टिळकांविरुद्ध मजकूर प्रसिद्ध झाल्याचें वर सांगितलेंच आहे.

त्याच्या पुढच्या म्हणजे २१ नोव्हेंबरच्या अंकाचीं प्रुफें तपासून मजकुराची मांडणी करण्याकरितां ता. २० रविवारीं रात्रीं छापखान्यांत जाऊन पहातों तों इतर प्रुफांबरोबर "मी मेस्मनच्या हातचा भात खाल्ल्याचें सुधारकांतील विधान खोटें आहे, करतां तें परत तरी घ्यावें अथवा त्याच्या समर्थनार्थ तुमच्याजवळ असलेला पुरावा तरी प्रसिद्ध करावा, नाहीं तर तुमच्यावर बदनामी केल्याबद्दल कोर्टांत फिर्याद करणें भाग पडेल" अशा अर्थाचें टिळकांचें धमकीवजा पत्र व त्याच्याच खालीं "आम्हीं केलेलें विधान आम्हीं परत घेत नाहीं व तें ज्या पुराव्याच्या आधारावर केलें आहे तो पुरावाही आम्ही प्रसिद्ध करीत नाहीं. तुम्हांस काय करणें असेल तें तुम्हीं खुशाल करावें" अशा अर्थाचें जशास तसें या न्यायानें आगरकरांच्या नेहमींच्या पद्धतीस अनुसरून त्या धमकीला साजेसें दिलेलें संपादकीय उत्तर याचेंही प्रूफ माझ्या नजरेस पडलें. टिळकांनीं आपलें पत्र परस्पर आगरकरांकडे पाठविलें असून त्यांनीं तें आपल्या संपादकीय उत्तराबरोबर परस्पर छापखान्यांत पाठविलें असल्यामुळें रात्रीं १० वाजेतों मला त्याची वार्ताही नव्हती. सदर उत्तर प्रत्युत्तराचें प्रूफ वाचल्याबरोबर होतां होईतों हीं दोन्ही प्रसिद्ध न होतील तर बरें, असें माझ्या मनानें घेतलें. ज्या दोघां देशभक्तांना निःस्वार्थबुद्धीनें लोकहितार्थ झगडत असतां १०१ दिवस कारागृहवास भोगावा लागला, त्या दोघांनीं वादी प्रतिवादी होऊन कोर्टांत भांडणें भांडावीं व लोकांनीं हा देखावा पाहण्याची पाळी येई-पर्यंत मजल जावी, ही गोष्ट मला कशीशीच वाटली व साधल्यास ती टाळतां आली तर पहावी असें मनांत योजून रात्रीच्या अकरा वाजतां मी कॉलेजांत जाऊन आगरकरांची गांठ घेतली व त्यांना आपला मनोदय कळविला व 'टिळकांनीं सुधारकास पाठविलेलें पत्रच त्यांनीं परत घ्यावें, अशाबद्दल मी प्रयत्न करून पाहतों व त्याचा निकाल लागेपर्यंत तरी तें पत्र व त्याला द्यावयाचें संपादकीय उत्तर हीं छापण्याचें तहकूब करण्या-

बद्दल त्यांनीं आपली संमति द्यावी अशी मीं त्यांना विनंति केली त्यावर आगरकर शांतपणें मला म्हणाले कीं, "तुम्ही या प्रश्नाकडे विकारवशतेच्या आकुंचित दृष्टीनें न पाहतां व्यापक अशा दृष्टीनें पहाल तर या गोष्टींचा तुम्ही करतां तसा नसता बाऊ करण्याचें मुळींच प्रयोजन नाहीं असें तुम्हांस दिसून येईल. अहो ! आगरकर काय अथवा टिळक काय, हे दोघेही क्षुद्रपदार्थ होत. हा तंटा वास्तविक दोन व्यक्तींत आहे अशी तुम्ही आपली समजूत करून घेतां हीच आधीं तुमची चूक. खरें पहातां सुधारणाभिमुख व सुधारणाविमुख अशा दोन पक्षांमधला हा तंटा. सुधारणेचा गाडा पुढें ढकलतांना, त्याच्या मार्गांत माझ्या टिळकांमधलि भांडणासारखे तुम्हांला अनिष्ट वाटतात असे खांचखळगे हे यावयाचेच. ते टाळूं म्हणून कसें चालणार!" यावर मीं उत्तर केलें कीं, 'तुमचें म्हणणें मला पटत नाहीं असें नाहीं. असल्या अनिष्ट गोष्टी अगदीं अपरिहार्यच असतील तर गोष्ट वेगळी; परंतु त्या टाळतां येण्याचा संभव असेल, तर प्रयत्न करून पहाणें गैर आहे असें मला वाटत नाहीं. प्रयत्न फसलाच तर खांचखळग्यांतूनही सुधारणेचा गाडा पुढें ढकलण्यास माझी थोडीच ना आहे ?' यावर आगरकर म्हणाले, " आपल्याला यश येईल अशी तुमची समजूत दिसते. तिला मी तरी मोडा कशाला घालूं ? मात्र या तुमच्या सद्धेतुप्रेरित प्रयत्नाचा परिणाम, आम्हीं सुधारकास पाठविलेलें पत्र मधल्यामधेंच दाबून टाकल्याचा नसता टपका सुधारकावर न येवो म्हणजे मिळविली !" असो, प्रयत्न करून तडजोड झाल्यास पहावें, हा माझा विचार जरी आगरकरांना सर्वस्वी पटला नाहीं हें मी जाणून होतों. तथापि पडत्या फळाची आज्ञा या न्यायानें त्यांच्या अर्धवट संमतीचा फायदा घेऊन ता. २१ नोव्हेंबरच्या सुधारकाचा अंक सदर उत्तर प्रत्युत्तराचा मजकूर न घालतां मीं छापून काढला. परंतु याचें पर्यवसान आजचें मरण उद्यांवर ढकलण्यांत शेवटीं कसें झालें, हें पुढील हकीकतीवरून दिसून येईल.

दुसरे दिवशीं म्हणजे सोमवार ता. २१ नोव्हेंबर रोजीं सकाळीं उठल्याबरोबर मीं टिळकांची गांठ घेऊन त्यांना म्हणालों कीं, 'तुमचें पत्र व त्याला

सुधारकाचें उत्तरें हीं दोनही यापूर्वींच कंपोज झालीं आहेत. परंतु तीं सुधारकांत प्रसिद्ध न होतां या प्रकरणाचा कांहीं तडजोडीनें निकाल लागल्यास पहावें या हेतूनें तीं मीं तशींच ठेवलीं आहेत व तुम्हांस आपलें पत्र परत घेतां येईल तर पहा, अशी विनंति करण्याकरितां मी आलों आहें.' यावर टिळक म्हणाले 'अहो तुमच्या सुधारकांतलें माझ्यासंबंधाचें विधानच मुळीं खोटें आहे.' त्यांना मध्येंच थांबवून मी म्हणालों, 'सुधारकांतील मजकुराच्या खरेखोटेपणाबद्दल शहानिशा करण्याकरितां मी तुमच्याकडे आलों नाहीं. सुधारकाचा एक संपादक या नात्यानें त्यांत प्रसिद्ध झालेला मजकूर पूर्ण विचारपूर्वक प्रसिद्ध केला आहे, असेंच माझें मत असणार व या बाबतींतही तें तसेंच आहे व त्यासंबंधाची जबाबदारी आगरकरांबरोबर आपल्याही शिरावर घेण्याला मी अगदीं तयार आहें. मी तुमच्याकडे आलों तो सुधारकाचा एक संपादक या नात्यानें आलों नाहीं. १० वर्षांपूर्वीं वास्तविक तुमचा कांहींही दोष नसतां तुमच्यावर व आगरकरांवर जो प्रसंग गुदरला होता, तो अजून ज्यांच्या स्मरणांतून गेलेला नाहीं व ज्यांच्या मनांत तुम्हां उभयतांबद्दल सारखीच आदरबुद्धि वसत आहे म्हणूनच ज्यांना तुम्हीं दोघांनीं वादीप्रतिवादी बनून कोर्टांत आपला तंटा मांडावा हें कसेंसेंच वाटतें, अशांपैकीं एक या नात्यानें मी तुमच्याकडे आलों आहें.' यावर टिळक म्हणाले, 'माझें पत्र वगैरे कांहीं न छापतां मजबद्दल सुधारकांत आलेलें विधान परत घेतलें जाईल असें कांहीं झालें तर पहा.' मी म्हणालों, 'माझ्यापेक्षांही तुम्ही आगरकरांना अधिक चांगलें जाणतां. तेव्हां सदर विधान परत घेण्यास त्यांनीं कबूल होणें हें केवळ अशक्य कोटींतलें आहे हें मीं तुम्हांस वेगळें सांगितलें पाहिजे असें नाहीं. शेवटीं टिळकांनीं असें सुचविलें कीं, सदर विधान खरें नाहीं असें आम्हीं केसरींत प्रसिद्ध करतों, पण सुधारकांत मात्र फिरून त्याच्या उलट मजकूर येतां उपयोगी नाहीं. मी म्हणालों, 'कबूल, त्याची हमी मी घेतों.' याप्रमाणें तडजोड ठरून

दुसरे दिवशींच्या म्हणजे ता. २२ नोव्हेंबरच्या केसरींत 'टिळकांनीं स्पष्ट नकारार्थी उत्तर दिल्याचें' या लेखाच्या आरंभीं दिलेल्या उताऱ्यांत आलेंच आहे. पण आपण मनांत योजिलें तसें झाल्याबद्दलचा माझा आनंद शेवटीं आगरकरांनीं आधींच केलेल्या भाकिताप्रमाणें अल्पजीवीच ठरला, व मंगळवारीं म्हणजे ता. २२ रोजीं दुपारींच मला टिळकांनीं बोलावून सांगितलें कीं, "तुमच्या माझ्यांत झालेली तडजोड आमच्या मंडळींना पसंत नाहीं. सुधारकांत केलें गेलेलें विधान खरें नसल्याचा उल्लेख सुधारकांतच आला पाहिजे, असें त्यांचें म्हणणें आहे." मी म्हणालों, ठीक आहे! माझ्याकडून झाली ती खटपट मीं केली, एवढ्यांतच आतां मला समाधान मानून घेणें भाग आहे. सुधारकांतलें विधान परत घेतलें जाईल हें अशक्य आहे हें मीं आधींच तुम्हाला सांगितलें आहे. तेव्हां तुमचें पत्र व त्याला सुधारकाचें उत्तर हें पुढच्या सुधारकांत प्रसिद्ध करण्यावांचून गत्यंतर नाहीं हें ठरलेंच. माझी आतां शेवटची विनंति इतकीच कीं, तुमच्या पत्रावरची तारीख मागच्या आठवड्यांतली आहे ती चालू आठवड्यांतील घालण्यास मला परवानगी द्या, म्हणजे झालें. ही माझी विनंति त्यांनीं मान्य केली व पुढच्या म्हणजे ता. २८ नोव्हेंबरच्या सुधारकांत मीं एक आठवडाभर थांबवून धरलेलें टिळकांचें पत्र व त्याला दिलेलें संपादकीय उत्तर हीं प्रसिद्ध झालीं. येथवर आगरकरांच्या माफीच्या इतिहासाचा पूर्वार्ध झाला. उत्तरार्ध पुढील लेखांत येईल.

## लेख २ रा.

मीं या प्रकरणांत कां व कशी मध्यस्ती केली व ज्या गोष्टी उघडपणें करण्यास टिळक साहजिकच लाजले असते, परंतु त्यांचे कांहीं कांहीं डाव साधण्यास ज्या गोष्टी केल्यावांचून त्यांना गत्यंतरच नसे, अशा गोष्टी बिनदिक्कत करण्यास क्षणभरही मागेंपुढें न पहाणारा असा जो भक्तांचा तांडा नेहमीं त्यांच्या भोंवतीं असे व टिळकांनीं अनेक प्रसंगीं जरी प्रशंसनीय असें धैर्य निःसंशय दाखविलें आहे, तरी ज्या भक्त-गणाच्या इच्छेविरुद्ध जाण्याचें धैर्य त्यांना न झाल्यामुळें आपल्या मनो-देवतेच्या सांगीविरुद्ध जाण्याचे त्यांच्या पुढील आयुष्यक्रमांत त्यांच्यावर अनेकवार प्रसंग आलेले आहेत, त्या मंडळीनें मोडता घातल्यामुळें टिळ-कांनीं सुचविलेली तडजोड शेवटीं व्यर्थ कशी ठरली, हें मागील लेखांत सांगितलें, आतां मी या प्रकरणाच्या राहिलेल्या इतिहासाकडे वळतों.

ता. २८ नोव्हेंबरचा सुधारकाचा अंक इतरांप्रमाणें रानड्यांकडेही गेला. त्यांतील टिळकांचें पत्र व त्याला सुधारकाचें उत्तर हीं वाचतांच हें मेस्मनच्या हातच्या भाताचें प्रकरण भलत्याच थराला जाऊं पहात आहे हें त्यांना लागलींच दिसून आलें. परंतु तसें होणें हें त्यांना इष्ट नव्हतें. मलाही तें इष्ट नव्हतें, हें मागें सांगितलेंच आहे. परंतु तें इष्ट न वाटण्याचें त्यांचें व माझें कारण मात्र अगदीं वेगळें होतें. त्यांचें कारण थोड्याशा विस्तारानें दिलें असतां या माफी प्रकरणांत

### रानड्यांनीं मध्यस्ती कां केली ?

हें कळून येऊन शिवाय त्यायोगानें, त्यांनीं त्याच सुमारास घेतलेल्या प्रायश्चित्तावरही थोडासा प्रकाश पडेल. रानड्यांनीं प्रायश्चित्त घेतलें तें पंचहौदमिशनमध्यें चहा घेतलेल्या बेचाळिसांविरुद्ध जें ग्रामण्याचें काहूर

उठलें होतें त्याच प्रसंगानें या ग्रामण्याची जी विस्तृत हकीकत रा. केळ-कर यांनीं आपल्या टिळकचरित्राच्या १३ व्या भागांत दिली आहे, त्यांत गोविंदराव कानिटकर, राघोपंत नगरकर वगैरे रानड्यांच्या स्नेह्यांच्या आग्रहास्तव व विशेषतः त्यांची नड दूर करण्याकरितां रानड्यांनीं प्राय-श्चित्त घेतलें असें लिहिलें आहे. हें अंशतः खरें असेल, पण त्याचें खरें कारण याहून पुष्कळ खोल आहे. समाजसुधारणेचे जेवढे म्हणून मार्ग आहेत त्या सर्वांचा प्रसंग पाहून उपयोग करून घेण्यास रानडे नेहमीं तयार असत ही गोष्ट सर्वश्रुतच आहे. कायद्याच्या मदतीनेंच ज्या गोष्टी व्हावयाच्या त्या गोष्टींत कायद्याची मदत मागण्यास ते जसें मागें घेत नसत, तसेंच स्वावलंबनाच्या तत्त्वावर सुधारणा करूं पहाणारांनाही त्यांचा पाठिंबा असे. जातगंगेच्या मदतीनें होण्यासारख्या कामांत जातगंगेची मदत घेण्यास जशी त्यांची ना नव्हती, त्याप्रमाणेंच श्रीशंकराचार्यांकडून सुधारणेच्या गाड्याला चालन मिळण्याची संधि आली असतां तीही ते दवडीत नसत. पुण्यांतील ग्रामण्याचा निकाल लावण्यासाठीं श्रींनीं व्यंकट-शास्त्री व बिंदुमाधवशास्त्री असे जे दोन शास्त्री पुण्यास पाठविले होते त्यांच्याशीं सामाजिक सुधारणेच्या बाबतींत श्रीशंकराचार्यांकडून थोडें कां होईना पण साह्य मिळावें याबद्दल त्यांची खटपट चालली होती. लोकमताला विशेष न दुखवितां जें कांहीं करतां येईल तें करण्याला सदर शास्त्रीद्वयानें आपली अनुकूलता दर्शविली होती. पण त्यांचें म्हणणें असें पडलें कीं, तुमच्या म्हणण्याला श्रींकडून मान मिळण्यास तुम्हीही श्रींना मानतां असें दिसलें पाहिजे आणि हें दिसावयास श्रींकडून आप-णांस सर्वप्रायश्चित्त मिळावें अशी तुमच्याकडून श्रींना जाहीर विनंति झाली पाहिजे. वर टिळकचरित्राच्या ज्या १३ व्या भागाचा निर्देश केला आहे, त्यांत " आठ जणांनीं ज्ञाताज्ञातदोषनिवारणार्थ प्रायश्चित्त मिळण्याबद्दल अर्जच दिला होता, सबब त्यांना सर्व प्रायश्चित्त देण्याचा हुकूम झाला " ( पृष्ठ २९४ ) असें जें म्हटलें आहे त्या अर्जाचें बीज,

संदर शास्त्रीद्वयाच्या वरील सूचनेंतच कसें गोंवलें आहे हें दिसून येईल; मला या गोष्टी इतक्या तपशीलवार कळण्याचें कारण इतकेंच कीं, सदर ८ अर्जदारांत मीही एक होतों! सदर अर्ज घेऊन जेव्हां राघोपंत नगरकर मजकडे आले व 'यावर सही करा' असें मला म्हणूं लागले, तेव्हां मी थोडा चकित झालों आणि थट्टेनें त्यांना म्हटलें, 'माझ्या सर्वप्रायश्चित्ताबद्दलच्या इतक्या आतुरतेची बातमी तुम्हांला दिली तरी कोणीं?' तेव्हां ते म्हणाले, 'अहो तुम्हाला प्रायश्चित्ताची जरूरी नाहीं व तुम्हीं तें घेणारही नाहीं हें मला माहीत आहे. परंतु अशा अशा कारणाकरितां (येथें त्यांनीं मला वरील सर्व हकीकत सांगितली) सदर अर्जावर रानड्यांना सही कर्तव्य आहे, व त्यांची एकट्यांचीच सही घालण्यापेक्षां रूपुस्ताला आणखी चारदोन सह्या असलेल्या बऱ्या आणि या अर्जाच्या बुडाशीं असलेला समाजसुधारणेचा हेतु ध्यानांत घेऊन तुम्ही सही द्याल अशा भरंवशानें मी तुम्हांकडे आलों आहें.' असो, वर ज्या खटपटीचा उल्लेख केला आहे त्या खटपटींत टिळकांसारख्या माणसाची आपल्याला मदत मिळेल तर ती रानड्यांना पाहिजेच होती व गोपाळराव जोश्यांच्या अजब युक्तीनें टिळक चहाग्रामण्यांत गोंवले गेल्यामुळें त्यांच्याकडून ती मिळण्याचा पुष्कळ संभव होता. खरें पाहिलें तर टिळकांसारखा धूर्त मनुष्य हा या प्रकरणांत सांपडावयाचाच नाहीं. पण शेरास सवाशेर भेटावा तसें होऊन गोपाळराव जोशांनीं त्यांना चकविलें खरें! यासंबंधानें चरित्रकार रा. केळकर यांनींही प्रांजळपणें वरच्या सारखेच उद्गार काढले आहेत व ते येथें उतरून घेणें अस्थानीं होईलसें वाटत नाहीं. ते लिहितातः—"गोपाळरावांच्या कटाचा यत्किंचित् मागमूस लागता तर स्वतः टिळक पंचहौदमिशनमध्यें गेले नसते. पण टिळकांचीही सावधगिरी या चहाच्या पेल्यांत न बुडती तर ग्रामण्याला असा रंग कसा चढला असता! टिळक न जाऊन नुसते रानडे-प्रभृति सुधारक गेले असते, तर रानड्यांची मजा त्यांनीं अधिक मोकळ्या

मनानें पाहिली असती. पण ते स्वतः या चहाच्या पुरांत सांपडल्यामुळें ×××सुधारणेच्या वादांत निखालस शत्रूप्रमाणें हमरीतुमरीनें भांडणारे टिळक व रानडे हे समायिक प्रतिवादी होऊन ज्यांच्या करणीमुळें एका दावणीस बसले, त्या गोपाळराव जोशांची तारीफ करावी तितकी थोडीच होणार आहे. " गोपाळराव जोश्यांनीं टिळकांना या चहा-प्रकरणांत चकविलें नसतें तर त्यांनीं वरील उताऱ्यांत म्हटल्याप्रमाणें रानड्यांची मजा अधिक मोकळेपणानें पाहिली असती, इतकेंच नव्हे तर " नातुपक्षानें जर टिळकांना प्रथमच किंचित् सवलत देऊन सहानु-भूतीनें वागवलें असतें, तर ( या चहाप्रकरणांत सांपडूनही ) सुधारकांशीं भांडण्याला वकील म्हणून नातुपक्षाला टिळक लाभले असते " असा त्यावेळची माहिती असलेल्या एका गृहस्थाचा अभिप्राय असल्याचाही उल्लेख याच प्रकरणांत फिरून पुढेंही एके ठिकाणीं चरित्रकारांनीं केला आहे. असो. अशा प्रकारें अचानक रीतीनें श्रीच्या दरबारीं सुधारक-पक्षाच्या वतीनें बोलणें चालणें करण्यास टिळकांसारखा वकील मिळ-ण्याची आयती आलेली संधि न घालवितां साधल्यास तिचा उपयोग करून घ्यावा, असें रानड्यांना वाटणें अगदीं स्वाभाविक होतें. टिळकांनीं आपण ख्रिस्त्याच्या हातचा चहा घेतल्याचें कबूल केलें, परंतु तसें करण्याला शास्त्राची मुभा आहे असें ते प्रतिपादित होते. बिस्किटें खाण्याची ते तरफदारी करीत नव्हते. कारण आपण तीं खाल्लींच नाहींत असें त्यांचें म्हणणें होतें. अशा स्थितींत ख्रिस्ती अगर मुसलमान मेस्मनच्या हातचा भात त्यांनीं खाल्ल्याचें सुधारकांत प्रसिद्ध झालेलें विधान जसें टिळकांना तसेंच रानडे यांनीं मनांत योजलेल्या धोरणासही बाधक होतें; व ता. २८ नोव्हेंबरच्या सुधारकांत प्रसिद्ध झालेलें उत्तर प्रत्युत्तर म्हणजे तर खुंटा हलवून बळकट करण्यासारखेंच होतें ! तें वाचतांच रानडे गोखल्यांकडे जाऊन त्यांना म्हणाले, ' तुम्हीं हें काय आरंभिलें आहे ? आम्ही योजीत आहों एक आणि होत आहे भलतेंच. ' गोखले म्हणाले,

सदर शास्त्रीद्वयाच्या वरील सूचनेंतच कसें गोंवलें आहे हें दिसून येईल; मला या गोष्टी इतक्या तपशीलवार कळण्याचें कारण इतकेंच कीं, सदर ८ अर्जदारांत मीही एक होतों! सदर अर्ज घेऊन जेव्हां राघोपंत नगरकर मजकडे आले व 'यावर सही करा' असें मला म्हणूं लागले, तेव्हां मी थोडा चकित झालों आणि थट्टेनें त्यांना म्हटलें, 'माझ्या सर्वप्रायश्चित्ताबद्दलच्या इतक्या आतुरतेची बातमी तुम्हांला दिली तरी कोणीं?' तेव्हां ते म्हणाले, 'अहो तुम्हाला प्रायश्चित्ताची जरूरी नाहीं व तुम्हीं तें घेणारही नाहीं हें मला माहीत आहे. परंतु अशा अशा कारणाकरितां (येथें त्यांनीं मला वरील सर्व हकीकत सांगितली) सदर अर्जावर रानड्यांना सही कर्तव्य आहे, व त्यांची एकट्यांचीच सही घालण्यापेक्षां रूपुस्ताला आणखी चारदोन सह्या असलेल्या बऱ्या आणि या अर्जाच्या बुडाशीं असलेला समाजसुधारणेचा हेतु ध्यानांत घेऊन तुम्ही सही घाल अशा भरंवशानें मी तुम्हांकडे आलों आहें.' असो, वर ज्या खटपटीचा उल्लेख केला आहे त्या खटपटींत टिळकांसारख्या माणसाची आपल्याला मदत मिळेल तर ती रानड्यांना पाहिजेच होती व गोपाळराव जोश्यांच्या अजब युक्तीनें टिळक चहाग्रामण्यांत गोंवले गेल्यामुळें त्यांच्याकडून ती मिळण्याचा पुष्कळ संभव होता. खरें पाहिलें तर टिळकांसारखा धूर्त मनुष्य हा या प्रकरणांत सांपडावयाचाच नाहीं. पण शेरास सवाशेर भेटावा तसें होऊन गोपाळराव जोशांनीं त्यांना चकविलें खरें! यासंबंधानें चरित्रकार रा. केळकर यांनींही प्रांजळपणें वरच्या सारखेच उद्गार काढले आहेत व ते येथें उतरून घेणें अस्थानीं होईलसें वाटत नाहीं. ते लिहितातः—"गोपाळरावांच्या कटाचा यत्किंचित् मागमूस लागता तर स्वतः टिळक पंचहौदमिशनमध्यें गेले नसते. पण टिळकांचीही सावधगिरी या चहाच्या पेल्यांत न बुडती तर ग्रामण्याला असा रंग कसा चढला असता! टिळक न जाऊन नुसते रानडे-प्रभृति सुधारक गेले असते, तर रानड्यांची मजा त्यांनीं अधिक मोकळ्या

मनानें पाहिली असती. पण ते स्वतः या चहाच्या पुरांत सांपडल्यामुळें ×××सुधारणेच्या वादांत निखालस शत्रूप्रमाणें हमरीतुमरीनें भांडणारे टिळक व रानडे हे समायिक प्रतिवादी होऊन ज्यांच्या करणीमुळें एका दावणीस बसले, त्या गोपाळराव जोशांची तारीफ करावी तितकी थोडीच होणार आहे. " गोपाळराव जोश्यांनीं टिळकांना या चहा-प्रकरणांत चकविलें नसतें तर त्यांनीं वरील उताऱ्यांत म्हटल्याप्रमाणें रानड्यांची मजा अधिक मोकळेपणानें पाहिली असती, इतकेंच नव्हे तर " नातुपक्षानें जर टिळकांना प्रथमच किंचित् सवलत देऊन सहानु-भूतीनें वागवलें असतें, तर ( या चहाप्रकरणांत सांपडूनही ) सुधारकांशीं भांडण्याला वकील म्हणून नातुपक्षाला टिळक लाभले असते " असा त्यावेळची माहिती असलेल्या एका गृहस्थाचा अभिप्राय असल्याचाही उल्लेख याच प्रकरणांत फिरून पुढेंही एके ठिकाणीं चरित्रकारांनीं केला आहे. असो. अशा प्रकारें अचानक रीतीनें श्रींच्या दरबारीं सुधारक-पक्षाच्या वतीनें बोलणें चालणें करण्यास टिळकांसारखा वकील मिळ-ण्याची आयती आलेली संधि न घालवितां साधल्यास तिचा उपयोग करून घ्यावा, असें रानड्यांना वाटणें अगदीं स्वाभाविक होतें. टिळकांनीं आपण ख्रिस्त्याच्या हातचा चहा घेतल्याचें कबूल केलें, परंतु तसें करण्याला शास्त्राची मुभा आहे असें ते प्रतिपादित होते. बिस्किटें खाण्याची ते तरफदारी करीत नव्हते. कारण आपण तीं खाल्लींच नाहींत असें त्यांचें म्हणणें होतें. अशा स्थितींत ख्रिस्ती अगर मुसलमान मेस्मनच्या हातचा भात त्यांनीं खाल्ल्याचें सुधारकांत प्रसिद्ध झालेलें विधान जसें टिळकांना तसेंच रानडे यांनीं मनांत योजलेल्या धोरणासही बाधक होतें; व ता. २८ नोव्हेंबरच्या सुधारकांत प्रसिद्ध झालेलें उत्तर प्रत्युत्तर म्हणजे तर खुंटा हलवून बळकट करण्यासारखेंच होतें ! तें वाचतांच रानडे गोखल्यांकडे जाऊन त्यांना म्हणाले, ' तुम्हीं हें काय आरंभिलें आहे ? आम्ही योजीत आहों एक आणि होत आहे भलतेंच. ' गोखले म्हणाले,

' या बाबतींत देवधरांनीं आपण होऊन शक्य ती खटपट आधींच करून पाहिली. पण ती जमली नाहीं त्याला काय करावें ? ' रानडे म्हणाले, ' तें कसेंही असो, तुम्ही या पावलीं मजबरोबर आगरकरांकडे चला. ' गोखले बरें म्हणून उभयतां आगरकरांकडे गेले. शिवरामपंत साठेही त्यांच्याबरोबर होते. आगरकरांनीं सदर विधान परत घ्यावें म्हणून रानड्यांनीं परोपरीनें त्यांना सांगून पाहिलें, परंतु आगरकर त्यास कबल होईनात. ते म्हणाले, 'मला कांहीं अब्रु आहे कीं नाहीं ? तुम्ही म्हणतां तसें मीं केलें तर पुढें माझ्या शब्दावर लोकांचा विश्वास बसेल काय ? तसं केल्यानें माझें नांव बद्द झाल्यावांचून राहील काय ? मीं लिहिलें तें खोटें अशी का तुमची समजूत आहे ? ' रानडे म्हणाले, ' तुमचें विधान खोटें आहे म्हणून तें परत घ्या असें माझें म्हणणें नाहीं. टिळकांसारखा व त्यांच्या परिस्थितींतला मनुष्य असल्या गोष्टींत एखाद्या कर्मठ सोवळ्या ब्राह्मणाप्रमाणें अगदीं अलिप्त राहूं शकेल हें मला संभवनीय वाटत नाहीं. परंतु त्यांच्यासंबंधानें वर्तमानपत्रांतून असलें विधान प्रसिद्ध होणें हें आम्हीं मनांत योजलेल्या हेतूंस विघातक आहे. एवढ्याकरितांच तुम्हीं तें परत घ्यावें असें माझें म्हणणें आहे. तुम्हीं तें परत घेतल्यानें लोकांचा तुमच्यावरचा विश्वास उडेल हें तुमचें म्हणणें मला मुळींच ग्राह्य वाटत नाहीं. सुधारकाचा संपादक हा अमूर्त व्यक्ति आहे. गोपाळ गणेश आगरकर ही मूर्त व्यक्ति आहे, तेव्हां सुधारकाच्या संपादकानें आपलें एखादें विधान परत घेतलें म्हणून तेवढ्यानें गोपाळ गणेश आगरकरांवरील लोकांचा विश्वास काडीभरही कमी होणें शक्य नाहीं. ' पण हा कोटिक्रम आगरकरांना पटेना. तेव्हां आपलें निर्वाणीचें अस्त्र पुढें करून रानडे म्हणाले, ' ठीक आहे. उद्यांपासून माझें कचेरींतील काम संपलें म्हणजे मीही खुशाल गाडींत बसून बंडावर हवा खाण्यास जात जाईन. सार्वजनिक हितवर्धनाच्या माझ्या साऱ्या उड्या तुमच्यासारख्या चार स्नेह्यांच्या बळावर. ते जर सार्वजनिक हिताला

प्राधान्य देऊन प्रसंगोपात्त अशा तडजोडीला कबूल नाहींत तर तें साध-ण्याचा हव्यास धरण्यांत तरी हशील कोणतें ? तेव्हां उद्यांपासून सार्वज-निक कामांत पडण्याचेंच आपण सोडून द्यावें, झालें ' रानड्यांच्या या निर्वाणीच्या अस्त्राचा आगरकरांच्या मनावर शेवटीं परिणाम होऊन ते म्हणाले, ' सुधारक पत्र तुमचेंच आहे. तुम्हाला काय वाटेल तें तुम्ही त्यांत लिहा. माझी त्याला ना नाहीं. ' हें ऐकतांच शिवरामपंत साठे, तापल्या तव्यावरच भाकरी भाजून घेतलेली बरी, असें मनांत आणून ' तुम्हीं याच बैठकीस काय लिहावयाचें तें लिहा ' असें रानड्यांस म्हणाले. रानडे म्हणाले, ' मी तें लिहिण्याची मुळींच जरूर नाहीं. त्यांचे तेच तें करतील. ' शेवटीं त्याच बैठकीस ' बोलणें फोल झालें ' हा मथळा घालून आगरकरांनीं आपलें विधान परत घेतलें, व न जाणों आगरकर मागाहून कदाचित् फिरतील या भीतीनें माफीच्या मजकुराचा कागद साठ्यांनीं आपल्या ताब्यांत घेतला व तिघेही तेथून परत फिरले. वाटेंत शिवरामपंत साठ्यांनीं माझी भेट घेतली व घडलेली सर्व हकीगत मला सांगून त्यांनीं तो माफीचा कागद माझे हवालीं केला. असो, या माफीप्रकरणाचा आणखी भाग द्यावयाचा राहिला आहे. पण विस्तार-भयास्तव तो तिसऱ्या लेखावर टाकणें भाग आहे.

'या बाबतींत देवधरांनीं आपण होऊन शक्य ती खटपट आधींच करून पाहिली. पण ती जमली नाहीं त्याला काय करावें ? ' रानडे म्हणाले, 'तें कसेंही असो, तुम्ही या पावलीं मजबरोबर आगरकरांकडे चला.' गोखले बरें म्हणून उभयतां आगरकरांकडे गेले. शिवरामपंत साठेही त्यांच्याबरोबर होते. आगरकरांनीं सदर विधान परत घ्यावें म्हणून रानड्यांनीं परोपरीनें त्यांना सांगून पाहिलें, परंतु आगरकर त्यास कबल होईनात. ते म्हणाले, 'मला कांहीं अब्रु आहे कीं नाहीं ? तुम्ही म्हणतां तसें मीं केलें तर पुढें माझ्या शब्दावर लोकांचा विश्वास बसेल काय ? तसें केल्यानें माझें नांव बद्दू झाल्यावांचून राहील काय ? मीं लिहिलें तें खोटें अशी का तुमची समजूत आहे ? ' रानडे म्हणाले, 'तुमचें विधान खोटें आहे म्हणून तें परत घ्या असें माझें म्हणणें नाहीं. टिळकांसारखा व त्यांच्या परिस्थितींतला मनुष्य असल्या गोष्टींत एखाद्या कर्मठ सोवळ्या ब्राह्मणाप्रमाणें अगदीं अलिप्त राहूं शकेल हें मला संभवनीय वाटत नाहीं. परंतु त्यांच्यासंबंधानें वर्तमानपत्रांतून असलें विधान प्रसिद्ध होणें हें आम्हीं मनांत योजलेल्या हेतूंस विघातक आहे. एवढ्याकरितांच तुम्हीं तें परत घ्यावें असें माझें म्हणणें आहे. तुम्हीं तें परत घेतल्यानें लोकांचा तुमच्यावरचा विश्वास उडेल हें तुमचें म्हणणें मला मुळींच ग्राह्य वाटत नाहीं. सुधारकाचा संपादक हा अमूर्त व्यक्ति आहे. गोपाळ गणेश आगरकर ही मूर्त व्यक्ति आहे, तेव्हां सुधारकाच्या संपादकानें आपलें एखादें विधान परत घेतलें म्हणून तेवढ्यानें गोपाळ गणेश आगरकरांवरील लोकांचा विश्वास काडीभरही कमी होणें शक्य नाहीं. ' पण हा कोटिक्रम आगरकरांना पटेना. तेव्हां आपलें निर्वाणीचें अस्त्र पुढें करून रानडे म्हणाले, 'ठीक आहे. उद्यांपासून माझें कचेरींतील काम संपलें म्हणजे मीही खुशाल गाडींत बसून बंडावर हवा खाण्यास जात जाईन. सार्वजनिक हितवर्धनाच्या माझ्या साऱ्या उड्या तुमच्यासारख्या चार, स्नेह्यांच्या बळावर. ते जर सार्वजनिक हिताला

प्राधान्य देऊन प्रसंगोपात्त अशा तडजोडीला कबूल नाहींत तर तें साध-ण्याचा हव्यास धरण्यांत तरी हशील कोणतें ? तेव्हां उद्यांपासून सार्वज-निक कामांत पडण्याचेंच आपण सोडून द्यावें, झालें ' रानड्यांच्या या निर्वाणीच्या अस्त्राचा आगरकरांच्या मनावर शेवटीं परिणाम होऊन ते म्हणाले, ' सुधारक पत्र तुमचेंच आहे. तुम्हाला काय वाटेल तें तुम्ही त्यांत लिहा. माझी त्याला ना नाहीं. ' हें ऐकतांच शिवरामपंत साठे, तापल्या तव्यावरच भाकरी भाजून घेतलेली बरी, असें मनांत आणून ' तुम्हीं याच बैठकीस काय लिहावयाचें तें लिहा ' असें रानड्यांस म्हणाले. रानडे म्हणाले, ' मी तें लिहिण्याची मुळींच जरूर नाहीं. त्यांचे तेच तें करतील. ' शेवटीं त्याच बैठकीस ' बोलणें फोल झालें ' हा मथळा घालून आगरकरांनीं आपलें विधान परत घेतलें, व न जाणों आगरकर मागाहून कदाचित् फिरतील या भीतीनें माफीच्या मजकुराचा कागद साठ्यांनीं आपल्या ताब्यांत घेतला व तिघेही तेथून परत फिरले. वाटेंत शिवरामपंत साठ्यांनीं माझी भेट घेतली व घडलेली सर्व हकीगत मला सांगून त्यांनीं तो माफीचा कागद माझे हवालीं केला. असो, या माफीप्रकरणाचा आणखी भाग द्यावयाचा राहिला आहे. पण विस्तार-भयास्तव तो तिसऱ्या लेखावर टाकणें भाग आहे.

## लेख ३ रा.

आगरकरांच्या माफीप्रकरणांत रानड्यांनीं मध्यस्ती कां केली, व शेवटीं त्यांच्या म्हणण्याला मान देऊन माफीचा तयार केलेला मसुदा सोमवार ता. २८ नोव्हेंबर रोजींच साठ्यांनीं माझ्या हवालीं कसा केला, हें गेल्या लेखांत सांगितलें. आजच्या लेखांत राहिलेली हकीकत देऊन या विषयाचा समारोप करण्याचें ठरविलें आहे.

आगरकरांकडून परत घरीं जातांना रानड्यांनीं वाटेंत टिळकांची गांठ घेतली. त्यावेळेस टिळक सुधारकावर करावयाच्या फिर्यादीचा मसुदा तयार करीत होते. तें पाहून रानडे त्यांना म्हणाले, "ती फिर्याद राहूं दे. तुम्ही उद्यांच्या केसरींत 'सुधारकानें टिळकांवर केलेल्या आरोपासंबंधानें आगरकरांची फसगत झाली असावी असें दिसतें. आपण केलेलें विधान बरोबर नाहीं असें त्यांना चौकशीअंतीं कळून आल्यास परत घेण्यास ते यत्किंचितही मागें घेणार नाहींत अशी आमची खात्री आहे.' अशा आशयाचा मजकूर येईल अशी व्यवस्था करा, म्हणजे तुम्हांस या फिर्यादीचें कारणच पडणार नाहीं. मात्र या मजकुरांत आगरकरांचें मन दुखेल असा एकही शब्द येतां उपयोगी नाहीं." टिळकांना आयताच देव पावल्यासारखें झालें व त्यांनीं रानड्यांनीं सांगितल्याप्रमाणें लिहिण्याचें कबूल करून तसें केलेंही.

वरील हकीकतीवरून हें अगदीं स्पष्ट दिसून येईल कीं, आगरकरांची माफी जरी ता. ५ डिसेंबरच्या सुधारकांत प्रसिद्ध झाली तथापि ज्या तारखेच्या सुधारकांत "आम्ही आपलें विधान परतही घेत नाहीं व ज्यांच्या आधारावर तें केलें आहे तो पुरावाहि आम्ही प्रसिद्ध करीत नाहीं, तुम्हांस काय करणें असेल तें तुम्हीं खुशाल करावें." अशा आशयाचें त्यांचें आव्हानवजा उत्तर प्रसिद्ध झालें आहे, त्याच तारखेला

म्हणजे सोमवार ता.२८ नोव्हेंबर रोजीं सकाळींच त्यांनीं ती लिहून शिवरामपंत साठ्यांच्या स्वाधीन केली होती. तेव्हां या ठिकाणीं पहिला प्रश्न उपस्थित होतो तो हा कीं, आपल्या विधानाच्या सत्यासत्यतेची शहानिशा करण्याला आगरकरांना आधीं अवसर तरी मिळाला होता का ? आणि तोच जर मिळाला नव्हता तर त्यांना मिळालेली माहिती साधार नसून ऐकीव होती असें तरी अनुमान कसें काढतां येईल ? आणि या अनुमानालाच जर मुळीं आधार नाहीं तर 'आगरकरांनीं जो उपदेश मोठ्या आढ्यतेनें इतरांना केला होता तोच ते पक्षांधतेमुळें विसरले' असें जें चरित्रकारांनीं बिनदिक्कत विधान केलें आहे, त्याला अर्थातच आधार रहात नाहीं. तसेंच सदर विधानाच्या सत्यासत्यतेची शहानिशा करण्याचा जर मुळीं प्रसंगच आला नाहीं, तर 'ज्यांच्या आधारावर तें केलें होतें त्यांनीं खरें खोटें करण्याची वेळ आली, तेव्हां आगरकरांना दगा दिला' असें निःशंक लिहिणें म्हणजे निवळ कल्पित कादंबरीलाच इतिहास बनविणें नव्हे काय ! या माफी-प्रकरणासंबंधानें पहिल्या लेखाच्या आरंभीं जें अवतरण दिलें आहे, त्याच्या थोडें पुढें 'आरोप खोटा ही गोष्ट रानड्यांना खासगी चौकशींत कळून आली होती' असेंही एक विधान आहे, पण त्याला आधार मात्र दिलेला नाहीं. आगरकरांचें विधान खोटें आहे असें जर रानड्यांना खासगी चौकशींत कळतें तर त्यांनीं तें परत घ्यावें असा त्यांना आग्रह करतांना त्या विधानाच्या खोटेपणाच्या मुद्यावरच त्यांनीं विशेष भर दिला असता; परंतु त्यांनीं तसें केलें नाहीं. विधान खरें असो वा खोटें असो, तें या वेळीं वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध होणें हें आपण मनांत योजलेल्या हेतूला विघातक आहे, आणि एवढ्याकरितांच तें आगरकरांनीं परत घ्यावें इतकेंच त्यांचें म्हणणें होतें, हें गेल्या लेखांत स्पष्ट झालेंच आहे. यावरून पहातां "बेअब्रूच्या खटल्यांत माफी मागण्याचा आगरकरांवर हा दुसरा प्रसंग. पहिल्या प्रसंगीं माफी मागूनही त्यांना शिक्षा भोगावी लागली. या खेपेस माफी मागत-

त्यानें ती वांचली, इतकाच फरक. " हें चरित्रकारांनीं आगरकरांसंबंधानें केलेलें विधान अथवा त्यांतील शब्दयोजनेनें ध्वनित केलेलीं अनुमानें अगदीं निराधार कशीं आहेत, हें सहज दिसून येईल. आगरकरांवर बेअब्रूचा खटला झाला तो केवळ एकच. त्यांच्यावर दुसरा खटलाच आधीं झालेला नाहीं. त्या खटल्यांत त्यांना माफी मागावी लागली ती ज्या पत्रांच्या आधारावर त्यांची सारी मिस्त तींच बनावट ठरलीं म्हणून, आणि शिवाय या माफींत टिळकही त्यांचे जोडीदार होतेच व ही माफी मागण्यांत दोघांनींही योग्य तेंच केलें. दुसऱ्या खेपेस जी माफी मागितली ती आपलें विधान खोटें ठरलें म्हणूनही नव्हे, अथवा आतां टिळक आपणास तुरुंग दाखविणार म्हणून भीतीनें गांगरून जाऊनही नव्हे. तर रानड्यांचा शब्द मोडतां येईना म्हणून, हेंही आतां नव्यानें सांगावयास नकोच. माफी मागितल्यानें शिक्षा वांचली, याचा गर्भितार्थ 'शिक्षा वांचण्याकरितांच आगरकरांनीं माफी मागितली' असाच होत नाहीं का ? आगरकरांसारख्या धीरोदात्त पुरुषाच्या उज्ज्वल कीर्तीवर अशा प्रकारें डांबर फासण्याचें काम आणि तेंही चरित्रकारासारख्या लोकाग्रणी म्हणविणाऱ्याच्या कलमानें करावें याहून अधिक उद्वेगजनक दुसरें कांहीं असूं शकेल काय ?

असो, आणखी एका गोष्टीचा उल्लेख करणें क्रमप्राप्तच आहे. ती गोष्ट म्हणजे आगरकरांची माफी प्रसिद्ध झाल्यानंतर त्यावर केसरींत आलेली टीका. या टीकेचें साह्य घेऊन ' कोटीनें कोटी उडविण्यांत टिळकांइतका हजरजबाबी मनुष्य क्वचितच आढळेल. ' या शब्दांनीं चारित्रनायकाचें चरित्रकारांनीं मोठें कौतुक केलें आहे. टिळकांच्या हजरजबाबीपणाबद्दल वाद नाहीं, पण प्रस्तुत प्रसंगीं तो नुसता अस्थानीं होता, इतकेंच नाहीं तर टिळकांच्या क्षुद्र अथवा अनुदार मनःप्रवृत्तीचा तो एक उत्तम मासलाच होय, असें म्हणण्यास हरकत नाहीं. चारित्रकारांनींही केसरींतील सदर टीकेला ' मासलेवाईक ' असेंच विशेषण लावलें आहे, पण कोणत्या

अर्थानें न कळे ! टिळकांची कोटी पुढें दिल्याप्रमाणें आहेः—" रसायन रीत्या कोळसा व हिरा एकच म्हणून लोकांच्या हिऱ्याचा कोळशाच्या बुद्धीनें जर कोणी अपहार करूं पाहील, अगर स्वपरस्त्रीचा मला भेद वाटत नाहीं, म्हणून परस्त्रीचा अभिलाष करील तर तो लोकसमाज व कायदा या दोहोंच्याही दृष्टीनें सारखाच गुन्हेगार होईल. आपण गोमूत्र, गोमय व गाईचें दूध खातों, तर गाय खाण्यासही कोणती हरकत आहे ? ही जुनी कोटीही अशाच प्रकारची आहे." आणि टिळकांच्या या सगळ्या कोटीबाजीला चालन देण्यास कारण काय झालें, याचें उत्तर चरित्र-कारांच्याच शब्दांत द्यावयाचें झाल्यास " आगरकरांनींही घसरतां घसरतां माफीच्या लेखांतच टिळकांना एक कोपरखळी मारली होती " हें होय. बरें ही कोपरखळी तरी कोणती ? ती इतकीच कीं, आगरकरांनीं आपल्या माफीपत्रांत असें लिहिलें होतें कीं, " टिळकांनीं स्टेशनवर मेस्मनच्या हातचा भात खाल्ला ही गोष्ट असिद्ध म्हणून परत घेतली, पण ख्रिस्त्या-च्या हातचा चहा पिणें व मुसलमानांच्या हातचा भात खाणें यांत फार अंतर असल्याचा जो बहाणा टिळक करतात, त्यांत मात्र फारसा अर्थ नाहीं. आम्हीं तरी हीं दोन्हीं कृत्यें धर्मदृष्ट्या सारखींच समजतों." यांत कोपरखळी कोठें आहे, कोण जाणें ! या लेखमालेच्या आरंभींच ता. १४ नोव्हेंबरच्या सुधारकांत टिळकांविरुद्ध आलेल्या ज्या टीकालेखाचा उल्लेख आहे, त्यांतील मुख्य मुद्दा असा होता कीं, टिळकांनीं धर्माभिमानाचें कितीही सोंग आणिलें तरी ते खरोखर सुधारकच आहेत. परंतु त्यांना आपल्या गोटांत घेण्यास सुधारकांची ना नसून, त्यांना सुधारक म्हणवून घेण्याची लाज वाटते आणि धर्माभिमानी त्यांना आपल्यांतून हुसकून लावीत असतां ते निलाजऱ्यासारखे फिरून त्यांच्या गोटांत शिरूं पहातात. आणि ते खरोखर सुधारकच आहेत, या आपल्या विधानाच्या समर्थनार्थ आगरकरांनीं पुढें असें लिहिलें आहे कीं, ते ख्रिस्त्याच्या हातचा चहा पितात, एवढेंच नाहीं तर मेस्मनच्या हातचा भातही

खातात. " या स्वमतमंडनांत ख्रिस्त्याच्या हातच्या चहाबरोबर मेस्मनच्या हातचा भातही आगरकरांनीं मध्येंच घुसडून दिला आहे. " हें रा. केळकरांचें विधान कांहीं खोटें नाहीं. आतां टिळकांनीं ख्रिस्त्यांच्या हातचा चहा घेतला, याबद्दल वाद मुळींच नाहीं. ती गोष्ट स्वतः टिळकांनींच कबूल केली आहे. तेव्हां प्रश्न काय तो ख्रिस्त्याच्या हातचा चहा पिणें हें टिळकांच्या धर्माभिमानीपणाचें द्योतक समजावयाचें कीं तें त्यांच्या सुधारकपणाचें द्योतक समजावयाचें, इतकाच राहिला. आणि याचें उत्तर इतकें उघड आहे कीं, तें एकादें चार वर्षांचें पोरही देऊं शकेल. आणि ख्रिस्त्याच्या हातचा चहा पिणें हें धर्माभिमानीपणाचें लक्षण आहे असें म्हणणारा एकही कर्मठ ब्राह्मण सांपडणार नाहीं हें जर निर्विवाद आहे, तर केळकर म्हणतात त्याप्रमाणें ' आगरकरांनीं मध्येंच घुसडलेला मेस्मनच्या हातचा भात ' जमेस न धरला तरी नुसत्या ख्रिस्त्याच्या हातचें चहापान हेंच टिळकांचें सुधारकत्व सिद्ध करण्यास अगदीं पुरेसें आहे. आणि आगरकर तरी आपल्या मार्फीत दुसरें काय म्हणतात? मेस्मनच्या हातचा भात खाणें हें जसें हल्लीं रूढ असलेल्या हिंदुधर्माच्या दृष्टीनें धर्माभिमानित्वाचें लक्षण ठरूं शकणार नाहीं, त्याचप्रमाणें ख्रिस्त्याच्या हातचा चहा पिणें हेंही त्याच दृष्टीनें धर्माभिमानित्वाचें लक्षण ठरणें केवळ अशक्य आहे. आणि म्हणून टिळकांनीं मेस्मनच्या हातचा भात खाल्ला ही गोष्ट जरी असिद्ध म्हणून सोडून दिली, तथापि त्यामुळें टिळक हे आपणाला धर्माभिमानी म्हणवीत असले, तरी ते वास्तविक धर्माभिमानी नाहींत, ते खरोखर सुधारकच आहेत, हा जो आमचा मुख्य मुद्दा त्याला कोणत्याही प्रकारें बाध येत नाहीं, इतकेंच काय तें आगरकरांचें म्हणणें आहे. ख्रिस्त्याच्या हातचा चहा पिणें व भात खाणें हीं दोन्हीं जर रूढहिंदुधर्मदृष्ट्या धर्मबाह्यच कृत्यें होत, आणि टिळकांनीं जर तसला चहा प्याला आहे, तर त्यांनीं तसला भात खाल्ला नसला तरी तो खाल्ला म्हणण्यास काय हरकत आहे? व त्यांत अपराध

तो काय झाला ? असें आगरकर म्हणते, तर गोष्ट वेगळी. त्यांनीं तसें म्हटलेलें नाहीं. टिळकांनीं मात खाल्ल्याचें आपलें विधान त्यांनीं बिनें-तक्रार परत घेतलें आहे. असें जर आहे, तर आगरकरांनीं जातां जातां कोपरखळी मारली हा चरित्रकारांचा कोटिक्रम किंवा कोळश्याच्या बुद्धीनें हिऱ्याचा अपहार केला, अथवा स्वपरस्त्रीच्या अभेदबुद्धीनें परस्त्रीचा अभिलाष केला, हा चरित्रकारांना कौतुकास्पद वाटणारा टिळकांचा कोटिक्रम हीं दोन्हीं अगदीं अस्थानीं आहेत असें सिद्ध होत नाहीं काय ?

टिळकांचा कोटिक्रम सर्वस्वीं अस्थानीं कसा होता हें येथवर दाखविलें. आतां तो त्यांच्या क्षुद्र मनःप्रवृत्तीचा द्योतक कसा हें सांगावयाचें राहिलें. चरित्रकारांच्या या वादग्रस्त लेखांत असेंही एक विधान आहे कीं " रानड्यांकडून टिळकांनीं कबूल करून घेतलेल्या माफीच्या अटींत ' बोलणें फोल झालें ' या मथळ्याचें कलम खास नव्हतें ! या विधानां-तील ' मथळ्याचें कलम ' म्हणजे काय ? ह्याचा मला तरी नीटसा बोध होत नाहीं. त्याचा अर्थ काय असेल तो असो. पण हें वाक्य मध्येंच घुसडून देण्यांत 'या माफीसंबंधानें टिळकांनीं रानड्यांकडून कांहीं अटी कबूल करून घेतल्या होत्या ' असें भासविण्याचा त्यांचा हेतु असला पाहिजे हें उघड आहे. पण ही बाब अशी मुग्ध ठेवण्यापेक्षां त्यांनीं त्या अटींची यादच दिली असती तर बरें झालें नसतें काय ? पण जर मुळीं अटी ठरलेल्याच नव्हत्या तर त्यांची याद तरी कशी देतां यावी ? अट जर कुणी घातलीच असेल तर ती रानड्यांनींच आणि तीही इतकीच कीं, टिळकांनीं ता. २९ नोव्हेंबरच्या केसरींत अमुकच मजकूर घातला पाहिजे; त्यांत आगरकरांचें मन दुखेल असा एकही शब्द येतां उपयोगी नाहीं, हें वर सांगितलेंच आहे. आणि ती अट टिळकांनीं पूर्णपणें पाळली यांतही संशय नाहीं. ज्यांनीं ता. २८ च्या सुधारकांतील तें टिळकांचें पत्र आणि त्याला आगरकरांनीं दिलेलें तें खणखणित उत्तर वाचलें होतें, ते तो ता. २५ च्या केसरींतील सौम्य

लेख वाचून मोठे बुचकळ्यांत पडले. पण त्या लेखांतील सौजन्याचें श्रेय टिळकांना नसून रानड्यांना होतें, हें लोकांना कळावें कसें? पण ता. ५ डिसेंबरच्या सुधारकांत माफी प्रसिद्ध झाल्याबरोबर ता. ६ च्या केसरींत टिळक आपल्या वळणावर जायचे ते गेलेच! खरें पाहिलें तर कोणत्याही कारणानें कां होईना, पण या बाबतींत टिळकांचाच विजय झाला होता. तेव्हां त्यांनीं "आम्हीं गेल्या अंकांत भाकित केल्याप्रमाणें आपलें विधान चुकीचें आहे असें कळतांच आगरकरांनीं तें लागलींच परत घेतलें हें पाहून आम्हांस आनंद होतो" इतकेंच म्हटलें असतें, तर तेवढ्यानें त्यांचें काम झालें असतें. पण तें घडावें कसें? 'स्वभावो दुरतिक्रमः' हेंच खरें. टिळकांचा तो लेख वाचून मी त्याच वेळीं आगरकरांस म्हणालों, "सुधारकानें माफी कां मागितली, याचा सारा खरा इतिहास टिळकांस माहीत असून त्यांनीं हें असें लिहावें हें त्यांच्या शीलास कमीपणा आणणारें नाहीं का?" ते मला म्हणाले, "आतां कां कुथतां? आम्हीं माफी मागितली ती रानड्यांच्या आग्रहास्तव असें तर तुम्हांस प्रसिद्धपणें म्हणतां येत नाहींना? आतां गप्प बसा झालें." असो. प्रसिद्धपणें म्हणतां येईना, तें आज विस्तारानें म्हणण्याची मला रा. केळकरांनीं संधि दिल्याबद्दल त्यांचे आभार मानून मी हा लेख संपवितों.

# विष्णु कृष्ण चिपळूणकर.

( लेखक—ग. त्र्यं माडखोलकर. )

पृष्ठसंख्या सुमारें १०० क्राऊन षोडशपेजी.

**किं. १० आणे.**

हा निबंध विविधज्ञानविस्तारांत पूर्वी प्रसिद्ध झाला होता. त्याचीच ही पुनःप्रकाशित आवृत्ति आहे.

या निबंधांत, निबंधमाला हें शास्त्रीबुवांच्या कर्तृत्वाचें अधिष्ठान कसें आहे, मालेच्या द्वारें त्यांना भावी पिढींत वाङ्मयसेवेची स्फूर्ति कशी उत्पन्न करतां आली, नुसत्या मराठी वाङ्मयांतच नव्हे तर महाराष्ट्राच्या मनोघटनेंतही त्यांच्या या ग्रंथानें कशी अपूर्वक्रांति घडवून आणली, देशाभिमान व स्वार्थत्याग या गुणांच्या योगानें त्यांच्या कार्यास विशेष प्रकारची तेजस्विता कशी आली वगैरेंचें यथार्थ विवेचन समतोल दृष्टीनें केलेलें आढळून येईल.

त्याचप्रमाणें शास्त्रीबुवांच्या टीकेंत पुष्कळ वेळां दिसून येत असलेला एकांगीपणा, त्यांच्या विनोदांतील उपहासबुद्धि, त्यांच्या-मधील परमतसहिष्णुतेचा अभाव वगैरे अवगुणांमुळें तरुण पिढीवर झालेले अनिष्ट परिणाम यांचाही निबंधलेखकांनीं म्हणजे रा. ग. त्र्यं. माडखोकलर यांनीं थोडक्यांत पण समर्पक रीतीनें परामर्ष घेतला आहे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे शास्त्रीबुवांचे अंधभक्त किंवा अंधशत्रु या उभयतांनाही हा लहानसा निबंध विचारप्रवर्तक झाल्याशिवाय रहाणार नाहीं.

**म्यानेजर, आर्यभूषण प्रेस, पुणें सिटी.**

## कै. हरि नारायण आपटे

कृत.

डेमी साईज<br>पृष्ठें २६० ] **कर्मयोग** [ किंमत १॥=१२<br>ट. हं. निराळें.

---

कै. हरि नारायण आपटे यांनीं लिहिलेली ही शेवटची कादंबरी होय. आपल्या हातून लोकहिताचें विशेषतः आपल्या भगिनींच्या उन्नतीचें असें कांहीं तरी कार्य व्हावें अशा तळमळीनें कॉलेजांतील शिक्षण संपवून बाहेर पडलेल्या एका सुसंस्कृत व सद्य अंतःकरणाच्या तरुणाची तळमळ या कादंबरींत फारच हृदयंगम रीतीनें चित्रित केली आहे. गांभीर्य व विनोद यांचें या कादंबरींत यथाप्रमाण संमिश्र झालें असल्यामुळें कोणत्याही मनोवृत्तीच्या माणसास ही कादंबरी मनोरंजक व उद्बोधक झाल्यावांचून राहणार नाहीं.

हरिभाऊंच हें शेवटचें अपत्य होय. तें आपल्या पायावर उभें राहून आपल्या अग्रजांप्रमाणें समाजांत मानमान्यता पावलेलें पहाण्यापूर्वींच हरिभाऊंच्या आयुष्याचें पर्यवसान झालें हा खडतर कर्मयोगच म्हणावयाचा ! तरी पण हरिभाऊंनीं आपल्या ओजस्वी वाणीनें संपादन केलेले सहस्रावधि जिव्हाळ्याचे आप्तेष्ट हे त्यांच्या या अपत्याचें प्रेमानें लालन करतील असा पूर्ण भरंवसा आहे.

**म्यानेजर, आर्यभूषण प्रेस, पुणें शहर.**

त्यांच्या बुद्धिमत्तेस कलहप्रियतेची व तिच्या मुळाशीं असलेल्या शिरजोर अहंमन्यतेची कायमची जोड मिळाल्यामुळें त्यांचें बरोबरीच्या माणसांशीं केव्हांही जमलें नाहीं. डे. ए. सोसायटीशीं भांडून टिळक बाहेर पडले त्या हकीकतीचा समारोप करतांना चरित्रकार म्हणतातः—

" बरोबरीचा दर्जा व बरोबरीचें कर्तृत्व ज्यांचें आहे, अशा लोकांत पुष्कळ वेळ नांदून काम करणें हें टिळकांना साधत नाहीं. जेथें जाईन तेथें मी माझेंच चालवीन असा त्यांचा आग्रह असतो व तोच फुटीला कारणीभूत होतो असा त्यांच्या प्रतिपक्ष्यांचा एक कायमचा आरोप त्यांच्यावर होता व तो खरा मानला तर टिळकांनीं राजिनामा देऊन बाहेर पडणें हें जसें श्रेयस्कर तसेंच शहाणपणाचें होतें असें म्हणण्यास हरकत नाहीं. "

फार कशाला, कलहानें प्रेरणा न मिळालेल्या अशाच टिळकांच्या चळवळींचें वर्णन देऊन त्यांचें चरित्र लिहावयाचें असा चरित्रकारांनीं विचार ठरविला असता तर त्यांना पुरीं दहा पांच पानें तरी लिहितां आलीं असतीं किंवा नाहीं याची शंकाच आहे. टिळकांची विद्या विनयसंपन्न नव्हती हेंच " त्यांच्यापासून दोन पावलें दूर रहाणेंच चांगलें " असें त्यांच्या बरोबरीच्या माणसांस वाटविण्यास कारण झालें. शिवाजी उत्सवासारख्या कित्येक चळवळी अशाही आहेत कीं, ज्या टिळकांच्या प्रतिपक्षीयांनीं प्रारंभीं सुरू केल्या, कांहीं काळ चालविल्या व पुढेंही त्या चालविण्याच्या कामीं टिळकांनासुद्धां त्यांच्या प्रतिपक्षाचीही सहकारिता मिळण्यास वस्तुतः कांहीं हरकत पडण्याचें कारण नव्हतें. पण चळवळीचें स्वरूप ठरविणें, ती चालविण्याची निश्चित पद्धत स्वीकारणें, वगैरे बाबतींत ते कोणत्या वेळीं काय भानगडी उपस्थित करतील याचा भरंवसा धरणें केव्हांही शक्य नव्हतें. त्याचप्रमाणें अगदीं क्षुल्लक कारणावर सुद्धां कोणत्या वेळीं ते कोणाचा आणि कशा रीतीनें उपमर्द करतील किंवा गांवांतील पोरंसोरं त्याच्या मागें लावतील याचाही कांहीं नेम नव्हता. अर्थात् स्वाभिमानी, कर्तृत्ववान् किंवा कल्पक अशा माणसांनीं

सहकारितां करण्यासारखी टिळकांची केव्हांही स्थिति नव्हती, असाच सर्वांचा अनुभव होता.

आपल्या आयुष्याचें शपथपुरःसर ठरविलेलें ध्येय सोडून त्यांनीं डे. ए. सोसायटीचा राजीनामा दिला याबद्दल त्यांना कित्येक लोक दोष देतील. पण टिळकांनीं बरोबरीच्या माणसांत दहा वर्षे तरी कशीं काढलीं याबद्दलही कित्येकांना अचंबा वाटेल. टिळकांचे न्यू इंग्लिश स्कूलमध्यें इतके दिवस निघाले पण त्यामुळें त्यांच्या व्यवसायबंधूंना किती क्लेश सोसावे लागले असतील याची कल्पना सोसायटी सोडतांना टिळकांनीं काढलेल्या उद्गारांवरून उत्कृष्टपणें येते. “प्रत्येकाला त्याच्या कार्यांत मी कांटा आहें असें वाटावें, माझे किरकोळ दोष फुगवून दाखवावे, शेवटीं शिक्षक म्हणून मी नालायक आहें इतकें म्हणण्यापर्यंत मजल यावी, मग रहाण्यांत अर्थ काय ?” असे टिळकांनीं आपल्या राजीनाम्यांत उद्गार काढले आहेत आणि ते चरित्रकारांनीं राजीनाम्यांतून उद्धृत केलेल्या अवतरणांतूनच आम्हीं जसेचे तसे दिले आहेत. वरील उताऱ्यांतील ‘प्रत्येकाला’ हा शब्द खरोखरच अर्थपूर्ण आहेत. एखादा गृहस्थ आपल्या सर्व व्यवसायबंधूं-कडून त्याज्य असा ठरतो तेव्हां त्याच्या स्वभावांत व मनोघटनेंतच कांहीं तरी भयंकर दोष असले पाहिजेत हें उघड होतें.

टिळकांच्या या स्वभावामुळें त्यांना आपल्या भोंवतीं प्रभावशील व हिंमतदार माणसांचा गोतवळा जमवितां आला नाहीं. चरित्रकारासारखीं अगदीं थोडीं माणसें वगळलीं तर टिळकांच्या समीपवर्ती माणसांत येथून तेथून रद्दी व तोंडपुज्या माणसांचाच भरणा झालेला दिसतो. सर्व जन्म आपण सार्वजनिक चळवळींत घालविला तरी सुद्धां नांव घेण्यासारखीं अशीं माणसें आपल्याला जोडतां आलीं नाहींत याबद्दल शेवटीं शेवटीं टिळकांनाही वाईट वाटल्याखेरीज राहिलें नाहीं. विशेषतः इंग्लंडमध्यें डेप्युटेशनवर जातांना त्यांना ही अडचण विशेष भासली. ‘राष्ट्रीय सभेच्या मंडपाचा वाद’ या प्रकरणांत चरित्रकारांनींही या गोष्टीचा निर्देश केला आहे. ते म्हणतातः—

लोकांना चकित करावयाचा होता. रानड्यांची दृष्टि फार दूरवर होती. आपल्या भोंवतीं सुबुद्ध लोकांचा परिवार जमून तो कार्यक्षम व्हावा व त्यायोगानें देशाच्या उन्नतीस सहाय्य व्हावें असा त्यांचा सदा-सर्वदा उदात्त हेतु असे. एखाद्या बुवाच्या किंवा गुरूच्याभोंवतीं जमलेला शिष्यपरिवार जसा गुरूचा ज्या गांवांत मुक्काम होईल त्या गांवांत त्याचा बोलबाला पसरविण्याच्या कामीं गर्क होऊन जातो, त्याप्रमाणेंच टिळकांचा शिष्यपरिवार त्यांची महती गाण्यांतच आपलें शक्तिसर्वस्व खर्चीत होता. या परिवारांत त्यांच्या अन्नावर वाढणाऱ्या आश्रितांचाच भरणा विशेष असल्यामुळें हें विभूतिपूजेचें काम करण्यास त्यांना कमीप-णाहि वाटत नसे. रानड्यांची वृत्ति याहून अर्थातच वेगळी होती. स्वतःच्या बडेजावीची त्यांच्या मनांत कल्पनाही येत नसे. आपल्या शिष्यसमूहाकडून नानाप्रकारचीं लोकहिताचीं कामें होऊन त्यांचें महत्त्व वाढलें म्हणजे रानड्यांना परमावधीचा आनंद होई. राष्ट्राची सर्वांगीण सुधारणा व्हावी अशी रानड्यांची इच्छा असल्यामुळें त्यांना कोणतीही साधनसामुग्री निरुपयोगी वाटत नसे. जी ज्या ठिकाणीं सामुग्री सांपडेल ती घेऊन तिचें ज्याच्या हातून योग्य चीज होईल असें त्यांना वाटेल त्याचे हातीं ती देऊन ते आपल्या नजरेखालीं उद्दिष्ट कार्यभाग व्यव-स्थित रीतीनें करून घेत. टिळक इतक्या खोल पाण्यांत केव्हांही शिरत नसत. जें ज्या वेळीं हातीं येईल तेवढ्यापुरतीच जुजबी सामुग्री जमवून ते वेळ मारून नेत आणि त्याबद्दल पुनः केव्हांही विचार करीत नसत. टिळकांचा या बाबतींत सर्वदा हातावरील प्रपंच असे. रानड्यांच्या जवळ चालू सालचीच काय, पण पुढील अनेक सालांची तरतूद असे. सार्वजनिक आयुष्यांत एकाचा प्रपंच उपऱ्याप्रमाणें असे, तर दुसऱ्याचा खानदानींतील घरंदाजाप्रमाणें असे. रानडे सुधारक होते तसे टिळकही सुधारक होते. पण रानड्यांच्यामध्यें निदान सुधारक म्हणवून घेण्याचें धैर्य होतें. टिळक सुधारकांची टवाळी करून आपण सुधारक नाहीं असेंच नेहमीं भासवीत होते.

रानड्यांच्या परिवारांत संस्थानिकांपासून अगदीं कारकुनपेशापर्यंत सर्व लोक असत. यांपैकीं कोणालाही विशेष अडचण उत्पन्न न होईल अशा रीतीनें सर्वांना संभाळून घेऊन ते आपल्या बहुविध चळवळी चालवीत असत.

राष्ट्रांतील सर्व दर्जांच्या व सर्व पेशांच्या लोकांची सर्व प्रकारच्या बाबतींत प्रमाणशीर प्रगति होत जावी हा रानड्यांचा उद्देश असे. टिळकांचा भर राजकीय चळवळीवरच विशेष असल्यामुळें त्या चळवळीवर निर्वाह करणाऱ्या लोकांचाच संग्रह त्यांनीं केला. थोडें वेगळ्या शब्दांत बोलावयाचें म्हणजे टिळकांनीं राजकीय भिक्षुकवर्ग निर्माण केला. एका म्युनिसिपालिटींतील एक मुख्य ऑफिसर असें सांगत कीं, आमचेकडे कोणी नोकरी मागावयास आला म्हणजे 'तुमची परीक्षा वगैरे कांहीं पास झाली आहे का' असा आम्ही साहजिकच त्यांना प्रश्न विचारतों. तेव्हां ते आम्हांला उलट विचारतात का परीक्षा पास झालों असतों तर म्युनिसिपालिटींत नोकरी मागावयास कशाला आलों असतों! टिळकांच्या परिवारांत व भक्तांत वरील नमुन्याच्या माणसांचाच बराचसा भरणा असे. रानड्यांबद्दल त्यांच्या परिवाराची भक्ति डोळस किंवा बुद्धि-प्रेरित होती; टिळकांबद्दलची त्यांच्या परिवाराची भक्ति आंधळी अथवा भावनाप्रेरित होती. रानड्यांनीं हुशार व हिंमतवान लोकांचा संच जमवून सार्वजनिक सभेस लोकहितदृष्ट्या सर्वथा श्रेयस्कर असें स्वरूप आणलें होतें; पण टिळकांनीं, ग्रंथकर्त्यांच्याच शब्दांत बोलावयाचें म्हणजे, आपल्या तेजस्वी वर्तनानें सभेची स्थिति कार्यक्षमतेच्या दृष्टीनें सर्वस्वी निस्तेज करून टाकली! चांगली रंगारूपास आलेली संस्थाही टिळकांच्यानें संभाळविली नाहीं, मग नवीन संस्था निर्माण करण्याचें तर दूरच राहिलें!

विवाक्षित सार्वजनिक कामगिरी करण्याकरितां टिळकांनीं एखादी संस्था काढल्याचें एकही उदाहरण दाखवितां येणार नाहीं. यावर कोणी कदाचित् त्यांच्या 'केसरी' पत्राकडे बोट दाखवितील. पण सार्वजनिक